पुणे,सोमवार, ९ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 271 • वर्ष ३ रे, अंक २७१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

श्री शारदा गणेश



दगडांवर कोरलेल्या लेण्यांमधील महादेवाचे भव्य शिवालय...

## At a Glance

### भारतात आढळला मंकीपॉक्स संशयित रुग्ण



**नवी दिल्ली :** कोरोना महामारीनंतर मंकीपॉक्सच्या साथीने जगातील अनेक देशात थैमान घातले आहे. अनेक देशात मंकीपॉक्सच्या साथीचा उद्रेक झाला असून, भारतात आरोग्य यंत्रणांकडून खबरदारी घेतली जात आहे. दरम्यान, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मंकीपॉक्स संशयित रुग्णाबद्दल माहिती दिली आहे. हा तरुण मंकीपॉक्सचा उद्रेक झालेल्या देशातून आला असल्याचे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, मंकीपॉक्सच्या साथीचा सामना करत असलेल्या देशातून एक तरुण रुग्ण आला असून, तो मंकीपॉक्स संशयित रुग्ण आहे. रुग्णाला एका रुग्णालयामध्ये विलगीकरणात ठेवण्यात आले असून, त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे, असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

### १०० रुपयांत आनंदाचा शिधा

**मुंबई :** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धूम आहे. दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान घरोघरी गोडधोड जेवण तयार केले जाते. महाराष्ट्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने हाच उत्सव डोळ्यासमोर ठेवून एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून पुन्हा एकदा 'आनंदाचा शिधा' हा उपक्रम राबवला जात आहे. » पान ७ वर

### लेसरमुळे तरुणाच्या डोळ्यातून रक्तस्त्राव

**कोल्हापूर :** कोल्हापुरात उचलगांव येथे लाडक्या गणपती बाप्पाचे जल्लोषात व धुमधडाक्यात स्वागत करण्यात आले. येथील गणेश मंडळाने डिजेचा दणदणाटात गणरायाचे स्वागत केले. दरम्यान, लेझर लाइटचा वापर टाळा असे आवाहन केल्यानंतर देखील काही मंडलांनी » पान ७ वर

## दादांचे विधानसभा न लढण्याचे संकेत

# झाकली मूठ !

**उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रमुख आमदार अजित पवार यांनी आज बारामती येथे बोलताना विधानसभा निवडणुकीमध्ये न उतरण्याचे संकेत दिले. एवढी कामे करून जर लोक साथ देत नसतील तर थोडे बाहेर राहून बघू झाकली मूठ सव्वा लाखाची असू द्या असे वक्तव्य करून त्यांनी एकच खळबळ उडवून दिली**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** मी पण शेवटी माणूस आहे. मला पण कधी कधी विचार येतो की, एवढी सगळी कामे करुन बारामतीकर वेगळा पण निर्णय घेऊ शकतात. तर मग आपण पण आता ३३, ३४ वर्षे झाली. मी तर आता दुसऱ्यांना खासदार करु शकतो, राज्यसभा दुसऱ्याला दिली. आमदारही दुसऱ्याला केले. पण आता अशीच गंमत होणार असेल तर आता झाकली मूठ सव्वा लाखाची.

आता आपणही समाधानी आहे. जिथं पिकतं, तिथं विकत नसते. एकदा बारामतीकरांना मी सोडून वेगळा आमदार मिळाला पाहिजे. मग तुम्ही माझी १९९१ ते २०२४ ची तुलना करा, असे ही अजित पवार म्हणाले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित पवार रविवारी बारामती दौऱ्यावर होते, त्यांनी एका मेळाव्याला संबोधित केले. यावेळी अजित पवार यांनी पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीतील पराभवावर भाष्य केले. " एवढी विकासकामे करुनही जर बारामतीकर वेगळा निर्णय घेणार असतील तर बारामतीलाही वेगळा आमदार मिळाला पाहिजे,यानंतर माझ्या आमदारकीच्या कार्यकाळातील आणि नव्या व्यक्तीच्या कामाची तुलना करावी',असं विधान अजित पवार यांनी केले. या विधानामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.

"न सांगता रस्ता होतो. न सांगता पाण्याच्या योजना सुरू होतात. आता कुठल्याही भागात गेला तर रस्ता नाही असं नाही. मेडिकल कॉलेज न मागता मिळतंय.तुम्ही काम लगेच विसरुनच जाता. विकासकामे केली की लगेच काहीजण दुसऱ्या बाजूला टपऱ्या » पान ७ वर

## दीड दिवसाच्या बाप्पाला निरोप

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुढच्या वर्षी लवकर या::** सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे शनिवारी आगमन झाले होते. सर्वत्र धुमधडाक्यात आणि ढोल ताशांच्या गजरात गणपतींचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर काल दीड दिवसांच्या गणपती बाप्पाला भक्तांकडून निरोप देण्यात आला.

# सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास केंद्राची मान्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये 90 दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन व उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले तेव्हा धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता.

केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही 4892 रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा व समर्थन देणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर » पान ७ वर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : संत ज्ञानेश्वर माऊलींना साकडे

# शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येवो!





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** शेतकऱ्यांना सुगीचे दिवस यावेत शेतकरी सुखी आणि आनंदी व्हावा असे साकडे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माऊलींकडे घातले. अभिष्टचिंतन आणि वारकरी संतपूजन सोहळ्यासाठी मुख्यमंत्री आळंदीमध्ये आले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवारी आळंदीमध्ये आले होते. यावेळी शिंदे यांनी मुख्य मंदिरात जाऊन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. यावर्षी पाऊस चांगला झाला आहे. बळीराजाला सुखी आणि समाधानाचे दिवस येवोत असे साकडे यावेळी माऊलींच्या चरणी शिंदे यांनी घातले. कालच गणरायाचे आगमन झाले आहे. हे आगमन राज्यात भरभराटी आणि सुख- समृद्धी घेऊन येईल अशी प्रार्थना गणराया चरणी केल्याचे देखील मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे.

वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा, चुकले माकल्यांना सन्मार्गाची दिशा देणारा असून समाज घडविण्याचे काम वारकरी संप्रदाय करतो, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आळंदी येथे फ्रुट वाले धर्मशाळा येथे झालेल्या ह.भ.प मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या व ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते ह.भ.प कुरेकर महाराज यांना शांतीब्रह्म पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना तुलसीदास पुरस्कार प्रदान करण्यात आला. » पान ७ वर

## आ. महेश लांडगेंना जीवे मारण्याची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** भोसरी विधानसभेचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. ही घटना शनिवारी दुपारी घडली आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड पोलिसांनी उदयकुमार राय नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले असून चौकशी सुरू केली आहे. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल आहे. भाजपचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला उदय कुमारने फोन करून महेश लांडगे यांची सुपारी मला मिळालेली आहे. अशी माहिती फोनद्वारे दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी चौकशी सुरू केली आणि अवघ्या काही तासांत उदयकुमार रायला ताब्यात घेतले आहे.

# हिट अँड रनची पुनरावृत्ती

**तीन शाळकरी मुलांना भरधाव कारने उडवले ; एका विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून हिट अँड रनच्या घटनांमध्ये वाढ होताना पाहायला मिळत आहे. त्यातच पुण्यातील मुळशी तालुक्यातल्या पौड भागामध्ये एका भरधाव कारने तीन शाळकरी मुलांना उडवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत शाळकरी मुले गंभीर जखमी झाले असून घटनास्थळावरून कारचालक फरार झाला आहे.

कार्तिक रामेश्वर मावकर इयत्ता ८ वी (वय १४), सम्यक प्रमोद चव्हाण इयत्ता ८वी (वय १४) आणि प्रेम साहेबराव चव्हाण इयत्ता ७वी (वय १३) (सर्व रा. अकोले ता.मुळशी) अशी जखमी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे नावे आहेत. यातील एका विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे.

कार्तिक, सम्यक आणि प्रेम ही तीन मुले पौड येथील मामासाहेब मोहोळ विद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत. शनिवारी (दि. ०७) सायंकाळच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर हे तिघेही रस्त्याच्या बाजूने घराच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी रस्त्यावरून येणारी भरधाव कार दुसऱ्या गाडीला ओव्हरटेक करत असताना कार चालकाने रस्त्याच्या कडेने चालणारे या तिघांना जोरदार धडक दिली. कार भरधाववेगात असल्याने हे तीनही विद्यार्थी हवेत उडून रस्त्यावर पडले.

या घटनेनंतर कार चालक घटनास्थळावर न थांबता त्याने तिथून पळ काढला. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी या तीनही विद्यार्थ्यांना तत्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यातील एका विद्यार्थ्यावर रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. पौड पोलीस कार चालकाचा शोध घेत आहे.



## १२ लाखांचे मेफेड्रोन जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कात्रज भागात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोघांना भारती विद्यापीठ पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून ११ लाख ९० हजार रुपयांचे ५४ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. मल्लीनाथ बसवराज गौडगाव (वय २९, रा. चंद्रभागानगर, आंबेगाव, कात्रज), नौशाद अब्दुलअली शेख (वय ३६, रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. » पान ७ वर

# शरद पवार गट; ९० ते १०० जागा लढवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शरद पवार गटाची प्राथमिक स्तरावर तयारी असावी, म्हणून १०० च्या जवळपास तयारी सुरु आहे. गटाच्या वरिष्ठ नेत्यांकडून नेमलेल्या निरीक्षकांना झूम मीटिंगद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. पक्षाचा अहवाल लवकरात लवकर गोळा करा. बूथ कमिटी तयार करा, अशा सूचना पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती मिळतेय. गणपती उत्सवांनंतर पक्षाला अहवाल दिला जाणार असल्याचं समोर आलंय.राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ९० ते १०० जागांवर तयारी सुरु असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत शरद पवार गट ९० ते १०० जागा लढवणार असल्याचा अंदाज आहे.


**» राजकीय**

विधानसभेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा देखील सुरु झाली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाने नेमलेल्या निरीक्षकांची नुकतीच झूम मीटिंग झाली. या मीटिंगमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाच्या सुचना पक्षातील पदाधिकाऱ्यांना वरिष्ठ नेत्यांनी दिल्या आहेत.

यंदा विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबर महिन्यात होतील » पान ७ वर

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जळगांव :** देशात महिलांवरील अत्याचार थांबण्याचे नाव घेत नाही. राज्यात बदलापूर येथील एका शाळेत दोन मुलींवर अत्याचार झाल्या प्रकरणी जनक्षोभ उसळला होता. ही घटना ताजी असतांना आता जळगावमध्ये मन सुन्न करणारी घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे जळगावात संतापाची लाट उसळली आहे.

एक १२ वर्षांची अल्पवयीन मुलगी ही शेतातून आपल्या लहान बहिणीसोबत घरी जात होती. यावेळी आरोपींनी या मुलीला शेतात जबरदस्तीने ओढून नेत तिच्यावर बलात्कार केला. यानंतर मुलीच्या लहान बहिणीसमोरच तिची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली.

## नागरिकांमध्ये टीबीचा धोका वाढतोय ; आरोग्य विभागाचा निर्णय

# आता नागरिकांना मिळणार टीबीची लस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** क्षयरोगापासून बचाव होण्यासाठी बीसीजी जन्मत: सर्व लहान मुलांना देण्यात येते. मात्र आता नागरिकांमध्ये टीबीचा धोका वाढत चालल्यामुळे आरोग्य विभागाने एक निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात क्षयरोगाचे (टीबी) समूळ उच्चाटन करण्यासाठी पुणे जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने जिल्ह्यातील १८ वर्षांवरील नागरिकांना आता बीसीजीची लस देण्यात येणार असून लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. विकास वडगाये यांनी ही माहिती दिली. ही लस देण्यासाठी जिल्ह्यात घरोघरी सर्वेक्षण करण्यात आले आहे. ज्यांना भविष्यात टीबी होण्याचा धोका आहे. त्यांनाच ही लस प्राधान्याने देण्यात येणार आहे. या लसीचा वापर प्रौढांमधील क्षयरोग प्रतिबंधासाठी करण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये काही ठरावीक ग्रामीण जिल्ह्यामध्ये व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रायोगिक तत्वावर प्रौढांना बीसीजी लस सप्टेंबर महिन्यापासून देण्यात येणार आहे. यासाठी प्रौढांमधील काही गट ज्यांना क्षयरोग होण्याची शक्यता जास्त आहे त्यांना प्रथमत: ही लस देण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यात बीसीजी लस देण्यासाठी आशा सेविकांमार्फत केलेल्या सर्वेक्षणात एकूण ७ लाख ५० हजार ७०४ जणांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये ४ लाख ३२ हजार २३२ जणांना लस घेण्यासाठी संमती दिली आहे.

लसीकरणासाठी जे लाभार्थी संमती देतील, त्यांनाच ही लस देण्यात येणार आहे. लस देण्याकरिता गावागावांत, उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी स्वतंत्र लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

त्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड यापैकी एक ओळखपत्र आवश्यक असेल.

#रा

## ६२ हजार खटले ३० वर्षांपासून प्रलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** देशातील विविध उच्च न्यायालयांमध्ये निकालाच्या प्रतीक्षेत असलेले सुमारे ६२ हजार खटले ३० वर्षांपेक्षा जास्त काळापासून प्रलंबित आहेत. यातील ३ प्रकरणे १९५२पासूनची असल्याचे समोर आले आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, उच्च न्यायालयात १९५४ पासून चार आणि १९५५ पासूनचे नऊ खटले प्रलंबित आहेत. १९५२ पासून प्रलंबित असलेल्या तीन प्रकरणांपैकी दोन कलकत्ता उच्च न्यायालय आणि एक मद्रास उच्च न्यायालयातील आहे. » पान ७ वर

# महिला पोलिस उपायुक्त- निवृत्त महिला ACP वर गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विरोधी पक्षनेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधीमंडळात सादर केलेल्या पेन ड्राईव्हवरुन सीबीआयने माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह सरकारी वकील प्रविण चव्हाण पुण्यातील तत्कालीन पोलीस उपायुक्त पोर्णिमा गायकवाड निवृत्त सहायक पोलीस आयुक्त सुषमा चव्हाण, विजय पाटील यांच्याविरुद्ध कट कारस्थान करण्याचा गुन्हा दाखल केला आहे.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षांच्या नेत्यांना ) खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात असल्याचा आरोप विधीमंडळात केला होता. त्यावेळी त्यांनी पुरावा म्हणून एक पेन ड्राईव्ह सादर केला होता. विशेष सरकारी वकील प्रविण चव्हाण यांच्या कार्यालयातील बसविलेल्या घड्याळात कॅमेऱ्यातून हे सर्व व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले होते. याचा तपास शिंदे सरकार सत्तेवर आल्यावर सीबीआयकडे सोपविण्यात आला होता.

या व्हिडिओ रेकॉर्डिंगमध्ये विशेष सरकारी वकील कट रचताना व भाजपच्या विविध वरिष्ठ नेत्यांना गुन्ह्यामध्ये अडविण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी बोलताना दिसून येतात. » पान ७ वर

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे आयोजन

# अथर्वशीर्ष पठणाचे वर्ल्डरेकॉर्ड

ओम नमस्ते गणपतये... ओम गं गणपतये नमः... मोरया, मोरया... च्या जयघोषाने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



पुणे : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३२ व्या वर्षी ऋषीपंचमीनिमित्त ३५ हजार महिलांनी अथर्वशीर्ष पठणात सहभाग घेतला. महिला अथर्वशीर्ष पठण उपक्रमाची दखल इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड ने घेत डॉ. दीपक हरके यांनी ट्रस्टला प्रमाणपत्र दिले. यावेळी सहभागी महिलांचा समुदाय.

**पुणे :** ओम नमस्ते गणपतये... ओम गं गणपतये नमः... मोरया, मोरया... च्या जयघोषाने तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक यानिमित्ताने पहायला मिळाला. पारंपरिक वेशात मध्यरात्री १ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता हजेरी लावण्यास सुरुवात केली. गणेश नामाचा जयघोष करीत अथर्वशीर्षासोबत महाआरती करीत महिलांनी स्त्री शक्तीचा जागर केला.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३२ व्या वर्षी उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरुणा ढेरे, वृषाली श्रीकांत शिंदे, ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी यांसह शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, प्रा.गौरी कुलकर्णी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गणेश जागर गीत आणि मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या. गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेचा उत्साह ओसंडून वाहत होता.

**उपक्रमाचे ३९ वे वर्ष** दगडूशेठच्या उत्सव मंडपापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली. भक्तीरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. पुण्यासह मुंबई, लातूर, कोल्हापूर, नाशिक व महाराष्ट्राच्या विविध ठिकाणाहून आलेल्या महिलांनी उपक्रमात सहभाग घेतला. उपक्रमाचे ३९ वे वर्ष होते.



**३५,०००**

महिलांचे 'दगडूशेठ' गणपतीसमोर अथर्वशीर्ष पठण व महाआरती

**मध्यरात्री पासून हजेरी**

ऋषीपंचमीनिमित्त पहाटे स्त्री शक्तीचा जागर

> बुद्धी हीच खरी शक्ती आहे. सर्व महिला आज गणरायाकडे बुद्धी मागायला मोठ्या संख्येने आल्याचे चित्र प्रेरणादायी आहे. प्रत्येक कार्यामागे बुद्धी आहे, एक विचार असतो. जे काही करतो, ते आपण बुद्धीपूर्वक करायला हवे. आज बाहेरील परिस्थिती बदलत चालली आहे. त्यामुळे महिलांनी आपली शक्ती जागृत करायला हवी. — अरुणा ढेरे

राष्ट्रसंचार उपक्रम रा

## 'श्री ग्रंथ गणेशाचा' देखावा व कात्रण संग्रहाचे प्रदर्शन

आबासाहेब अत्रे प्रशालेतील उपक्रम

**पुणे :** सोमवार पेठेतील दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी शाळेच्या 'बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचनकक्षा'त गणेशोत्सवाचे औचित्य साधत 'बुद्धी'ची देवता असलेल्या 'श्री गणेशा'च्या पुस्तकांचे, विविध भावमुद्रा असलेल्या मूर्तींचे तसेच छायाचित्र व माहितींच्या कात्रण संग्रहाचे प्रदर्शन आयोजित केले. याप्रसंगी संदर्भ ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांच्या मार्गदर्शनात मुलांनी वाचनाचा संकल्प केला. सजावटीत गणपती विषयक पुस्तके, मासिके, नियतकालिके यांच्या वापरासोबतच ज्येष्ठ अभिनेते डॉ. गिरीश ओक यांच्या वैयक्तिक संग्रहातील काही गणेश मूर्तींचाही समावेश प्रदर्शनात आहे. तसेच जेष्ठ गणेश छायाचित्रं संग्रहक आशा दत्ताजी शिंदे यांच्या तसेच त्यांच्या मार्गदर्शनात मुलांनी तयार केलेल्या गणेश विषयक माहिती व चित्रांच्या कात्रण संग्रहांचा समावेशही आहे. दरम्यान विद्यार्थ्यांनी श्री गणेशाच्या आरत्या, स्तोत्र, कविता तसेच सुभाषितांचे सादरीकरण केले. या अनोख्या उपक्रमात शार्मिन मोहम्मद, समीक्षा घोडियाल, मंजिरी गायकवाड, दक्ष घोडके, अथर्व जोंजाळ, विक्रांत ढसाळ, आलेख विज्ञानी, जनार्दन गायकवाड, फरिद कौलंगी, विष्णू दुभळकर, श्रिया जगताप हे विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. मुख्याध्यापिका दीपमाला धायगुडे, प्रसाद भडसावळे, हरेश पैठणकर, केशव तळेकर, उत्तम साळवे आदी उपस्थित होतै.

> 'सार्वजनिक उत्सव, सण, समारंभाचे निमित्ताने ग्रंथालयाच्या माध्यमातून मुलांना पुन्हा वाचनास उद्युक्त करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यास विद्यार्थ्यांचाही सकारात्मक प्रतिसाद असतो. -माहितीतज्ज्ञ प्रसाद भडसावळे



प्रशालेच्या बालसाहित्यकार इंदिरा अत्रे वाचन कक्षा साकारलेल्या 'श्री ग्रंथ गणेश' प्रदर्शनातील ग्रंथ, मूर्ती व कात्रण संग्रहासोबत विद्यार्थी

## कलाकारांचा कलाधिपती

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



पुणे : शिल्पकार राहुल भोसले यांच्या समवेत पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल व आयोजक सुरेश लोणकर.

पुणे फेस्टिव्हलमध्ये ज्येष्ठ चित्रकार मुरली लाहोटी यांचा विशेष सत्कार

## १०० हून अधिक चित्रकारांनी रेखाटली पेंटिंग्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** ३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये १०० हून अधिक चित्रकारांनी श्री गणपतीची पेंटिंग्ज रंगवून वाह वाह मिळवली. बालगंधर्व कलादालन येथे आज सकाळी पुणे फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक अॅड. अभय छाजेड यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या पेंटिंग प्रदर्शनचे उद्घाटन झाले. याप्रसंगी ज्येष्ठ चित्रकार मुरली लाहोटी यांचा वयाची ८५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ, मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर, चित्रकार प्रा. मिलिंद फडके, संयोजक तुलसी आर्ट ग्रुपचे सुरेश लोणकर आणि धनश्री लोणकर मंचावर उपस्थित होते. टाळ्यांचा कडकडाट करून १०० हून अधिक चित्रकारांनी ज्येष्ठ चित्रकार मुरली लाहोटी यांना मानवंदना दिली.

**प्रदर्शन ९ व १० सप्टेंबर रोजी विनामुल्य खुले**

● गणपती चित्रांचे या प्रदर्शनात अॅक्रेलिक कलर, वॉटर कलर, खडू, पेन्सिल, चारकोल इत्यादी माध्यमांचा चित्रकारांनी वापर केला आहे. यावेळी ज्येष्ठ शिल्पकार रोहन भोसले यांनी गणपतीचे शाडू माती पासून शिल्प बनवून सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. शिल्पकार विवेक खटावकर यांनी सुमारे ५ फूट उंचीचे फायबरपासून बनवलेले गणपतीचे शिल्प तेथे उभारले. प्रदर्शनाच्या ३ दिवसात नामवंत चित्रकार विविध पेंटिंग्जची प्रात्यक्षिके दाखवणार आहेत. आज सोमवार ९ व १० सप्टेंबर रोजी सकाळी १० ते रात्री ८ वेळेत बालगंधर्व कलादालनात विनामुल्य खुले असणार आहे. याचे बक्षीस वितरण समारंभ दि. १० सप्टेंबर रोजी सायंकाळी संपन्न होईल.

## महापालिकेच्या ४५ कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविले

**मांजरी :** महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमधील मिळकतींची करआकारणी करण्यामध्ये दिरंगाई करणाऱ्या मिळकतकर विभागाच्या



४५ कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविण्यात आले आहे, तसेच कामात हलगर्जीपणा केला असल्यामुळे तुमच्यावर कारवाई का करू नये, याबाबतचा खुलासाही या कर्मचाऱ्यांकडून मागविण्यात आला आहे. करसंकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी ही माहिती दिली.

या कर्मचाऱ्यांवर वाघोली, नऱ्हे आणि मांजरी या समाविष्ट गावांतील मिळकतकराची करआकारणी करण्याची जबाबदारी होती. त्यानंतरही त्यांच्याकडून सुमारे १८ हजार मिळकतींना कर आकारण्यात आलेला नाही, तसेच या कर्मचाऱ्यांना करआकारणी संथगतीने केली जात असल्याची नोटीसही बजाविण्यात आली होती. त्यानंतरही त्यांच्याकडून हे काम करण्यात न आल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. मिळकतकर विभागात तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झालेल्या विभागीय निरीक्षकांच्या बदल्या केल्या जाणार आहेत. यापूर्वी या विभागात काम न केलेल्या निरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेण्यात आला आहे. अनेक कर निरीक्षकांच्या वर्षानुवर्षे बदल्या न झाल्याने, तसेच काही ठराविक भागातच बदल्या करून घेण्यावर भर दिला जात असल्याचे समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

## गौराईच्या आगमनावर भाज्यांच्या दरवाढीचे सावट



**पुणे :** परराज्यातून होणारी आवक कमी झाल्याने लसूण, गाजर, मटारच्या दरात वाढ झाली. कांदा, काकडी, ढोबळी मिरचीचे दर तेजीत आहेत. आवक वाढल्याने शेवग्याच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (८ सप्टेंबर) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ७० ते ८० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्यातून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली होती. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ५ ते ६ टेम्पो कोबी, कर्नाटक आणि गुजरातमधून ४ ते ५ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ४ ते ५ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ७ ते ८ टेम्पो गाजर, गुजरातमधून २ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

विधानसभा निवडणूक तोंडावर कामात दिरंगाई

## महामार्गावर विविध विकासकामे नियोजित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरिकांच्या सोयीसाठी महामार्ग आवर लवकरच विविध उपाय योजना केल्या जाणार आहेत. सध्याच्या महामार्गावरून दररोज जाणाऱ्या वाहनांची संख्या २५ ते ३० हजार आहे. ही संख्या वाढतच आहे.

अस्तित्वातील रस्ता हा २४ मीटर रुंद असून, चौपदरी आहे. या महामार्गावरील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी रुंदीकरण करणे, महामार्गावर चार उड्डाणपूल उभारणे, महामार्गावर सध्याचे पथकर नाके काढून टाकणे, रस्त्याच्या साइड पट्ट्यांचे डांबरीकरण करणे आदी कामे हाती घेण्यात येणार आहेत.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (एनएचआय) पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि पुणे ते बेंगळुरू या दोन हरित महामार्गांची कामे हाती घेतली आहेत. मात्र, या महामार्गांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन करावे लागणार असल्याने सध्याच्या पुणे-शिरुर-नगर-छत्रपती

संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मात्र, शक्तिपीठ महामार्गामुळे लोकसभेला बसलेला फटका लक्षात घेऊन विधानसभा निवडणूक तोंडावर असल्याने भूसंपादन टाळण्यात आल्याची चर्चा आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (एनएचआय) पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि पुणे ते बेंगळुरू या दोन हरित महामार्गांची कामे हाती घेतली आहेत. त्यासाठी एनएचएआयने सल्लागार कंपनीची नियुक्ती केली होती. या कंपन्यांकडून प्रायोगिक तत्त्वावर रस्त्याचे आरेखन करून सर्वंकष प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू होते. मात्र, चालू वर्षाच्या सुरुवातीलाच राज्य सरकारकडून महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपेन्ट कॉर्पोरेशनची (एमएसआयडीसी) स्थापना करण्यात आली. त्यामुळे 'एनएचएआय'ऐवजी हे काम 'एमएसआयडीसी'कडून करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. सध्या अस्तित्वातील पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्गाचे काम हे सार्वजनिक बांधकाम (पीडब्ल्यूडी) खात्याकडे आहे.

**भूसंपादनावरून शेतकऱ्यांचा रोष**

● एमएसआयडीसी आणि पीडब्ल्यूडी यांच्यात बैठक झाली. त्यामध्ये हरित महामार्गासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करावे लागणार आहे. त्यामुळे सध्या जुन्या महामार्गाची क्षमता वाढविण्याला प्राधान्य द्यावे. त्यानंतर हरित महामार्गाचे काम हाती घेण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला. छत्रपती संभाजीनगर आणि पुणे ते बेंगळुरू या दोन हरित महामार्गांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन करावे लागणार आहे. त्यात शेतजमीन, बागायती जमिनींचाही समावेश आहे. शक्तिपीठ महामार्गाला भूसंपादनाच्या मुद्द्यावरूनच तीव्र विरोध करण्यात आला होता. या विरोधाचा मोठा फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीत बसला होता. ही बाब लक्षात घेऊन भूसंपादनावरून शेतकऱ्यांचा रोष निर्माण होऊ नये ही बाब विचारात घेऊन पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्गासाठी भूसंपादन टाळून केवळ सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे दिसून येत आहे.

## पालिकेच्या उपक्रमास पुणेकरांनी दिली साथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यावरण पूरक गणेशोत्सवासाठी पालिका विविध उपक्रम राबवत असते. गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी पालिकेकडून नागरिकांनी शाडू मातीच्या मूर्ती खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे या उद्देशाने पर्यावरण विभाग व लिबर्टी अर्थवेअर आर्ट यांच्या मदतीने शाडू माती, संगम मातीच्या मूर्ती विक्रीचा तसेच मूर्ती आमची, किमंत तुमची उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात दोन दिवसांत पुणेकरांनी २१० शाडूच्या मूर्ती तर २०० संगम मातीच्या (लाल माती) मूर्ती घेतल्या आहेत. पालिकेकडून कोणतीही जाहीरात अथवा जनजागृती न करताच गणेशोत्सवाच्या एक दिवस आधी हा उपक्रम हाती घेतला असताना त्याला ४०० पेक्षा अधिक पुणेकरांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे भविष्यात हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे पालिकेच्या पर्यावरण विभागाकडून सांगण्यात आले.

या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ही दोन तासांत पाण्यात विरघळतात व विसर्जन केल्यानंतरचे पाणी घरगुती कुंडीमध्ये वापरता येते.

फ्लेक्सचा खर्च टाळून पोलीस स्टेशनला झेरॉक्स प्रिंटर स्कॅनर भेट

## क्रिएटिव्ह फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोथरूड :** सामान्य नागरिक अगदी सहजपणे पोलिसांवर टीका करतो किंबहुना समाजात घडणाऱ्या गैर गोष्टींसाठी पोलिसांना जबाबदार धरतो. मात्र पोलीस दल किती विपरीत परिस्थितीत काम करते याची समाजाला जाणीव होणे गरजेचे आहे आणि त्यांच्याशी मैत्री केली, विश्वास टाकला तरच समाजातील गुन्हेगारीवर आळा बसू शकतो असे क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर म्हणाले.

गणेशोत्सवात नागरिकांना शुभेच्छा देणारे फ्लेक्स लावण्याचा खर्च टाळून क्रिएटिव्ह फाउंडेशनतर्फे कोथरूड पोलीस स्टेशनला अत्याधुनिक ऑल इन वन झेरॉक्स, प्रिंटर, स्कॅनर भेट देण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पोलीस उपायुक्त संभाजीराव कदम, पोलीस निरीक्षक संदीप देशमाने, क्रिएटिव्ह फौंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर, विश्वस्त माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, विश्वनाथ भेलके प्रतिष्ठान चे अध्यक्ष विशाल भेलके उपस्थित होते.

प्रत्येक नागरिक हा साध्या वेशातील पोलीस आणि पोलीस हा वर्दीतील नागरिक असतो हे आपण ध्यानात घेतले पाहिजे असे ही संदीप खर्डेकर म्हणाले.

कोथरूड पोलीस स्टेशनला या यंत्राची आवश्यकता होती, ती दिल्याबद्दल पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी आभार व्यक्त केले.

> ● क्रिएटिव्ह फॉऊंडेशनचा हा उपक्रम स्तुत्य असून पोलीस हा जनतेसाठी अविरत सेवेत असतो, सणासूदीच्या काळात किंवा घरगुती आनंदाच्या दुःखाच्या प्रसंगात देखील तो बंदोबस्तावर असतो व कायदा व सुव्यवस्था राखतो, त्यामुळे पोलीस आपला मित्र आहे असे समजूनच समाजाने वागावे . - संभाजीराव कदम, पोलीस उपायुक्त

#रा

# वडगाव शेरी मतदारसंघात टिंगरे विरुद्ध पठारे लढत ?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव शेरी :** शरद पवार गटाकडून भाजपला मोठा धक्का देण्यात आला आहे. वडगाव शेरी मतदारसंघातील भाजप नेते, माजी आमदार बापूसाहेब पठारे हाती तुतारी घेत विधानसभा निवडणूक लढणार आहेत. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी (शनिवारी) गणेश मंडळांना भेट देत असताना बापू पठारे यांनी थेट आगामी विधानसभेसाठी आपण तुतारी हाती घेणार असल्याचे जाहीर केले. तसेच मंडळांना तुतारीला मतदान करण्याचे आवाहनही केले. बापू पठारे यांनी तुतारीचा प्रचार सुरू केला आहे. या मतदारसंघात अजित पवार गटाचे सुनील टिंगरे हे विद्यमान आमदार आहेत. अजित पवार गटाकडून तेच पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता आहे. मात्र, महायुतीमधील मित्र पक्ष भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सुनील टिंगरे यांना विरोध करत हा मतदारसंघ भाजपकडे घेण्याची मागणी केली आहे.

## भाजपमधून विरोध

● बापू पठारे यांनी थेट तुतारी हाती घेणार असल्याचे जाहीर केल्याने टिंगरे विरुद्ध पठारे अशी लढत वडगाव शेरी मतदारसंघात होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीला भाजप उमेदवार मुरलीधर मोहोळ हे विजयी झाले असले तरी वडगाव शेरी मतदारसंघातून त्यांनी अपेक्षित लीड मिळाले नसल्याचे भाजप पदाधिकारी सांगत आहेत. त्यामुळेच सुनील टिंगरे यांच्या उमेदवारीला भाजपमधून विरोध होतो आहे.

## धनकवडीत ११ गणेश मंडळांची अनोखी मिरवणूक

# संयुक्त मिरवणुकीची जगभर चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



आदिवासींचे पारंपरिक नृत्य आणि संगीताने गणेशभक्त तल्लीन



**पुणे :** लोकनृत्य हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे, जो कोणत्याही समाजाची विविध रूपे दाखवतो, यातून समाजातील परंपरा समजून घेता येतात. अशात धनकवडीतील ११ गणेश मंडळांच्या संयुक्त मिरवणुकीची चर्चा पुणे सहित संपूर्ण जगभर पोहचली आहे. 'आदिवासी युनिव्हर्सल ट्रॅबल' या संस्थेकडून शहरात प्रथमच गणेश आगमनाच्या वेळी आदिवासी संस्कृतीची झलक पहावयास मिळाली. यात आदिवासी नृत्य आणि संगीताला समर्पित करण्यात आली. यांच्या पारंपारिक नृत्य आणि संगीताने गणेश भक्तांना मंत्रमुग्ध केले.

तत्पपूर्वी स्थानीक आमदार भीमराव तापकीर, विशाल तांबे, नगरसेविका वर्षा तापकीर, बाळासाहेब धनकवडे, अनिल भोसले, ११ गणेश मंडळांचे अध्यक्ष, मंडळांचे अध्यक्ष संतोष धनकवडे, अभिषेक तापकीर, उदय जगताप , विजय क्षीरसागर, प्रतिक कुंभार, रुपेश रणावरे, आनंद शिंदे आणि विश्वस्त अनिरुद्ध येवले यांच्या हस्ते गणेश पूजा करण्यात आली.

### मनमोहक नृत्याने उपस्थित मंत्रमुग्ध

● ज्ञानप्रबोधिनी वाद्य आणि गोविंदा बँड पथक यांच्या ढोल ताशांनी संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. पालघर आणि गडचिरोली येथील आदिवासी नृत्यामध्ये शिकार कलेचे दर्शन घडविणाऱ्या नृत्याने बाप्पाच्या आगमनाची सुरूवात झाली. वाघाची वेशभूषा परिधान केलेल्या कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. याच क्रमात महिला व पुरूषांची नृत्य झाले. ज्याची लोकप्रियता सध्या संपूर्ण जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. कलाकारांनी या पारंपारिक नृत्यांना सांस्कृतिक चव जोडून मनमोहक बनवले. या मध्ये धार्मिक, आध्यात्मिक आणि पौराणिक कथा जिवंत केल्या. मुख्यावट्याऐवजी, कलाकारांनी प्रत्येक पात्राला वेगळी ओळख देण्यासाठी चमकदार रंगांचा वापर केला, तर हात पायांची चपळता आणि चेहऱ्यावरील हावभाव गणेश भक्तांच्या टाळ्या मिळवत होते.

### सहभागी मंडळांची नावे

● संयुक्त मिरवणुकीचा नवा पायंडा घालाणाऱ्या एकत्रित सार्वजनिक मिरवणुकीत धनकवडी येथील साईनाथ मित्र मंडळ, श्री शिव छत्रपती मित्र मंडळ, आदर्श मित्र मंडळ, फाईव्ह स्टार मित्र मंडळ, केशव मित्र मंडळ, जय महाराष्ट्र मंडळ, अखिल नरवीर तानाजी नगर मित्र मंडळ, एकता मित्र मंडळ, विद्यानगरी मित्र मंडळ, रामकृष्ण मित्र मंडळ आणि अखिल मोहन मित्र मंडळ यांच्या सारख्या ११ गणेश मंडळांनी मोठ्या संख्येने एकत्रित येऊन देशातील सर्वात मोठ्या एकत्रित मिरवणुक काढली.

### १० हजार गणेश भक्तांचा सहभाग

● आदिवासी सांस्कृतिक जतन रथात ११ गणेश मंडळाचे गणपती विराजमान झाले होते. ही मिरवणुक गुलाबनगर, धनकवडी येथून काढण्यात आली. त्यानंतर धनकवडी गाव, केशव कॉम्प्लेक्स, विद्यानगरी शिवशंकर चौक ते मोहननगर येथे पोहचली. या मिरवणुकीत जवळपास १० हजार गणेश भक्त सहभागी झाले होते.

## अवतीभवती

CITY UPDATE

### 'सारथी'चा 'एफएमसीआयआयआय'शी इन्क्युबेशनसाठी सामंजस्य करार



**पुणे :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) आणि मराठवाडा मित्रमंडळ संचालित फाउंडेशन फॉर मेक इट हॅपन सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्व्हेंशन अँड इन्क्युबेशन (एफएमसीआयआयआय) यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला असून, मराठा-कुणबी समाजातील नवउद्योजकांना प्रशिक्षण व त्यांच्या स्टार्टअपला विकसित करण्यासाठी हे पाऊल उपयुक्त ठरणार आहे. 'एफएमसीआयआयआय'चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. चंद्रशेखर तलाठी व 'सारथी' पुणेचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. 'एफएमसीआयआयआय'चे व्यवस्थापक प्रदीप पाटील, 'सारथी'चे वरिष्ठ प्रकल्प संचालक (सांख्यिकी) भीष्म बिरादार, संशोधन अधिकारी अमर पाटील, मनीषा अहिरराव आदी उपस्थित होते.



### गांधी दर्शन शिबिरात मान्यवरांचे कृत्रिम बुद्धिमत्तेवर मंथन

**पुणे :** 'कृत्रिम बुद्धिमत्ता अतिसुखकारक असली तरी अभिव्यक्तीवर मर्यादा येऊन मानवी प्रवास थिल्लरपणाकडे होईल. संस्कृतीचे सपाटीकरण होईल आणि अस्मिता प्रखर होतील. अशावेळी एआय संस्कृती नको असेल तर नवी संस्कृती निर्माण करावी लागेल आणि तिथे गांधी विचारांची, कमीत कमी गरजांवर जगू शकणारी, 'मिनिमलिझम' संस्कृती येऊ शकते का, याचा शोध घ्यावा लागेल', असे प्रतिपादन सेवा ग्राम (वर्धा) चे सचिव प्रा.विजय तांबे यांनी केले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने गांधी भवन (कोथरूड) येथे रविवारी दिवसभर आयोजित केलेल्या 'गांधी दर्शन' शिबिरात ते 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर बोलत होते. वर्धा येथील सेवा ग्राम चे सचिव विजय तांबे (कृत्रिम बुद्धिमत्ता), डॉ.कुमार सप्तर्षी (महात्मा गांधी आणि सरदार पटेल), उल्हास पवार ( मला उमजलेले गांधी) या मान्यवरानी मार्गदर्शन केले.

विजय तांबे म्हणाले, 'कृत्रिम बुद्धिमत्ता ही चौथी औद्योगिक क्रांती आहे. यात मशीन लर्निंग, आर्टिफिशिअल इंटेलिजन्सपासून अनेक गोष्टी येतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंटरनेट शब्द एकत्र आल्याने जग अपुरे पडणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्रांतीनंतर ६० टक्के रोजगार जातील अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. डॉ.कुमार सप्तर्षी म्हणाले,'वर्चस्ववादी यंत्रणा तयार केली जात आहे.दुसऱ्या मानवावर वर्चस्व गाजविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरली जाणार असेल तर मानवी मूल्ये टिकून राहतील का? कृत्रिम बुद्धिमत्ते विरुद्ध झगडा होणार असेल तर तो मानवी मूल्ये वापरून होणार की कृत्रिम बुद्धिमत्तेचाच वापर करून होणार, हेही पाहिले पाहिजे'.

## आता अजितदादांना पत्र देणार

# उड्डाणपुल नामफलकास काळे फासले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हडपसर :** भाजप कार्यकर्त्यांकडून मांजरी उड्डाणपुलाच्या नामफलकास काळं फासण्यात आलं आहे. ही पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे. हडपसर मतदारसंघात महायुतीमध्ये मिठाचा खडा पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांच्याविरोधात भाजपनं दंड थोपटले आहेत. श्रेयवादावरून लढाई सुरू झाली आहे. महायुती धर्म फक्त भाजपनेच पाळायचा का? असा सवाल करताना हडपसरमध्ये विकासकामाचे श्रेय लाटताना भाजपला डावललं जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



भाजपच्या आमदारांनी केलेल्या कामाचे श्रेय हडपसरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे घेत असल्याचा आरोप करत भाजप कार्यकर्त्यांनी चेतन तुपे यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. भाजप पदाधिकाऱ्यांकडून मांजरी उड्डाणपुलाच्या नामफलकास काळे फासून निषेध व्यक्त करण्यात आला. राष्ट्रवादीच्या आमदारांकडून महायुतीचा धर्म पाळला जात नसल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

### "हा युतीत मिठाचा खडा": शिवराज घुले

● एकीकडे महायुतीमधील बडे नेते राज्यात एकी दाखवत असताना, हडपसरच्या महायुतीमध्ये मिठाचा खडा पडला आहे. पालकमंत्री अजित पवारांना निवेदन देऊन नाराजी व्यक्त करणार असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघात पेयजल योजना, रेल्वे उड्डाणपूल व मांजरीचा नदी उड्डाणपूल यासाठी योगेश टिळेकर यांच्या पाठपुराव्यातून निधी मिळालेला असताना विद्यमान आमदार भाजपच्या पदाधिकाऱ्यांना डावलून श्रेय लाटत आहेत असा आरोप शिवराज घुले यांना यावेळी केला आहे.

## नव्या सामंजस्य कराराचा फायदा

# कैद्यांनाही पूर्ण करता येणार शिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**येरवडा :** कैद्यांना त्याचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी कारागृहातच उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व पुण्यातील महाराष्ट्र कारागृह विभाग यांच्यात नव्याने सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे कारागृहातील कैद्यांना उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य होणार आहे. कारागृहात येणारा बंदी हा समाजाचाच एक घटक असतो. परंतु कळत नकळत त्याचे हातून एखादा गुन्हा घडल्यानंतर त्यास कारागृहात शिक्षा भोगण्यासाठी बंदीस्त ठेवण्यात येते. बंदी कारागृहात आल्यानंतर त्याचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी, कारागृहातच उच्च शिक्षणाची सोय या करारामुळे होणार आहे. यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे व महाराष्ट्र कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक प्रशांत बुरडे उपस्थित होते.

### राज्यात मुक्त विद्यापीठाद्वारे साक्षर..

● २ हजार १९९ पुरुष

● २०७ महिला

● एकूण २ हजार ८५६ कैद्यांनी पदवी पूर्व परीक्षा, पदविका व पदवीचे शिक्षण प्राप्त केली आहे.



"सद्यस्थितीत येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, मुंबई, तळोजा, ठाणे, औरंगाबाद, नाशिक या मध्यवर्ती कारागृह व कल्याण जिल्हा कारागृह अशा एकुण १० कारागृहांत विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र आहेत. या शिक्षणामुळे कारागृहातील बंद्यांना तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर चांगले जीवन जगण्याची संधी मिळते."

— डॉ. संजीव सोनवणे
कुलगुरू, य. च. म. मुक्त विद्यापीठ.

## महापालिकेला जमलं नाही; आता चंद्रकांत दादांचा पुढाकार

# कोथरूडमध्ये खड्डे बुजवण्याची मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत भागातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. यामुळे पुणेकर त्रस्त आहेत अशातच गणपती उत्सवामध्ये बाहेरून येणाऱ्या गणपती भक्तांना देखील या समस्यांना तोंड द्यावे लागणार असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

कोथरूड परिसरात देखील पावसामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. महापालिका प्रशासन हे खड्डे बुजवण्यात कुठेतरी कमी पडत आहेत, त्यामुळे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुढाकार घेऊन खड्डे बुजवण्याची मोहीम हाती घेतली आहे. पुणे शहरात जुलै आणि

**» लोकसहभाग**

ऑगस्टमध्ये झालेल्या पावसामुळे शहर आणि उपनगरांमध्ये ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी खड्डे बुजविण्यात येतील, अशी ग्वाही आयुक्तांनी दिली होती. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून खड्डे बुजवण्याचे काम सुरू झाले; तरी अपुऱ्या मनुष्यबळामुळे या काम पूर्ण होऊ शकले नाही. परिणामी वारंवार पडणाऱ्या पावसामुळे नव्याने खड्डे पडण्याने नागरिक देखील हैराण झाले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी चंद्रकांत पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. लोकसहभागातून मतदारसंघातील खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले.

# 'मेटा अवेकनिंग'मधून आत्मिक संजीवनीची अनुभूती

**वैज्ञानिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक कॉन्सर्टचे शनिवारी आयोजन**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वैज्ञानिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक असा त्रिवेणी संगम असलेल्या 'मेटा अवेकनिंग' या कार्यक्रमातून पुणेकरांना आत्मिक संजीवनीची अनुभूती घेता येणार आहे. तत्वज्ञ-शास्त्रज्ञ श्री भूपेंद्र यांच्या ऊर्जादायी मार्गदर्शन व सहवासाचा अनुभव मिळणार आहे. सोल फाउंडेशन इंडिया आणि सर्कल ऑफ कॉन्सिएसनेस अँड हॅप्पीनेस कॅलिफोर्निया, USA यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत आपटे रस्त्यावरील हॉटेल रामी ग्रँड येथे हा कार्यक्रम आयोजिला आहे.



श्री भूपेंद्र जागतिक ख्यातीचे तत्वज्ञ-शास्त्रज्ञ, लेखक व अध्यात्मिक ऊर्जेचे प्रभावक आहेत. त्यांच्या ३० वर्षांच्या तपश्चर्येतून आपल्याला जीवनाचा अन्वयार्थ समजून घेता येणार आहे.

### आवाहन...


● चार तासांचा हा सोहळा शब्दांच्या पलीकडचे अनुभव देणारा असून, विद्यार्थ्यांपासून उद्योजकांपर्यंत, गृहिणींपासून कलाकारांपर्यंत आणि साधकांपासून विद्वानांपर्यंत सर्वांनाच काहीतरी घेऊन जाण्यासारखा आहे.

● यामध्ये सहभागी होण्यासाठी -

www.themetaawakening.com ला भेट द्यावी.

### यात्रा स्पेशलची सेवा रात्री १२ नंतरही सुरु

**पुणे :** गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांची सोय व्हावी यासाठी पीएमपी प्रशासनाने शेड्युलच्या गाड्यासह सुमारे ८०० जादा बस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. दोन टप्प्यात या जादा बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे. 'यात्रा स्पेशल' या नावाने या बस धावतील. दुसऱ्या शिफ्टनंतर धावणाऱ्या या बसचा प्रवास पाच रुपयांनी महाग होणार आहे. सध्याच्या तिकीट दरात पाच रुपयांची वाढ करण्याचा निर्णय पीएमपी प्रशासनाने घेतला आहे. तसेच रात्री १२ नंतर या बसेसमध्ये कोणत्याही प्रकारचा पास चालणार नसल्याचे पीएमपी प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मध्यवर्ती पुण्यातील रस्ता वाहतूक बंद झाल्यावर पर्यायी रस्त्याने पीएमपीच्या बसेसची वाहतूक केली जाणार आहे. शिवाय जादा बसेसची वाहतूक देखील केली जाणार असल्याचे पीएमपीने सांगितले आहे. यामध्ये पहिला टप्पा म्हणजेच रविवार ९ पासून सुरु होऊन १० आणि १६ सप्टेंबर रोजी १६८ जादा बसेस धावतील. तसेच ११ ते १५ सप्टेंबरदरम्यान ६२० जादा बसेस धावणार आहेत.



## RS NEWS DIGEST

**भक्तिभाव**

### सकल हिंदू समाजातर्फे वराह जयंती उत्साहात साजरी

**पुणे :** सकल हिंदू समाजाच्या वतीने भगवान विष्णूचा तिसरा अवतार असलेल्या श्री वराह भगवान यांचा जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कोंढवा बुद्रुक, हडपसर, कसबा पेठ, पर्वती, कात्रज, दौंडसह सांगली, कोल्हापूर व अन्य जिल्ह्यांतही हा जयंती सोहळा झाला. कोंढव्यातील प्रतिभाताई पवार शाळेच्या पटांगणात मिरवणूक काढण्यात आली. काळभैरवनाथ मंदिरात होमहवन झाले. महिला भजनी मंडळाची भजनसेवा, नादगर्जना ढोलताशा पथकाचे मनोहारी वादन व महाआरतीने जयंती सोहळ्याची सांगता झाली.





**सन्मान**

### ज्येष्ठ पखवाज गुरू पांडुरंग दातार लोकशिक्षक पुरस्काराने सन्मानित

**पुणे :** शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, सेवा मित्र मंडळ व ठाकूर परिवाराच्या वतीने कलासाधक व ज्येष्ठ पखवाज गुरु पांडुरग दातार यांना लोकशिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सनई चौघड्याच्या मंगल स्वरात पाषाण येथील पांडुरंग दातार यांचे निवासस्थानी अंगणात रांगोळी व दारावर मांगल्याचे तोरण बांधून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक यांच्या हस्ते ज्येष्ठ शिक्षक व शाहीर स्व. शशिकांत ठाकूर स्मरणार्थ पुरस्कार देऊन सन्मानित केले. मानाचा शाहिरी फेटा, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष पराग शिंदे, ढोल-ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर त्याचबरोबर शिरीष मोहिते उपस्थित होते.

**कोथरूड गणेश फेस्टिवल**

### रामदास फुटाणे यांच्या उपस्थितीत कविसंमेलनाचे आयोजन

**पुणे :** संवाद, पुणे व प्रबोधन विचारधारा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १४ व सोमवार, दि. १६ रोजी कोथरूड गणेश फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. 'तू म्हणशील तसं' या बहुचर्चीत नाटकाचा प्रयोग, मराठी कविसंमेलन आणि गायक, संगीतकार सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेच्या विविध पैलूंवरील सुंदर गीतांचा अविष्कार 'सत्य शिवाहून सुंदर हे!' अशा अनोख्या कार्यक्रमांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. फेस्टिवल कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे. कोथरूड गणेश फेस्टिवलचे उद्घाटन शनिवार, दि. 14 रोजी दुपारी 12 वाजता सुप्रसिद्ध अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांच्या हस्ते होणार असून कोथरूडचे प्रथम आमदार चंद्रकांत मोकाटे, लोकमान्य मल्टिपर्पज, को-ऑप सोसायटीच्या पुणे शाखेचे संचालक सुशील जाधव, बुलढाणा अर्बन को. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष देशपांडे, बढेकर ग्रुपचे चेअरमन प्रविण बढेकर, रवळनाथ को-ऑप फायनान्स सोसायटीचे चेअरमन एम. एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.





**गौरव**

### डॉ.राजेंद्र थोरात यांना राज्यस्तरीय 'शिक्षकदीप' पुरस्कार

**पुणे :** वारजे येथील संस्कार मंदीर महाविद्यालयाचे डॉ.राजेंद्र थोरात यांना शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल साहित्यदिप प्रतिष्ठान पुणे तर्फे 'राज्यस्तरीय शिक्षकदीप पुरस्काराने डॉ.अविनाश सांगोलेकर (सेवानिवृत्त मराठी विभागप्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) व प्रतिष्ठान चे अध्यक्ष ज्योत्स्ना चांदगुडे यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. थोरातांसह संजय मोहिते, संतोष तनपुरे, स्मिता पवार, जान्हवी खोलगडे, प्रसाद देशपांडे, संतोष पठारे, मनिषा साठे, तानाजी कांबळे, श्रीकांत ढमाळ यांनाही सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक ज्योत्स्ना चांदगुडे यांनी व निवेदन गीता राऊत यांनी केले. याप्रसंगी शिक्षक कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षकवृंद व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**क्राईम**

### गुंतवणुकीच्या आमिषाने १२१ जणांची नऊ कोटींची फसवणूक

**पुणे :** गुंतवणुकीच्या आमिषाने १२१ जणांची नऊ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी भालचंद्र महादेव अष्टेकर (रा. श्वेता कुंज अपार्टमेंट, साईबाबा मंदिराजवळ, वडगाव बुद्रुक) याच्याविरुद्ध फसवणूकीसह महाराष्ट्र ठेवीदारांचे वित्तीय संरक्षण ३ आणि ४ कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विजयकुमार मुरलीधर घाटे (वय ५४, रा. खडकवासला) यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अष्टेकरने त्याचे कार्यालय बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदारांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. प्राथमिक तपासात अष्टेकरने १२१ जणांची नऊ कोटी २ लाख ७३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. गुन्ह्याची व्याप्ती विचारात घेऊन संबंधित गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासासाठी सोपविण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक दीपाली भुजबळ तपास करत आहेत.



# न्यायाच्या शॉर्टकटवर ‘बुलडोजर’

झटपट न्याय ही बॉलिवूडपटांची हक्काची व आवडती संकल्पना! अनेक मसाला चित्रपटांनी कथानकाचा हा फॉर्म्युला वापरून आपले गल्ले भरले. पडद्यावर असा झटपट न्याय होत असताना चित्रपटगृह टाळ्यांनी आणि शिट्ट्यांनी दणाणून उठत असले तरी हा सगळा प्रकार काही घटकांच्या मनोरंजनासाठीचा आभासी खेळच! वास्तविक जीवनात कायद्याचे राज्य असते व न्याय कायदेशीर पद्धतीनेच व्हायला हवा. मात्र, हल्ली आभासी जग व वास्तव यातील फरकच आपण विसरून चाललो आहोत का? अशी शंका यावी असेच वातावरण आहे. नामचिन गुंडाला जमावाने मरेपर्यंत मारल्यावर वा सुरक्षा यंत्रणांनी अशा गुंडाचा खात्मा केल्यावर समाज म्हणून आपण त्याचे स्वागत करतो. बलात्काऱ्याला जाहीर शिक्षा देण्याची मागणी करतो, गुंड वा समाजकंटकांना कायद्याने नव्हे तर कायदा हातात घेऊन चाप लावण्याची मागणी करतो किंवा असा कायदा हातात घेणाऱ्यांचे अभिनंदन करतो, त्यांना डोक्यावर घेतो. हे सगळे पुढे जाऊन अराजकाची स्थिती निर्माण करणारे आणि त्यातून सामान्यांनाच होरपळीत घालणारे आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे की काय? अशीच शंका निर्माण होण्याची स्थिती आहे. विशेष म्हणजे ज्यांच्यावर कायद्याच्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आहे त्यांनाच हल्ली कायदा हाती घेण्याच्या या संकल्पनेची भुरळ पडली आहे. कठोर, शिस्तप्रिय प्रशासक अशी स्वत:ची प्रतिमा जनमानसात रुजवण्याच्या नादात कायदा हातात घेणाऱ्या राज्यकर्त्यांना आपण आपल्यावरील जबाबदारीलाच छेद देत असल्याचे भान राहिलेले नाही. त्यातून ‘बुलडोझर बाबा’, ‘बुलडोझर मामा’, ‘बुलडोझर भाई’ वगैरे तयार झाले व त्यांच्या चेल्याचपाट्यांनी त्यांच्या अशा कामगिरीला ‘लोकप्रिय’ वगैरे ठरवण्याचे उद्योग उघडपणे सुरू केले. मात्र, हा तथाकथित ‘झटपट न्याय’ सर्वांसाठी समन्यायी नाही, हेच अनेक घटनांमधून दिसून आले. याचाच अर्थ या झटपट न्यायाच्या चुकीच्या संकल्पनेचा उघड गैरवापरच सुरू झाला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयानेच या बुलडोझर संस्कृतीस बेकायदेशीर ठरवून त्यास चाप लावला याचे कायद्याच्या राज्यावर विश्वास व श्रद्धा असणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वागतच करायला हवे! झटपट न्यायाच्या नावाखाली दिल्लीतील जहांगीरपुरी, मध्य प्रदेशातील रतलाम, राजस्थानातील उदयपूर, उत्तर प्रदेशातील असंख्य ठिकाणी अल्पसंख्याक समाजाच्या आरोपींची घरे बुलडोझर लावून पाडण्यात आली. अशा कारवाईच्या विरोधात उच्च न्यायालयांमध्ये व सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाल्या होत्या. या याचिकांवर तोंडी मतप्रदर्शन करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई व न्या. के. व्ही. विश्वनाथन यांनी ‘आरोपींची घरे अशी जमीनदोस्त करून तडकाफडकी न्याय देण्याची कृती योग्य नाही,’ असे मत व्यक्त केले आहे. या घरात राहणाऱ्या इतर नागरिकांच्या मानवी अधिकारांचा मुद्दा या प्रकरणांमध्ये महत्त्वाचा आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने नेमकेपणाने त्यावरच बोट ठेवले आहे. घरात वास्तव्य करण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेतील एकविसाव्या कलमात अंतर्भूत आहे. हे कलम जगण्याचा आणि मूलभूत स्वातंत्र्याचा प्रत्येक नागरिकाचा अधिकार स्पष्ट करते. एखाद्या व्यक्तीच्या डोक्यावरचे छप्परच पाडून टाकणे हे त्या नागरिकाच्या मूलभूत अधिकारावरचे अतिक्रमणच आहे आणि न्यायालयाने तेच सूचित केले आहे. ‘एखाद्या वडिलांचा मुलगा गुन्हेगारी वर्तन करणारा आहे म्हणून या मुलाच्या आईवडिलांना बेघर करून रस्त्यावर आणणे योग्य आहे का?’, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे व तो अतिशय योग्यच आहे. अर्थात न्यायालयात आपल्या ‘झटपट न्याया’चे समर्थन प्रशासन वा राज्यकर्त्यांकडून अत्यंत हुशारीने केले जाते. समर्थन करताना आपण कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी झटत असल्याचेच चित्र रंगविले जाते. न्यायालयात उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी सांगितले की, गुन्हेगारी कारवायांबाबत अजिबात क्षमा न दाखविण्याचे उत्तर प्रदेश सरकारचे धोरण आहे आणि तेच यापुढेही कायम राहील आणि कोणतीही कारवाई करताना घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेतली जाईल. प्रत्यक्षात उत्तर प्रदेशात कशा ‘सिलेक्टिव्ह’ कारवाया झाल्या त्या सर्वांनीच उघड्या डोळ्यांनी बघितल्या आहेत. अशा कारवायांचे समर्थन करताना प्रशासनाकडून अतिक्रमण वा अवैध बांधकामाचा हुकमी मुद्दा वापरला जातो. मात्र, हे अतिक्रमण व अवैध बांधकाम होताना प्रशासन, सरकार काय करत होते? या प्रश्नावर प्रशासन, राज्यकर्ते मूग गिळून गप्प बसतात! शिवाय प्रशासन दरवर्षी शेकडो, हजारोंना अतिक्रमण व बेकायदा बांधकामाबाबत नोटिसा पाठवते. त्यातली किती बांधकामे बुलडोझर लावून पाडली जातात? अनधिकृत बांधकामांना संरक्षण मिळायलाच नको. मात्र, ते कारण पुढे करून प्रत्यक्षात ‘झटपट न्याय’ पूर्ण करणे कितपत योग्य आहे? न्यायाला विलंबामुळे वा गुन्हेगारांकडून कायद्यातील पळवाटांचा वापर होण्यामुळे कंटाळलेल्या जनतेला ‘झटपट न्याया’चे आकर्षण वाटणे साहजिक. मात्र या आकर्षणात धोकेच जास्त आहेत. पहिला धोका न्यायसंस्थेचे अप्रत्यक्ष अवमूल्यन होऊन कायद्याच्या राज्यावरचा विश्वास उडण्याचा तर दुसरा अशा कारवायांच्या नावाखाली राजकीय, धार्मिक, जातीय विद्वेषाची पोळी भाजून घेतली जाण्याचा असतो. हे वेळीच रोखले नाही तर अराजकाची स्थिती अटळ बनते आणि असे अराजक अंतिमत: सर्वसामान्यांच्या मुळावर उठणारेच असते. सर्वोच्च न्यायालयाने हा धोका लक्षात घेऊनच अशा ‘झटपट न्याया’ला कायद्याच्या राज्यात अजिबात स्थान नसल्याचे स्पष्ट केले आहे. कायद्याचे राज्य राबविताना कायद्यालाच बगल देणारे ‘शॉर्ट कट’ चालणार नाहीत, हा सर्वोच्च न्यायालयाचा इशारा हा देश व समाजहितासाठी अत्यंत मोलाचाच आहे. जर भारतात कायद्याचे राज्य आहे आणि राज्यकर्ते ‘सबका साथ, सबका विकास’च्या घोषणा देतात तर मग एखाद्यावर केवळ आरोप झाले म्हणून त्याचे घर वा इतर वास्तू बुलडोझर लावून उद्ध्वस्त करण्याची गरजच काय? न्यायालयाच्या टोकदार प्रश्नावर प्रामाणिक आत्मचिंतन करायला हवे!

**जागतिक बँकेकडून अलीकडेच प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या एक चतुर्थांश पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी भारताला ७५ वर्षे लागतील. एक प्रकारे २०४७ पर्यंत विकसित अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या संकल्पाची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यापूर्वीही विकसित देशांच्या सांगण्यावरून जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अनेक अटी लादून भारताच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला होता. वास्तविक, या अहवालकर्त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की आत्मनिर्भर भारताची जी रणनीती अवलंबली जात आहे ती जागतिक बँकेच्या निरर्थक तत्त्वांवर आधारित नाही, तर भूतकाळातून घेतलेल्या धड्यांचा आणि जागतिकीकरणाच्या आंधळ्या मार्गाने देशांतर्गत उद्योग उद्ध्वस्त झाल्याचा परिणाम आहे.**

# गरज खोडसाळपणाला उत्तर देण्याची

जागतिक बँकेकडून अलीकडेच प्रकाशित करण्यात आलेल्या एका अहवालाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या एक चतुर्थांश पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी भारताला ७५ वर्षे लागतील. याचाच अर्थ एक प्रकारे २०४७ पर्यंत विकसित अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या संकल्पाची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न या अहवालाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. जागतिक बँकेचा दावा आहे की हा अहवाल १०८ मध्यम-उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांच्या डेटावर आधारित आहे. या १०८ देशात एकूण जागतिक लोकसंख्येच्या ७५ टक्के लोक आहेत आणि जागतिक जीडीपीमध्ये या देशांचा वाटा ४० टक्के आहे.




या अहवालात भारत आणि इंडोनेशियाच्या औद्योगिक धोरणावर टीका करण्यात आली आहे, असे म्हटले आहे की, अतिवृद्धीद्वारे झटपट श्रीमंत होण्याऐवजी त्यांनी दीर्घकालीन, संथ पण स्थिर वाढ करण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे. असे सुचवण्यात आले आहे की मध्यम-उत्पन्न देशांनी देशांतर्गत तंत्रज्ञानाचा विकास सोडून द्यावा आणि इतर देशांनी, विशेषत: विकसित देशांनी आणि त्यांच्या कंपन्यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. कारण स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्यात संसाधनांचा अपव्यय होईल. मलेशिया आणि इंडोनेशियाप्रमाणे भारताने स्वत:चे तंत्रज्ञान विकसित करण्याचा प्रयत्न करू नये, असा इशारा यामध्ये देण्यात आला आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे भारताच्या अर्धसंवाहक धोरणावर आणि संरक्षण स्वावलंबन धोरणावरही टीका झाली आहे. ‘द इकॉनॉमिस्ट’ लिहिते की, भारताने ५०९ संरक्षण उत्पादनांच्या आयातीवर बंदी घातल्यानंतर भारत जगातील टॉप २५ संरक्षण निर्यातदारांच्या यादीतून बाहेर पडला आहे. सरकारी संरक्षण आणि भारतात नवीन (विदेशी) कंपन्यांच्या प्रवेशावरील निर्बंधांमुळे कार्यक्षम कंपन्याही कार्यक्षम राहू शकणार नाहीत, असे सांगण्याचा प्रयत्न अहवालात करण्यात आला आहे. अहवालात असे म्हटले आहे की अमेरिकन कंपनी ४० वर्षात आकाराने सरासरी सात पटीने वाढते, तर भारतात ती फक्त दुप्पट होते.

सदर अहवाल हा हेतूपुरस्सररित्या तयार केल्याचे दिसत असून त्याच्या मुळाशी असणारी कारणे शोधणे गरेजचे आहे. भारत सरकारने टेस्ला इलेक्ट्रिक कार कंपनीच्या अटी धुडकावून लावल्याने आणि आयात शुल्कात संपूर्ण सूट देण्यास नकार दिल्याने जागतिक बँक संतप्त झाल्याचे दिसत आहे. अहवालाच्या लेखकांना कदाचित माहित नसेल की भारताच्या ऑटोमोबाईल उद्योगाचे जगात स्वत:चे स्थान असून देशातील ऑटोमोबाईल कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन सुरू केले आहे. ऑनलाईन व्यवहारांमध्ये भारत झपाट्याने आगेकूच करत आहे, याची कबुली अहवालातच देण्यात आली आहे. आज अनेक देश भारताची युपीआय प्रणाली स्वीकारण्यास उत्सुक आहेत. भारताने हे तंत्रज्ञान विकसित केले असल्याने स्विफ्ट सारखी स्वतःची पेमेंट प्रणाली तयार करता आली. भारतात हे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतर व्हिसा आणि मास्टर कार्डसारख्या कंपन्या जवळपास बाजारातून निघून गेल्या आहेत. भारताने मित्र देशांकडून रुपयात तेल विकत घेण्यासारखे व्यवहार सुरू केले आहेत, जे अमेरिका आणि युरोपीय देशांना रुचलेले नाहीयेत.

अंतराळ क्षेत्र हे आणखी एक उदाहरण आहे, जिथे भारताने आपले स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केले आहे आणि

**डॉ. अश्वनी महाजन, अर्थतज्ज्ञ, नवी दिल्ली**


पीएसएलव्ही आणि चांद्रयानसारखे प्रकल्प यशस्वीपणे लाँच केले. चांद्रयान तयार करून, भारत हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील गडद बाजूला पोहोचणारा पहिला देश बनला. ज्या उद्दिष्टासाठी अमेरिकेला १६६ अब्ज डॉलर्स खर्च करावे लागले, ते भारतीय शास्त्रज्ञांनी अवघ्या ६१५ कोटी रुपयांमध्ये पूर्ण केले. भारताने या देशांकडून अंतराळ क्षेत्रातील तंत्रज्ञानाची मागणी केली असता ती साफ नाकारण्यात आली होती.

गेल्या पाच वर्षांत भारताच्या संरक्षण निर्यातीत अनेक पटींनी वाढ झाली आहे, हे जागतिक बँकेला समजून घ्यावे लागेल. संरक्षण क्षेत्रातील भारताच्या वाढत्या भूमिकेबद्दल जागतिक बँकेला चिंता वाटणे साहजिक आहे. कारण त्यामुळे विकसित देशांची संरक्षण बाजारपेठ आता संकुचित होत आहे. जागतिक बँक का विसरते की या सर्व तथाकथित ‘चुका’ असूनही, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. याउलट विकसित देश गंभीर चलनवाढ आणि आकुंचन किंवा स्थिरतेतून जात आहेत. कोविडोत्तर काळात आणि रशिया-युक्रेन युद्धानंतर आज युरोपातील बहुतांश देश कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत.

याउलट भारत पेमेंट बॅलन्समधील तुटीतून बाहेर पडत आहे. रुपया पूर्वीपेक्षा अधिक स्थिर आहे, पायाभूत सुविधांमध्ये सतत सुधारणा होत आहे, बौद्धिक संपदा सतत प्रगती करत आहे आणि पूर्वीपेक्षा कितीतरी पट अधिक पेटंट मंजूर केले जात आहेत. नवोन्मेषाला चालना देण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात १ लाख कोटी रुपयांचा निधी तयार करण्यात आला आहे. बहुआयामी दारिद्र्यात अभूतपूर्व घट झाली असून देशात कोट्यवधी बेघरांना घरे दिली जात आहेत. सरकारी मदत, वीज, पाणी, स्वच्छतागृहे, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमुळे गरिबांच्या जीवनात बदल होत आहेत. या सर्वांबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थांकडून भारताचे कौतुक केले जात आहे.

जागतिक बँकेने हे लक्षात घेतले पाहिजे की, पर्चेसिंग पॉवर पॅरिटीच्या निकषावर भारताचे दरडोई उत्पन्न सद्यस्थितीत १०,००० डॉलरच्या वर पोहोचले आहे, जे अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे उच्च उत्पन्नाचा देश होण्याच्या भारताच्या संकल्पाची खिल्ली उडवणे योग्य नाही.

अनेक समीक्षकांचा असा विश्वास आहे की जागतिक बँक भारताच्या विकासाच्या मार्गावर टीका करत असेल तर भारत नक्कीच योग्य मार्गावर आहे. कारण यापूर्वीही विकसित देशांच्या सांगण्यावरून जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अनेक अटी लादून भारताच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला होता. अहवालाच्या लेखकांना ‘मध्यम उत्पन्नाच्या सापळ्या’च्या नावाखाली त्यांचे युक्तिवाद बरोबर सिद्ध करावे लागतील.



त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की आत्मनिर्भर भारताची जी रणनीती अवलंबली जात आहे ती जागतिक बँकेच्या निरर्थक तत्त्वांवर आधारित नाही, तर भूतकाळातून घेतलेल्या धड्यांचा आणि जागतिकीकरणाच्या आंधळ्या मार्गाने देशांतर्गत उद्योग उद्ध्वस्त झाल्याचा परिणाम आहे. जागतिक बँकेचा अहवाल हा एक बेबनावी लेख आहे, ज्याचा तर्क आणि वास्तविकतेशी काहीही संबंध नाही. भारताने असे अहवाल केवळ नाकारले पाहिजेत असे नाही तर त्यांचा निषेधही नोंदवला पाहिजे. जागतिक बँकेनेही आपल्या विशेष दर्जाचा दुरुपयोग करता कामा नये.




## पंचांग

**सोमवार, दिनांक ९ सप्टेंबर २०२४ भाद्रपद शु.६, बृहस्पती पूजन श्री शके १९४६. नक्षत्र : विशाखा, योग : वैधृति, करण : कौलव, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू. सूर्योदय : स.०६.०१ सूर्यास्त : सायं.०६.२० वा. राहू काळ : सकाळी : ७:३० ते ९:००**

## दिनविशेष

*१०८७ : हेस्टिंग्जच्या लढाईत इंग्रजांचा पराभव करणाऱ्या विल्यम द कॉंकरचे फ्रान्समध्ये घोड्यावरून पडून निधन. *१७७६ : ब्रिटिशांविरुद्ध लढणाऱ्या तेरा राज्यांच्या युतीस युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका असे म्हणण्याचा निर्णय अमेरिकन कॉंग्रेसने घेतला. *१८५० : आधुनिक हिंदी साहित्याचे जनक मानले जाणारे साहित्यिक भारतेंद्र हरिश्चंद्र यांचा जन्म. सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय अशी विविध नाटके त्यांनी लिहिली. *१९४२ : हुतात्मा शिरीषकुमार स्मृतिदिन *१९९६ : भारत सरकारचा संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेमध्ये C.T.B.T. करारास तीव्र विरोध *१९४१ : लंडनवर प्रचंड बॉम्बवर्षाव. यात ३५० जर्मन विमानांनी भाग घेतला होता. तेव्हा इटालियनांनी तेल अव्हीववर बॉम्बफेक केली. *१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉयने तिसऱ्यांदा इंग्लिश खाडी पार करुन विक्रम केला. *२००३ : हायड्रोजन बॉम्बचे जनक एडवर्ड टेलर यांचे निधन.

## राशीभविष्य

***मेष** : वेळेत कामे पार पाडाल. ***वृषभ** : आधीच्या निर्णयांचा पश्चाताप. ***मिथुन** : सकारात्मक विचार करा. ***कर्क** : भाग्योदयाच्या घटना घडतील. ***सिंह** : विचारांना नवा आयाम मिळेल. ***कन्या** : जुन्या आठवणीत रमू नका. ***तुळ** : पतीच्या यशासाठी प्रयत्न कराल. ***वृश्चिक** : आळसात दिवस घालवाल. ***धनु** : मनाजोग्या घटना घडतील. ***मकर** : निर्णयतत्परता दाखवा. ***कुंभ** : आर्थिक आवक वाढेल. ***मीन** : जुनी येणी वसूल होतील.

## मेसेज आया

मैत्री म्हणजे विश्वास,
धीर आणि दिलासा
मनाची कळी उमलताना पडलेला
पहिला थेंब
मैत्री म्हणजे दोन जीवनामधला सेतू
मैत्रीचा दुसरा अर्थ मी आणि तू...!




## व्यक्तीविशेष

### माओ त्से तुंग

चीनमधील कम्युनिस्ट क्रांतीचे उद्‌गाता म्हूणन माओ त्से तुंग किंवा माओ झीडॉंग आपल्याला माहित आहेत. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १८९३ रोजी एका बौध्द कुटुंबात झाला. १९९९ मध्ये कॅम्युनिस्ट तत्वज्ञानाशी त्यांचा संपर्क आला आणि त्यांनतर त्यांनी १९३१ ते १९३४ या काळात जियांग्सी या छोट्या, डोंगराळ राज्यात माओनी सेविएत रिपब्लिक ऑफ चायना स्थापन केले आणि या राज्याचे ते अध्यक्ष बनले. हळूहळू त्यांनी आपले लष्कर स्थापण्यास सुरूवात केली आणि थोड्याच दिवसांत शिस्तबध्द आणि शूर कार्यकर्त्यांची फौज त्यांनी उभी केली. चीनच्या राजकारणात आता माओ त्से तुंग यांचा प्रभाव वाढू लागला. चलनचे राष्ट्रध्यक्ष चँग कै शे यांचा माओ त्से तुंग यांना विरोध होता. माओच्या लाल सैन्याने २१ जानेवारी १९४९ रोजी सत्ताधारी कोमिंटांग लष्कराचा दारूण पराभव केला. १० डिसेंबर १९४९ रोजी पहाटे लाल सैन्याने आपला शेवटचा विजय नोंदवला आणि चँग कै शेक यांना तैवानकडे पलायन करावे लागले. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट आल्यावर ९ सप्टेंबर १९७६ रोजी निधन होईपर्यंत माओ त्से तुंग चीनचे अध्यक्ष होते. ते लेखक आणि विचावंतही होते. त्यांचे तत्वज्ञान माओवाद म्हणून प्रसिध्द आहे.

## बोधकथा

### सहवासाची शिक्षा

एका शेतात वाळत घातलेले धान्य टिपण्यासाठी काही कावळे येत. त्यांच्यात एक कबूतरही येत असे. ते कुणाला कळेल न कळेल असे दाणे टिपत असे आणि गुपचूप बाजूला होत असे. शेतकरी कावळ्यांच्या या रोजच्या त्रासाला कंटाळला होता. त्याने एक जाळे आणले आणि धान्याच्या ठिकाणी पसरले. थोड्या वेळाने कावळे आले आणि धान्यावर तुटून पडले. त्यांच्यात ते कबूतरही अडकले. जवळ येणाऱ्या शेतकऱ्याला पाहून कबूतर म्हणाले, मी यांच्यापैकी नाही. खूप कायद्याने वागणारा आहे तू, मला सोड. शेतकरी म्हणाला, तू कसाही असलास तरी या चोरांबरोबर तू सापडला आहेस. आता त्यांच्याबरोबर तूही शिक्षा भोग. **तात्पर्य : माणसाचे मूल्यमापन तो ज्यांच्या सहवासात असतो, त्यांच्यावरून केले जाते.**

## भूगोल

### पृथ्वीवर जीवनसृष्टीची सुरूवात

पृथ्वी तयार झाल्यानंतर लाखो वर्षे त्यावर जीवसृष्टी आजिबात नव्हती. पृथ्वीवर जीवसृष्टी कशी तयार झाली याबद्दल अनेक मते आहेत. पण सर्वात मान्यताप्राप्त सिध्दांत आहे तो असा, कोट्यावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर प्रथम सेंद्रिय रचना अवतरल्या. या रचना समुद्राच्या पाण्यात होत्या. त्यांची काही रासायनिक कणांबरोबर संयोग झाल्याने या रचना तयार झाल्या असाव्यात. प्रोकारयोट्स, एकपेशीय आणि सूक्ष्म शेवाळे या सारख्या जीवाच्यात फोटोसिंथेसिस करण्याची क्षमता होती, त्यामुळे पृथ्वीवर ऑक्सिजन तयार झाला. नंतरच्या साधारण दहा कोटी वर्षांत पृथ्वीवर पुरेसा ऑक्सिजन तयार झाला. आणि मग प्रिकॅंब्रियन काळातील (५७ कोटी वर्षापूर्वी) काळात विकसित झाला. पृथ्वीवर वनस्पतींची उत्पत्ती डेव्होनियन काळात म्हणजे ४०-३६ कोटी वर्षांपूवी झाली. त्याकाळात ॲस्ट्रोक्सिलॉनसारख्या वनस्पती तयार झाल्या. या वनस्पतींनी हळूहळू आपल्यात पाणी धारण करणारी कटीकल म्हणजे पातळ आवरण तयार केले, त्यामुळे पूर्णत: पाण्यावरच अवलंबून राहण्याची त्यांची गरज संपली. साधारण ३६ कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर पहिले उभयचर प्राणी तयार झाले. ते जमिनीवर वावरत पण अंडी घालायला पाण्यातच जात. परंतु सरपटणाऱ्या प्राण्यांचा उदय झाल्यावर त्यांना पाण्यातील धोक्याचीही जाणीव झाली.

## नवं संशोधन

### १११ वर्षांनी परतली वाफेची कार

स्टीम कार म्हणजेच वाफेचे इंजिन असलेली कार आता तब्बल १११ वर्षांनंतर रेसिंग ट्रॅकवर परतली आहे. या कारवर रेसिंग ट्रॅकसाठी बंदी होती. मोटर स्पोर्टस रेग्युलेटर्सकडून लावण्यात आलेल्या शंभर वर्षे जुन्या प्रतिबंधामुळे ही कार लोकप्रिय अशा ऐतिहासिक रेसिंगमध्ये कधीही सहभागी होऊ शकली नव्हती. स्टीम कारचे चाहते असलेले डॉ. बॉब डायक यांनी ही बंदी हटवण्यासाठीचे प्रयत्न केले. त्यांनी अनेक वर्षे त्यासाठी मोटर स्पोर्टस असोसिएशनमध्ये लॉबिंग केले. त्यामुळे या कारवरील बंदी आता उठवण्यात आलेली आहे. आता बॉब यावर्षीचा रेसिंग सिझन सुरु होण्याची वाट पाहत आहेत. त्यांना तरुणपणापासूनच अशी कार बनवण्याचा छंद आहे. नुकतेच त्यांनी १९०५ चे मॉडेल असलेली स्टीम कार ‘विसलिंग बिली’मधून फेरफटका मारला. त्यांनी एक हजार यार्डांचे अंतर ९२.७ सेकंदांमध्ये पूर्ण करुन दाखवले. ते ब्रिटनच्या कॉर्नवॉलमधील पेंसेंज येथे राहतात. त्यांनी ताशी ३४.९ मैल वेगाने आपली कार चालवून दाखवली.

## सोडवा सुडोकू

**सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.**

**क्रमांक ४३१**


| | | | |
|---|---|---|---|
| | | 1 | 2 |
| 2 | | | |
| | | | 4 |
| 4 | 3 | | |

**क्रमांक ४३० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 4 | 1 | 2 | 3 |
| 2 | 3 | 1 | 4 |

## हास्यविनोद

**बनी**: माझ्या वाढदिवसाला काही तरी छान, महागडे गिफ्ट मला हवे आहे.
**बन्या**: ठीक आहे !
वाढदिवशी.....
**बन्या**: हे घे तुझे गिफ्ट
**बनी**: अरे वा ! काय आणलं आहेस?
**बन्या**: गरमागरम कांदा भजी!



## महिलायन

### सफाई किचनची

कोणत्याही सुंदर आणि स्वच्छ घरामध्येच उत्तम आरोग्याचं रहस्य दडलेलं असतं. घरातील प्रत्येक सदस्याने घरातील प्रत्येक कोपरा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी उचलली पाहिजे. किचन हा घराचा महत्त्वाचा भाग असतो आणि रोज तेथे स्वयंपाक करताना तेथे घाण होते. किचन स्वच्छ नसेल तर घरातील प्रत्येक व्यक्तीला आजार जडू शकतात. किचनमध्ये अशा अनेक गोष्टी असतात की ज्या रोज साफ करण्याची गरज असते. त्यामुळे किचनमधील कोणत्या गोष्टी कशा साफ कराव्यात हे जाणून घेतलं पाहिजे. आजकाल प्रत्येक किचनमध्ये मायक्रोव्हेव असतो. त्याच्या स्वच्छतेसाठी मायक्रोवेव्हच्या एका कोपऱ्यात दोन कप पाणी टाकावं आणि त्यामध्ये लिंबाचा रस मिसळावा. **(पूर्वार्ध)**



## घरगुती औषध

### काजू (२)

खडीसाखर व काजुगराचे समभाग चूर्ण घेतले असता चांगली शक्ती येते व भूक शांत होते. काजूचा चीक शरीराला लागला असता फोड येतो. बद व कठीण गाठी हा चीक लावला असता त्वरित फुटतात. कोणताही न वाहणारा व्रण असेल तर हा चीक लावला असता वाहू लागतो. पावसाळ्यात पायास फार चिखल्या होतात. त्यावेळी हा चीक लावला असता बऱ्या होतात. मणेरीच्या विषावर काजूच्या सालीचा रस पाव लिटरपर्यंत पोटात दिला असता विष उतरते. अलीकडे काजूपासून निघणारे डामर कुष्ठनाशक आहे. असे सिध्द झाले आहे.


### अंड्याच्या टरफलाचे शोपीस

आपण अंडे खाताना त्याची टरफले फेकून देतो. पण ही टरफले काळजीपूर्वक फोडली तर त्यापासून छानसे शोपीस तयार करता येते. अंड्याला एकाच बाजूने छोटेसे छिद्र पाडून आतील बलक काढून घ्यावा. नंतर ही टरफले स्वच्छ करून घ्यावीत. स्वच्छ केलेली अंडी कोरडी झाल्यानंतर हलक्या हाताने ती पुसून घ्यावीत. या टरफलांवर हलक्या हाताने पेन्सिलच्या सहाय्याने हवे तसे डिझाईन काढावे. उदा. पत्त्यांमधील राजा, राणी, बाहुल्यांचे चेहरे, पक्षी, फुले, झाड, चंद्र असे काहीही काढता येईल. अंड्यावर चेहरे काढले असतील तर ते अधिक सुशोभित करण्यासाठी वूल आणि रंगीत कागदाचा वापर करता येईल. मिशी आणि केसांसाठी याचे बारीक तुकडे लावता येतील. दुसरे डिझाईन काढले असेल तर रंग व ब्रशच्या सहाय्याने ते रंगवावेत. तयार झालेले हे शोपीस भिंतीवर चिकटवू शकता. अशी ही गमतीशीर कलाकृती घरी नक्की करून बघा.

‘राष्ट्र संचार’ हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com


# अतिशीतावस्थेत जगणारा जीवाणू



जीवाणू आणि विषाणूंची दुनिया अनोखीच असते. त्यांची विपरीत परिस्थितीतही तग धरून राहण्याची क्षमता माणसाला चकित करीत असते. कॅनडातील अतिउंचीवरील आर्क्टिक भागात जीवाणूंसाठी अतिशय थंड मानल्या जाणाऱ्या तापमानाला जीवाणूची एक प्रजाती जिवंत स्वरूपात सापडली आहे. एरवी एवढे कमी तापमान मंगळाच्या पृष्ठभागावर असते, त्यामुळे तेथेही जीवाणू तग धरून राहू शकतात, असा वैज्ञानिकांचा निष्कर्ष आहे. मॅकगिल विद्यापीठातील वैज्ञानिकांनी शोधलेला हा जीवाणू एलेसमीअर बेटावर उणे २५ अंश सेल्सिअस तापमानाला सापडला आहे.

शनीचा चंद्र असलेला एन्सिलाडस व मंगळ या दोन्ही ठिकाणी सूक्ष्मजीवांच्या अस्तित्वासाठी नेमक्या काय पूर्वअटी असाव्यात, यावर काही महत्त्वाचे धागेदोरे त्यामुळे हाती येऊ शकतात. प्रा. लायल व्हाईट व त्यांच्या सहकारी नादिया मायकिटझुक यांनी शोधलेल्या या नव्या जीवाणूचे नाव 'हॅलोक्रायोफिलस ओआर १' असे आहे. आर्क्टिक वर्तुळातील किमान २०० सूक्ष्मजीवांची तपासणी करून त्यांना हा असा जीवाणू सापडला की, जो आर्क्टिक पर्माफ्रॉस्टमधील शीत तापमानात जगू शकतो. एलेसमीअर बेटावर गोठलेल्या अवस्थेतील गोठलेल्या खारट पाण्यात तो जगला असावा, असे व्हाईट यांचे मत आहे. पमाफ्रॉस्ट ब्राइन व्हेन्समधील क्षार हे पाणी त्या तापमानाला गोठलेले ठेवतात, त्यामुळे अधिवासानुकूल परिस्थिती बनत असली तरी तेथे टिकून राहणे फार अवघड असते. कारण, उणे २५ अंश तापमानाला श्वासोच्छ्वासाची क्रिया अवघड असते. परंतु, या जीवाणूंच्या पेशी रचनेत असे काही बदल होतात की, ज्यामुळे त्यांच्यात थंडीतही टिकून राहण्याची क्षमता निर्माण करणारी प्रथिने तयार होतात. त्यांच्या पारपटलातही बदल होतात.

त्यामुळे प्रतिकूल हवामानाचा त्यांच्यावर परिणाम होत नाही. या जीवाणूंच्या पेशीत काही संयुगे मोठ्या प्रमाणात बनतात, ज्यामुळे त्यांचा गोठण्यापासून बचाव होतो.



# आकाशगंगेत पृथ्वीसारखे अनेक ग्रह?



नासाच्या केप्लर दुर्बिणीच्या मदतीने खगोलवैज्ञानिकांनी असे सहा यजमान तारे शोधले आहेत, ज्यांच्या कक्षेत पृथ्वीच्या आकाराचे ग्रह फिरत आहेत. आपल्या आकाशगंगेत असे १७ अब्ज ग्रह फिरत आहेत. केप्लर दुर्बिणीच्या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर १७ टक्के ताऱ्यांभोवती पृथ्वीच्या आकाराचे व बुधाइतक्या जवळच्या कक्षेतून फिरणारे ग्रह असल्याचे निष्पन्न झाले आहे. आकाशगंगेत अंदाजे शंभर अब्ज तारे असून, त्यातील १७ टक्के तार्‍यांभोवती पृथ्वीसारखे ग्रह आहेत, त्याचा दुसरा अर्थ तिथे जीवसृष्टीचे अस्तित्व असू शकते. निरीक्षणाच्या पहिल्या सोळा महिन्यांत असे २४०० ग्रह सापडले आहेत. हार्वर्ड स्मिथसॉनियन सेंटर फॉर फिजिक्स या संस्थेचे फ्रँकॉईस फ्रेसिन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केप्लर पाहणीतील माहितीचा वापर करून अशा ग्रहांचा अंदाज वर्तवला आहे. खगोलभौतिकिय अशा काही गुणधर्मांची यादी उपलब्ध असते, ज्यात ग्रहीय संदेशांची नक्कल केलेली असते पण त्यात केप्लर पाहणीतील ग्रहांसारख्या एक दशांश ग्रहांचेच अस्तित्व कळू शकते. केप्लर मोहिमेतील सध्याच्या निरीक्षणानुसार सूर्यासारख्या सर्वच ताऱ्यांभोवती असे ग्रह फिरत असण्याची शक्यता आहे. एकूण १७ टक्के ताऱ्यांच्या भोवती पृथ्वीच्या ०.८ ते १.२५ पट मोठ्या आकाराचे ग्रह असून त्यांचा कक्षाकाळ हा ८५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी आहे. एक चतुर्थांश ताऱ्यांभोवती महापृथ्वीसारखे ग्रह (म्हणजे पृथ्वीच्या १.२५ ते २ पट) फिरत असून, त्यांचा कक्षाकाल हा १५० दिवसांचा आहे. साधारण तेवढ्याच ताऱ्यांभोवती मिनी नेप्च्यूनसारखे (पृथ्वीच्या २ ते ४ पट मोठे) ग्रह आहेत, त्यांचा कक्षाकाल २५० दिवस आहे. साधारण तीन टक्के ताऱ्यांच्या भोवती पृथ्वीच्या ४ ते ६ पट मोठे मोठ्या नेप्च्यूनसारखे ग्रह दिसून येतात, तर केवळ पाच टक्के ताऱ्यांभोवती पृथ्वीच्या ६ ते २२ पट मोठे ग्रह आहेत, त्यांचा कक्षाकाल ४०० दिवस किंवा त्याहून कमी आहे. कॅलिफोर्निया येथील अमेरिकन अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटीच्या सभेत हे संशोधन सादर करण्यात आले. द अॅस्ट्रोफिजिकल मध्ये हे संशोधन प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# कॉकरोच, नव्हे रोबोरोच!

इकडे तिकडे तुरुतुरु धावणारे झुरळ तुमच्या स्मार्ट फोनने केलेल्या नियंत्रणाप्रमाणे हालचाली करू लागले तर.. ही कल्पना वैज्ञानिकांनी प्रत्यक्षात आणली असून, झुरळालाच सायबोर्ग केले आहे. झुरळाच्या शरीरात एक चिप टाकून त्याचे नियंत्रण करण्याचा प्रयोग यशस्वी केला आहे. या मानव नियंत्रित झुरळ बनवण्याच्या प्रकल्पाचे नाव रोबोरोच असे असून, बॅकयार्ड ब्रेन्स या नावाने प्रसिद्ध असलेल्या मिशिगनमधील अॅन अरबोर येथील शिक्षण संशोधकांनी ते तयार केले आहे.





रोबोरोच प्रकल्पात तीन घटक आहेत एक म्हणजे शस्त्रक्रिया करून इलेक्ट्रिक सिम्युलेटर बसवलेले झुरळ, झुरळाच्या आकाराचा बॅकपॅक ज्याच्यातून संदेश स्मार्ट फोनपर्यंत जातो व असे एक उपकरण ज्याच्या मदतीने झुरळाला आदेश देता येतील. झुरळे ही आजूबाजूच्या भागांचा अंदाज हा त्यांच्या डोक्यावर असलेल्या दोन लांबलचक केसांसारख्या अँटेनामुळे घेत असतात. जेव्हा या अँटेनाचा स्पर्श एखाद्या पदार्थाला होतो तेव्हा त्यांच्यातील न्यूरॉन मेंदूकडे विद्युत संदेश पाठवतात, त्यामुळे मध्ये अडथळा आहे हे झुरळाला समजते. झुरळाची दिशा नियंत्रित करण्यासाठी याचाच वापर करून घेतला आहे. संशोधकांनी झुरळाच्या अँटेना एक इलेक्ट्रिक सिम्युलेटर बसवला त्यात झुरळाचा एक पाय काढून टाकला जातो. त्यानंतर झुरळाच्या पाठीवर एक बॅकपॅक बसवला जातो तो कंट्रोल इंटरफेसने सिम्युलेटरला जोडतात, या ठिकाणी स्मार्ट फोन हा कंट्रोल इंटरफेस आहे. त्यानंतर वापरकर्ता व्यक्ती झुरळाला कसे फिरवायचे ते नियंत्रण हातात घेते. स्क्रीनवर अंगठा डावीकडे किंवा उजवीकडे फिरवून ते केले जाते. स्क्रीनला स्पर्श करताच झुरळाच्या अँटेनाला विद्युत संदेश जातो त्यामुळे त्याला अडथळा आला आहे असे वाटते. त्यामुळे ते दिशा बदलते.

# कमी होतंय वाय गुणसूत्र?

एका संशोधनात धक्कादायक तथ्य समोर आले आहे. त्यानुसार पुरुष लिंग ठरवणारे वाय हे गुणसूत्र कोट्यवधी वर्षांच्या काळाच्या ओघात झपाट्याने कमी होत आहे. अशावेळी जेनेटिक बदल झाले तर काय होईल, असा प्रश्न अगदी सहज पडू शकतो. संशोधकांना भीती आहे की, मनुष्य जातीच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून हा सर्वात मोठा धोका आहे. नेमके यामागचे कारण काय?



आपण सुरुवातीला एक्स आणि वाय गुणसूत्रांबाबत जाणून घेऊया. स्त्रीच्या शरीरात दोन एक्स गुणसूत्रे असतात, तर पुरुषांमध्ये एक एक्स व दुसरे वाय गुणसूत्र असते. स्त्री-पुरुषांच्या मिलनावेळी, स्त्रीकडे केवळ एक्स गुणसूत्रेच असल्याने तिच्याकडून एक्स हेच गुणसूत्र येत असते, तर पुरुषाकडून एक्स किंवा वाय यापैकी एक गुणसूत्र येत असते. ज्यावेळी गर्भात स्त्रीकडून आलेले एक्स व पुरुषाकडून आलेले वाय ही गुणसूत्रे एकत्र येतात तेव्हा मुलगा जन्माला येतो. जेव्हा गर्भात स्त्रीकडून आलेले एक्स व पुरुषाकडूनही आलेले एक्स गुणसूत्रे एकत्र येतात तेव्हा मुलीचा जन्म होतो. (याचा अर्थ मुलगा होईल की, मुलगी हे स्त्रीवर नव्हे, तर सर्वस्वी पुरुषावरच अवलंबून असते!) मात्र आता वाय गुणसूत्राचा ऱ्हास होत चालल्याचे दिसून आले आहे. यामुळे पुरुष प्रजाती आणि कालांतराने पर्यायाने मानवजात नष्ट होणार असल्याचं म्हटलं जातं. मानव आणि प्लॅटिपस वेगळे झाल्यापासून १६६ दशलक्ष वर्षांत, वाय गुणसूत्राने मोठ्या संख्येने सक्रिय जीन्स गमावले आहेत. आता ९०० वरून फक्त ५५ पर्यंत वाय गुणसूत्र असल्याचं सांगण्यात येत आहे. हा कल असाच सुरू राहिल्यास, वाय गुणसूत्र पुढील ११ दशलक्ष वर्षांत पूर्णपणे नाहीसे होऊ शकते. या संशोधनावरून अशी चर्चा रंगली आहे की, वायगुणसूत्रे हळूहळू लोप होत चालली आहेत. प्रोसिडिंग्स ऑफ द नॅशनल अॅकॅडमी ऑफ सायन्सेसमधील एका शोधनिबंधात याबाबतची माहिती दिलेली आहे. मानव एक नवीन लिंग-निर्धारित जनुक विकसित करू शकतो, असे त्यामध्ये म्हटले आहे. पण, ते इतके सरळ नाही आणि त्याचा विकासदेखील अनेक धोके घेऊन येईल. संशोधकांनी वर्तवलेल्या भीतीनुसार, वाय गुणसूत्र लोप पावत चालल्यामुळे पुरुष प्रजात नामशेष होईल. यामुळे जगात फक्त महिला राहतील. पण, महिला राहिल्यावर फक्त एक्स एक्स गुणसूत्रे असतील. वाय गुणसूत्रांची कमतरता भासली, तर एक्स-वाय यांचा मिलाफ न झाल्यामुळे पर्यायाने मानव जातच नष्ट होईल.

# गर्भाशयात बाळ ओळखते आईचा आवाज

गर्भाशयात असतानाच बाळाला आईचा आवाज समजतो, जेव्हा आई गोष्ट वाचते तेव्हा बाळ ते लक्ष देऊन ऐकत असते, असे एका संशोधनात आढळून आले आहे. अमेरिकेतील जॉन हॉपकिन्स विद्यापीठातील संशोधकांनी ३६ आठवड्यांच्या ७४ गर्भवती महिलांना दोन मिनिटे पुस्तकातील गोष्ट वाचायला सांगितली. त्यानंतर त्यांच्या गर्भाशयातील बाळांच्या हृदयाचे ठोके व हालचाली यांचे निरीक्षण करण्यात आले. त्यात असे निदर्शनास आले, की आई गोष्ट वाचत असताना गर्भाशयात असलेल्या बाळांनी हालचाल थांबवली व त्यांच्या हृदयाचे ठोकेही मंदावले.



प्रमुख संशोधक क्रिस्टीन व्होगटलाईन यांनी सांगितले, की गर्भ मातेचा आवाज ओळखण्यास कसा शिकतो व त्याला जन्मापूर्वीपासूनच कसा प्रतिसाद देतो हे मोठे गमतीशीर आहे. या प्रयोगातील काही स्त्रिया पुस्तक मोठ्याने वाचण्यापूर्वी डुलकी घेत होत्या, पुस्तक वाचन सुरू करताच गर्भनिही सावध होऊन ऐकण्यास सुरुवात केली. त्यांच्या हृदयाचे ठोके कमी झाले व हालचाली मंदावल्या. या मातांच्या गर्भाशयात असलेल्या गर्भाची श्रवण संस्था परिपक्व होती व ते खात्रीशीरपणे आवाज ओळखत होते व त्याला प्रतिसादही देत होते, असे व्होगटलाईन यांनी हेराल्ड सनला सांगितले. विशेष म्हणजे आईच्या आवाजाने गर्भावस्थेतील बाळाची श्रवण यंत्रणा विकसित होण्यासाठीही मदत होत असते. इन्फँट बिहेवियर अँड डेव्हलपमेंट जर्नल या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

# डार्क मॅटर अदृश्य का आहे?

या विश्वातील अनेक रहस्ये ही अद्याप पुरती उलगडलेली नाहीत. त्यामध्येच डार्क मॅटर किंवा कृष्णद्रव्याचा समावेश होतो. विश्वातील द्रव्यापैकी ८५ टक्के द्रव्य हे कृष्णद्रव्य आहे; पण ते अदृश्य आहे, याचे कारण म्हणजे त्यात अतिशय दुर्मीळ स्वरूपाचे डोनट आकाराचे विद्युतचुंबकीय क्षेत्र आहे व आधी प्रस्तावित केल्याप्रमाणे खूप वेगळ्या प्रकारची बले नाहीत, असे एका अभ्यासात निष्पन्न झाले आहे.



अमेरिकेतील व्हँडरबिल्ट विद्यापीठातील भौतिकशास्त्रज्ञांच्या मते कृष्णद्रव्य हे मजोरना फर्मिऑन या मूलभूत कणांचे बनलेले आहे. या कणाचे अस्तित्व १९३० च्या सुमारास वर्तवण्यात आले होते. कृष्णद्रव्य हे मजोरना कणांचे बनलेले असते हे अनेक भौतिकशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. पण, प्रा. रॉबर्ट शेअरर व त्यांचे शिष्य शिऊ मॅन हो यांनी काही गणिती आकडेमोडीच्या आधारे असे दाखवून दिले की, हे कण अॅनापोल नावाचे डोनटच्या आकाराचे विद्युतचुंबकीय क्षेत्र धारण करण्यास सुयोग्य आहेत. हे विद्युतचुंबकीय क्षेत्रच या कणांना इतर कणांपेक्षा वेगळे गुणधर्म प्राप्त करून देत असते. इतर कण हे साधारण विद्युतचुंबकीय क्षेत्र धारण करीत असतात, ज्यात उत्तर-दक्षिण ध्रुव, धन व ऋण भार असतात. कृष्णद्रव्याची अनेक प्रारूपे असे मानतात की, अनेक वेगळ्या बलांचा संबंध कृष्णद्रव्याशी येतो, ज्या बलांना आपण रोजच्या जीवनात सामोरे जात नाही. अॅनापोल शिकतो त्या कृष्णद्रव्य हे आपण शाळेत शिकतो त्या साधारणतः विद्युतचुंबकीय क्षेत्राचा वापर करीत असते, याच बलामुळे चुंबक लोखंडाला चिकटतात. अॅनापोल कृष्णद्रव्याचे अस्तित्व आहे किंवा नाही याचा फैसला लवकरच प्रयोगांती होईल, असे शेअरर यांचे मत आहे. फर्मीऑन हे इलेक्ट्रॉन व क्वार्कचे बनलेले असतात व ते द्रव्याचे मूलभूत घटक आहेत. त्यांचे अस्तित्व १९२८ मध्ये पॉल डिरॅक यांनी दाखवून दिले होते. मजोरना फर्मिऑन्स हे विद्युतदृष्ट्या उदासीन मूलभूत सममितीमुळे निसर्गतः ते अॅन्टिकण असतात व ते इतर विद्युतचुंबकीय गुणधर्म अंगीकारू शकत नाहीत असे हो यांचे म्हणणे आहे. अॅनापोल कृष्णद्रव्य कण असल्याचे हो व शेअरर यांनी सुचवले आहे. त्यांच्या मते हे कण विश्वाच्या निर्मितीच्या सुरुवातीच्या काळात प्रस्तावित इतर कृष्णद्रव्यांच्या कणांसारखेच नष्ट झाले व उर्वरित कणांनी कृष्णद्रव्य बनले असावे, असे ते म्हणतात.

# भोपळा? नव्हे वांगे

जगात कधी काय होईल आणि कधी काय होणार नाही, हे सांगता येत नाही. पण, अशा काही घडामोडी होतात ज्यामुळे अनेक जण आश्चर्यचकित होऊन जातात. कधी तर आपल्याच डोळ्यांवर आपल्याला विश्वास बसत नाही. अशाच काही गोष्टी आणि घडामोडी विश्वविक्रम बनवून जातात. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सतत कोणते ना कोणते अतिशय वेगळे आणि रंजक रेकॉर्ड नोंदवले जात असतात. असेच एक रेकॉर्ड सध्या जगात चर्चेचा विषय ठरलं आहे. हे रेकॉर्ड कोणी व्यक्तीने नाही तर एका वांग्याने केलं आहे. तुम्हाला हे खोटं वाटेल; पण हे खरं आहे. हे वांगे चक्क भोपळ्याइतके मोठे आहे !



वांगं म्हटलं तर त्याचा एक विशिष्ट आकार असतो. विशिष्ट असं वजनही असतं. मात्र, एका व्यक्तीने लावलेल्या वांग्याने सर्वांनाच आश्चर्यचकित केलं आहे. हे वांगं आहे की भोपळा आहे, असा प्रश्न हे वांगं पाहिल्यानंतर सर्वांनाच पडला आहे. एखाद्या वांग्याचे वजन साधारणपणे १५० ते २०० ग्रॅम असते. काही वेळा तर या पेक्षाही लहान वांगी आपल्याला पाहायला मिळतात. या वांग्याची लागवड डेव बेनेट या व्यक्तीने केली आहे. त्यांच्या शेतातील एका वांग्याचे वजन तब्बल ३.७७ किलो भरलं आहे. हे एक रेकॉर्ड आहे. एवढ्या वजनाचं वांगं या आधी कुणीही उत्पन्न केलं नव्हतं. त्यामुळे या वांग्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. या वांग्याचा आकार एखाद्या भोपळ्याएवढा आहे. सर्वसामान्य वांग्यापेक्षा याचे वजन जवळपास दहा पट जास्त आहे. अमेरिकेत राहणारे डेव यांनी याची लागवड एप्रिल महिन्यात केली होती. रेकॉर्ड किपरवर याबाबतची माहिती देण्यात आली होती. शिवाय हे जगातलं सर्वात मोठं वांगं असल्याचेही जाहीर करण्यात आले होते. एप्रिलमध्ये लावण्यात आलेले हे वांगे ३१ जुलैला कापण्यात आले. त्यानंतर त्याचे वजन ही करण्यात आले. त्यावेळी ते जगातले सर्वात मोठे वांगे असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्याची जागतिक विक्रमात नोंद झाली. या वांग्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर अपलोड करण्यात आला आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकृत इन्स्टाग्रामवर तो शेअर करण्यात आला आहे.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सांगण्यात आले आहे की, डेव बेनेट यांनी लावलेले वांगे हे ३.७७८ किलोचे आहे. त्यावर अनेक प्रतिक्रिया आल्या आहेत.

# शिशामुळे पर्यावरण ऱ्हास

मानवामुळे समुद्रतळापासून पर्वतशिखरांपर्यंत, हवेपासून ते अंतराळापर्यंत सर्वत्र प्रदुषण झालेले पाहायला मिळते. मात्र, प्रदूषण ही काही आजचीच समस्या नाही. हे प्रदूषण नेमके कधी सुरु झाले असावे, याबाबत एक माहिती संशोधनात हाती आली असून, सुमारे आठ हजार वर्षांपूर्वी शिशामुळे पर्यावरणाचे प्रदूषण झाले होते असे दिसून आले आहे. पीटसबर्ग विद्यापीठाच्या संशोधकांच्या मानवाने केलेल्या शिशाच्या प्रदूषणाचे पुरावे मिशिगनच्या अतिउत्तरेकडे मिळाले आहेत. खाणीतून व इतर मानवी कृतींमुळे होणारे धातूंचे प्रदूषण त्या काळातही युरोप, आशिया व दक्षिण अमेरिकेत अधिक होते, असे स्पष्ट झाले.



भूगर्भशास्त्र व ग्रहविज्ञान विभागातील पीएच. डी. संशोधक डेव्हिड पॉम्पियानी यांनी असे म्हटले आहे की, तळी किंवा सरोवरातील खडकांचा अभ्यास करून मूळ निवासी अमेरिकन लोकांचा पर्यावरणावर पडलेला प्रभाव तपासता आला. ग्रेट लेक्स्च्या पुरातत्त्वशास्त्रीय नोंदी व पर्यावरण इतिहास यातून स्पष्ट होत आहे हे या संशोधनाचे महत्त्व आहे. मिशिगनच्या केवीनों द्वीपकल्पाची तपासणी संशोधकांनी केली. कारण, उत्तर अमेरिकेत तांब्याचा तो मोठा स्रोत होता. इ. स. १८०० च्या सुमारास जी सर्वेक्षणे करण्यात आली त्यात इतिहासपूर्वकालीन काळात खाणकाम होते असे दिसून आले. त्यात वापरली जाणारी साधनेही मिळाली आहेत. खाणींच्या खड्ढांजवळच्या तीन तलावांतील खडक जून २०१० मध्ये गोळा करण्यात आले होते, त्याच्या आधारे तांब्याचे खाणकाम केव्हा झाले व त्यामुळे प्रदूषण कसे होत गेले याचा मागोवा घेण्यात आला. खडकांच्या नमुन्यात शिसे, टिटॅनियम, मॅग्नेशियम, लोह, सेंद्रिय पदार्थ यांचा अंश दिसून आला. त्यात विशेष म्हणजे शिशाचे प्रदूषण दहा हजार वर्षे टिकून राहिले आहे. केवीनॉ द्वीपकल्पात आठ हजार वर्षांपूर्वी तांब्याच्या खाणकामामुळे हे प्रदूषण घडून आले असे पॉम्पियानी यांनी म्हटले आहे. आशिया, युरोप व दक्षिण अमेरिका या भागांतील शिशाच्या प्रदूषणाचे तीन हजार वर्षांपूर्वीपर्यंतचे पुरावे सापडले आहेत. एनव्हिरॉनमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

## मेट्रो कमविणार दरवर्षी कोट्यवधी रुपये

# महानगरपालिकेच्या जागांवर मेट्रोचा 'डोळा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (महामेट्रो) पिंपरी-चिंचवड महापालिकेने दापोडी ते पिंपरी या मार्गावरील मोक्याच्या ठिकाणावरील १० जागा दिल्या आहेत. आता महामेट्रोला पिंपरी ते निगडी मार्गावरील आणखी १५ जागा देण्याची प्रक्रिया सुरू आहे. या सर्व जागा स्वतःच्या ताब्यात घेऊन त्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारून महामेट्रो आपली तिजोरी भरणार आहे. स्वत: जागा विकत घेणारी 'श्रीमंत' पालिका कोट्यवधी रूपये किमतीच्या त्या जागा मेट्रोला फुकटात देणार का, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

महामेट्रोने शहरात दापोडीच्या हॅरिस पुल ते चिंचवडच्या मदर टेरेसा उड्डाण पुलापर्यंत मेट्रोचा मार्ग तयार केला आहे. महापालिकेने या मार्गावरील मोक्याच्या विविध १० जागा महामेट्रोस ३० वर्षे भाडे तत्वावर दिल्या आहेत. त्याचे एकूण क्षेत्रफळ २ लाख ३९ हजार चौरस फूट इतके आहे. त्याचे ३० वर्षांचे भाडे २८ कोटी १६ लाख ९६ हजार ३१२ रूपये आहे.सर्वसाधारण सभेची ११ एप्रिल २०१८ ला मान्यता घेऊन त्या जागा महामेट्रोला हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या वाहनांसाठी पार्किंग विकसित करावे, या उद्देशासाठी त्या जागा महामेट्रोच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. महामेट्रोला त्या जागा इतरांना हस्तांतरीत करता येणार नाहीत. त्या भाड्याने देता येणार नाहीत, अशी अट महापालिकेने घातली आहे.


मेट्रो तिकीटाशिवाय इतर उत्पन्न वाढावे म्हणून पालिकेकडून प्राप्त झालेल्या त्या जागांवर व्यापारी संकुल उभारून उत्पन्न घेता यावे, अशी मागणी महामेट्रोने राज्य सरकारकडे २०२३ ला केली आहे. जागेची मालकी मिळावी किंवा बिनशर्त दीर्घ मुदतीने भाडे तत्वावर त्या जागा मिळाव्यात, अशी महामेट्रोने सरकारला विनंती केली आहे. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारने महापालिकेकडून त्याबाबत अभिप्रायही घेतला आहे.महापालिका विविध विकासकामासाठी संरक्षण विभाग, रेल्वे, वन विभाग, पीएमआरडीए (प्राधिकरण) आणि इतर विभागांकडून विकत जागा घेते. त्याचा चालू बाजारभावानुसार मूल्य जमा करते. बोपखेल व मिलिटरी डेअरी फार्म पुलाकरीता आवश्यक जागेसाठी महापालिकेने संरक्षण विभागाकडे कोट्यवधी रूपये जमा केले.

मेट्रो कमविणार दरवर्षी कोट्यवधी रुपये शहरातील दापोडी ते निगडी या मार्गावरील मोक्याच्या जागा विनाशुल्क घेऊन महामेट्रो त्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारणार आहे.

> महापालिकेने दिलेल्या जागांची मालकी मिळावी किंवा बिनशर्त दीर्घ मुदतीने भाडे तत्वावर त्या जागा मिळाव्यात, अशी मागणी महामेट्रोने केली आहे. त्या संदर्भात राज्य शासनाने महापालिकेकडून अभिप्राय मागविला होता. त्यानुसार महापालिकेने शासनाला अभिप्राय पाठविला आहे. शासनाच्या निर्णयानुसार महापालिका आपली भूमिका ठरवेल. मेट्रोत महापालिकेचा हिस्सा आहे. मेट्रो शहरासाठीच आहे.
>
> **— शेखर सिंह**
> आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

- महापालिका भवनासमोरील जागा, वल्लभनगर एसटी डेपो, फुगेवाडी जकात नाक्याची जागा, महापालिका भवनासमोरील जागा, महापालिका भवन प्रवेशद्वारालगतची जागा, दापोडीतील भोजवानी स्वीटजवळील जागा, फुगेवाडीतील लोकमान्य टिळक शाळेची जागा, पिंपरीतील तिरंगा हॉटेलमागील जागा, महापालिका भवन आवार आणि वल्लभनगर येथील अशा एकूण २ लाख ३९ हजार ३७६.७८ चौरस फूट जागा महामेट्रोला देण्यात आली आहे.
- दुसर्या टप्प्यात निगडी बस टर्मिनल येथील एकूण सहा जागा, निगडी येथील रिकामी जागा व पदपथाची अशा दोन जागा, आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम विद्यालयाच्या दोन जागा, आकुर्डी येथील पदपथाच्या पाच जागा अशा एकूण ४ हजार ८८४ चौरस मीटर जागा महामेट्रोला देण्याची कार्यवाही सुरू आहे.

## » Selected



### बाप्पाचा थाट...चांदीचे खरेदीसाठी नागरीकांची गर्दी

**पिंपरी :** दहा दिवस घरी मुक्कामासाठी येणाऱ्या लाडक्या बाप्पाची सरबराई योग्य प्रकारे करण्यासाठी दरवर्षी गणेशभक्त मोठ्या उत्साहात तयारी करत असतात. दरवर्षी केली जाणारी चांदीच्या अलंकारांची खरेदी हा या तयारीतील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सार्वजनिक गणेशोत्सवात गणरायाला वैविध्यपूर्ण दागिने अर्पण केले जातात. त्याप्रमाणे दरवर्षी गणपतीसाठी एक नवा दागिना करण्याची पद्धत अनेक कुटुंबांमध्ये रुढ होत आहे. सध्या पिंपरी-चिंचवड शहरातील सराफी बाजारात चांदीच्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करत आहेत.

गणरायाची आरास ही सर्वच गणेशभक्तांच्या जिव्हाळ्याचा विषय. त्याला चार चॉंद लावण्यासाठी गणेशमूर्तीला देखील वैविध्यपूर्ण वस्त्रालंकारांनी सजविले जाते. यामध्ये इमिटेशन ज्वेलरी, मोत्याचे दागिने व चांदीचे दागिने असे पर्याय बाजारात दिसून येतात. त्यातही चांदीच्या दागिन्यांना सध्या बाजारात सर्वाधिक मागणी आहे. चांदीच्या दागिन्यांसोबतच गणपतीची शस्त्रास्त्र, दूर्वा, जास्वंद, नारळ- विडा-सुपारी हे पूजा साहित्यही चांदीमध्ये उपलब्ध झाले आहे. हौसेला मोल नसते, असे म्हटले जाते. त्यामुळे चांदीचे दर वाढूनही नागरिक आवर्जून खरेदी करताना दिसत आहेत.

### पिंपरीत 'भीक मांगो' आंदोलन

**पिंपरी :** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा उभारणीच्या कामात झालेल्या भ्रष्टाचारा विरोधात महाविकास आघाडी



व सर्व सामाजिक संघटनांच्या वतीने आज दि.९ सप्टेंबर २०२४ रोजी 'भीक मांगो' आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समन्वयक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांनी दिली.

पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आंदोलनाला सुरुवात केली जाईल. पिंपरी चौकातून राष्ट्रमाता अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या गेटवर धरणे आंदोलन देखील करणार असल्याचे मानव कांबळे यांनी सांगितले आहे. या आंदोलनात जास्तीत जास्त नागरिक तसेच शिव-शंभू प्रेमी संघटनांनी सहभागी व्हावे असे देखील आवाहन त्यांनी केले आहे.

### सेल्फीचा मोह बेतला जीवावर

**तळेगाव :** इंदोरीजवळील कुंडमळा येथील वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात वाहत जाऊन तरुण-तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.५) घडली होती. तरुणाचा मृतदेह त्याच दिवशी सापडला. तर तरुणीचा मृतदेह आज (दि. ७) सकाळी सापडला. रोहन ज्ञानेश्वर ठोंबरे (वय २२, रा. चिंचवड), श्रेया सुरेश गावडे (वय १७, रा. चिंचवड) असे मृत तरुण- तरूणीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तरुण तरुणी गुरुवारी (दि.०५) सकाळी मित्रांसोबत कुंडमळा येथे फिरावयास आले होते. सकाळी ९ च्या सुमारास सेल्फीच्या नादात श्रेया गावडे पाय घसरुन पाण्यात पडली. तिला वाचविण्यासाठी रोहन ठोंबरे पाण्यात उतरला असता वेगवान पाण्याच्या प्रवाहात दोघे वाहून गेले. रोहन एका खासगी कंपनीत नोकरीस होता. श्रेया ११वी मध्ये शिकत होती. रोहनचा मृतदेह गुरुवारी दुपारच्या सुमारास मिळाला. श्रेयाचा मृतदेह शनिवारी सकाळच्या सुमारास मिळाला.

### २६ चौकात वाहतूक कोंडी

**पिंपरी :** वाहतूक पोलीस, महापालिका आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून शहरातील वाहतूककोंडीबाबत रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, त्यामध्ये २६ चौक निश्चित करण्यात आले आहेत. या २६ चौकांतील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी मनुष्यबळ वाढविणे, अवजड वाहनांचे मार्ग बदलणे, रस्ते रुंदीकरण करून घेणे अशा उपाययोजना सुरू असल्याची माहिती पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिली. पोलीस आयुक्त चौबे यांनी 'एक्स'च्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने नागरिकांशी संवाद साधला. शहरातील प्रत्येक परिसरात वाहतूककोंडी होत आहे. ती सोडविण्यासाठी आपण काय उपाययोजना करत आहात, असे प्रश्न काही नागरिकांनी विचारले. काही नागरिकांनी थेट वाहतूककोंडी होणाऱ्या परिसराची माहिती देत छायाचित्र पाठवून आयुक्तांना प्रश्न विचारले. एका नागरिकाने वाकडमध्ये होणाऱ्या कोंडीबाबत विचारणा केली होती.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### गणेशभक्तांच्या उत्साहावर महागाईचे विरजण

**मावळ-:** गौरी-गणपतीच्या सजावटीसाठी वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रिक साहित्याच्या दरात जवळपास दीडपट वाढ झाली आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात सजावटीच्या साहित्यासाठी जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत.

सध्या मावळ तालुक्यातील बाजारात दोन्ही सणासाठी लागणाऱ्या विविध साहित्य खरेदीची लगबग सुरू आहे. महागाईला जीएसटीची किनार असल्याचे व्यापारी सांगत आहेत. घरात गौरी-गणपती बसविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सजावट केली जाते. आकर्षक विद्युत रोषणाई, पडदे, डेकोरेशनच्या माळा, फोकस, तोरणही बांधले जाते. शिवाय, श्रींची आरती करण्यासाठी स्पीकरही लावले जातात.

सध्या बाजारात अनेक दुकानदारांनी सजावटीची साहित्य ग्राहकांचे लक्ष वेधून घेईल, अशा पद्धतीने दुकानाबाहेर सजवून लावली आहेत. केंद्र शासनाने त्यावर बंदी घातल्याने मध्यंतरी काही दिवस तुटवडा जाणवला. मात्र, चायनाचेच साहित्य इतर देशांतून पुन्हा भारतात येत असल्याने दहा रुपयांची वस्तू आता ग्राहकांच्या हातात २० ते २५ रुपयांना पडत आहे.चायना वस्तू म्हटलं की कमी पैशात जास्त आकर्षक असल्याने ग्राहकांचा खरेदीसाठी अधिक कल असायचा. आता तीच वस्तू दुप्पट दराने खरेदी करण्याची वेळ आली आहे. चायना देशातील वस्तू खरेदी करू नका, अशा पोस्ट जरी समाज माध्यमांवर फिरत असल्या तरी याचा विक्रीवर काहीही परिणाम होत नसल्याचे दिसून येत आहे.



## जुन्या लोकप्रिय गीतांची मैफील

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**चिंचवड :** विविध भारती म्युझिकल इव्हेंट प्रस्तुत 'जब छाये मेरा जादू..' या लोकप्रिय हिंदी – मराठी चित्रपटगीतांच्या नि:शुल्क दृकश्राव्य मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## विशेष सांगीतिक नजराणा

# चित्रपटगीतांच्या मैफलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** विविध भारती म्युझिकल इव्हेंट प्रस्तुत 'जब छाये मेरा जादू..' या लोकप्रिय हिंदी – मराठी चित्रपटगीतांच्या नि:शुल्क दृकश्राव्य मैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड येथे गुरुवार, (दि.५) रोजी आयोजित करण्यात आला होता.

या विशेष सांगीतिक मैफलीत दिशा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, उपाध्यक्ष संतोष बाबर, माजी कार्याध्यक्ष सचिन साठे, किरण साळी, अनिल दळवी, अभिमान विटकर, सुभाष चव्हाण, राजेंद्र देसाई, नरेंद्र मोहिते, शरद शेजवळ, वि. ल. पवार, विनायक बहिरट, जीवन गायकवाड, सतीश रानवडे, विठ्ठल गरुड आदी उपस्थिती होते.

विनायक कदम, सुजाता माळवे, नंदकुमार कांबळे, उज्ज्वला वानखेडे, शैलेश घावटे, नेहा दंडवते, अरुण सरमाने, शुभांगी पवार, अनिल जंगम, गायत्री बेलसरे, विलास खरे, अनुराधा साळवी, डॉ. किशोर वराडे, विकास जगताप या गायक कलाकारांनी आपल्या एकल आणि युगुलस्वरातील सादरीकरणातून जुन्या लोकप्रिय चित्रपटगीतांची जादू अजूनही रसिकांना मंत्रमुग्ध करते याची स्वरानुभूती दिली. विशेषत: "चुरा लिया हैं तुमने जो..." , "मेरा प्यार भी तू हैं..." , "देखो मैंने देखा हैं..." , "सौ साल पहले..." , "गुम हैं किसीके प्यार में..." , "चुरा के दिल मेरा..." , "क्या यही प्यार हैं..." , "वादा रहा सनम..." , "सुनो चम्पा सुनो तारा..." , "दिल हुम हुम करे..." अशा एकाहून एक सरस युगुल आणि द्वंद्वगीतांना श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. डॉ. किशोर वराडे यांनी प्रायोजकत्व स्वीकारलेली लकी ड्रॉ सोडत श्रोत्यांचे खास आकर्षण ठरले.

## वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनावर कारवाई

# पिंपरी शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये नियोजनबद्ध प्रशस्त रस्ते आहेत. मात्र वाहतूक पोलिसांचे झालेले दुर्लक्ष यामुळे विविध चौकामध्ये, विविध ठिकाणी वाहतूक कोंडी (ट्राफिक जाम) होत असल्यामुळे सामान्य नागरिकांना, वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप होत आहे. तो दूर करण्यात यावा अन्यथा लवकरच आंदोलनाची भूमिका घेण्याचा इशारा दिल्यानंतर पत्र वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश कसबे यांनी कामगार नेते काशिनाथ नखाते व शिष्ठमंडळांशी चर्चा केली. मागण्यावर सकारात्मक विचार करून लवकरच त्या सोडवण्यात येतील असे आश्वासन दिले.

वेळी प्रदेश उपाध्यक्ष राजेश माने ,कार्याध्यक्ष इरफान चौधरी ,सहदेव होनमने, संभाजी वाघमारे,रवींद्र गायकवाड, संजय कांबळे उपस्थित होते. रस्त्यावर असलेले खड्डे व वाहतुकीचा प्रचंड ताण लक्षात घेता नियोजन करणे गरजेचे आहे वाहतूक पोलीस इतर कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

वाहतूक सुरळीत करण्याकडे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. विशेषतः काळेवाडी फाटा , शागुन चौक ,टिळक चौक निगडी, दुर्गानगर चौक, चिखली, तळवडे, त्रिवेणी नगर चौक, आकुर्डी चौक, मोरवाडी चौक, साने चौक थरमॅक्स चौक परिसरात अवैध थांबा, अनेक वेळेला खूप मोठ्या प्रमाणात कोंडी होते आहे.

सांयकाळी वाहतुकीचा बोजवारा उडालेला असतो ,अवैध पार्किंग मुळे सामान्य नागरिकांचा प्रवास अवघड झाला आहे . वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनावरती कारवाई सुरू असून चुकीच्या कामाचे समर्थन पोलीस विभागाकडून करण्यात येणार नाही त्याचबरोबर दंडात्मक कारवाई सुरू असून वाहतूक सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# पवना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पवना धरण शंभर टक्के भरले आहे. धरणातून शुक्रवारी रात्रीपासून पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाने दिल्या आहेत.

धरणाच्या सांडव्यावरून दोन हजार २२० क्यूसेस विसर्ग नदीपात्रामध्ये सुरु आहे. पाणलोट क्षेत्रामधील पावसाच्या प्रमाणानुसार धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी शुक्रवारी रात्री नऊ वाजता सांडव्याद्वारे विसर्ग वाढविण्यात आला. चार हजार ३२० क्यूसेस क्षमतेने नदीपात्रात विसर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे नदीपात्रातील पाण्यासाठ्यात वाढ झाली आहे.

परिणामी पवना नदीकाठच्या नागरिकांना महापालिकेने सूचना केल्या आहेत. नदीपात्रात कोणीही उतरू नये, नदीमधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तत्काळ हलविण्यात यावेत. सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## नऊ स्थानकावरून दररोज २७० ज्यादा बसेस

# गणेशोत्सवासाठी पीएमपीएमएलचे खास नियोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** दरवर्षी प्रमाणे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहराबाहेरून व शहरांतर्गत नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असतात. तसेच पिंपरी-चिंचवड शहरामधून पुणे शहरामध्ये गणेशोत्सव देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी संख्या पाहता पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य बस स्थानकांवरून दरवर्षी प्रमाणे यंदाही गर्दीनुसार रात्रभर बससेवा सुरू ठेवली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड शहर परिसरातील नऊ स्थानकावरून दररोज २७० ज्यादा बसेस या रात्रपाळीकरीता गणेशोत्सव कालावधीमध्ये सोडल्या जाणार आहेत. गणेशोत्सवात नियमित मार्गाच्या बसेसच्या फेऱ्या वगळून जादा देण्यात येणाऱ्या फेऱ्या यात्रा स्पेशल म्हणून संचलनात राहतील. या फेऱ्यांसाठी रात्री दहा नंतर प्रचलित दरामध्ये रूपये पाच जादा दर आकारणी केली जाईल.गणेशोत्सव कालावधीत देण्यात येणारी ही रात्री बससेवा खास बससेवा असल्याने सर्व पासधारकांस रात्री १२ वाजेपर्यंत पासाची सवलत ठेवण्यात आलेली आहे. रात्री १२ नंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.

**या स्थानकांवरून सुटणार ज्यादा बस**

- निगडी – 70
- चिंचवडगाव – 35
- भोसरी – 62
- पिंपळे गुरव – 20
- सांगवी – 15
- आकुर्डी रेल्वे स्टेशन – 16
- चिंचवडगाव मार्गे डांगे चौक – 30
- मुकाई चौक रावेत – 12
- चिखली/संभाजीनगर – 10

#रा

## दुरुस्त रस्ते दोन दिवसांत उखडले

# गणेशोत्सवात भाविकांचा प्रवास खड्ड्यातूनच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** लाडक्या बाप्पाच्या आगमनाने पिंपरी चिंचवडकरांचा आनंद द्विगुणीत झालेला असताना, रस्त्यावरील बुजवलेले खड्डे, अर्धवट टाकलेली माती, मुरुम आणि खडी काही तासांत उखडली आहे. यामुळे अशा खड्डेमय मार्गातून बाप्पांना घरी न्यावे लागणार आहे. महापालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे यंदाही बाप्पांचे आगमन खड्ड्यातून झाले. विशेष म्हणजे आयुक्तांच्या आदेशांना शहरातील ठेकेदारांनी एकप्रकारे केराची टोपली दाखवली आहे.शहरातील बहुतांश रस्त्यांवर अद्यापही खड्डे कायम आहेत. शनिवारी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी बाहेर पडलेले भाविक, नागरिकांना या खड्ड्यांतून प्रवास करावा लागणार आहे. खरेदी आणि बाप्पाला घरी नेताना याच खड्ड्यातून मार्ग काढावा लागेल.

आयुक्तांनी स्पष्ट आदेश देऊनही डांबरीकरणाऐवजी खडी, मुरुम, माती, पेव्हिंग ब्लॉक, कोल्डमिक्स, कॉंक्रिटच्या साहाय्याने खड्डे बुजवून रस्त्यांची डागडुजी केली आणि काही ठिकाणी सुरू आहे. पावसामुळे डांबरीकरणास अडथळे येत असल्याचे कारण सांगत सगळीकडे खड्डे बुजवण्याची घाई सुरू आहे. प्रत्यक्षात सकाळी बुजवलेला खड्डा पुन्हा सायंकाळी उखडलेला दिसून येत आहे. जलवाहिन्या, सांडपाणी वाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेने अनेक रस्ते खोदले होते. अद्यापही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर खोदाई सुरू आहे. समाविष्ट गावांमध्ये आजही ही कामे सुरू आहेत. शिवाय, नागरिकांनीही खासगी कामासाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदले आहेत. शिवाय, बीआरटी मार्गांवरील बसथांबे आणि स्मार्ट सिटीअंतर्गत बसथांब्यांवर लावलेल्या जाहिरात फलकांना वीजपुरवठा करण्यासाठीही रस्त्यांवर आडवे चर खोदून वीजवाहिन्या टाकल्या आहेत. मात्र, अनेक ठिकाणचे चर व्यवस्थित बुजवलेले नाहीत.

दुसरीकडे, उपनगरातही अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. काही व्यापाऱ्यांनी स्वतः खर्च करून खड्ड्यावरती माती, मुरुम, राडारोडा टाकला. मात्र, त्यामुळे रस्ते अधिकच निसरडे झाले होते. काही ठिकाणी माती निघून गेल्याने पुन्हा त्याच ठिकाणी मोठे खड्डे पडले. खोदकामांच्या ठिकाणी पक्के डांबरीकरण केलेले नव्हते. पावसामुळे रस्त्यांचे डांबरीकरण करणे अशक्य आहे. परिणामी, केवळ खड्डे बुजवण्यावर महापालिकेने भर दिला आहे.

### बाजारपेठात तात्पुरती डागडुजी

● पिंपरी-चिंचवड शहरातील खरेदीसाठी नागरिक पिंपरी, काळेवाडी, चिंचवड स्टेशन, डांगे चौक, आकुर्डी येथे जातात. मात्र, या ठिकाणी पडलेल्या खड्ड्यांवर तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. पडलेल्या हलक्या पावसामुळे त्यावरील माती वाहून गेली. त्यामुळे खरेदी करतानाही खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागला.

### डागडुजीचा दिखावा

● ठिकठिकाणी रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संबंधित उप अभियंतांना सूचना केल्या होत्या. त्यानंतर नेमलेल्या ठेकेदाराकडून ऐन पावसात तर, वाहनांची वर्दळ असलेल्या ठिकाणी घाईमध्ये खड्डे बुजवण्यात आले. त्यानंतर त्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यामुळे केवळ दिखाव्यासाठी ही डागडुजी केल्याचे दिसून आले.

### महत्त्वाच्या मार्गावरही तीच रड

● गणेशोत्सवात शहरातील महत्त्वाच्या मिरवणुका पिंपरी, चिंचवड, भोसरी, सांगवी, वाकड, दापोडी, थेरगाव, आकुर्डी-निगडी प्राधिकरण भागात निघतात. दापोडी, सांगवीतील मंडळे मुळा व पवना नदीमध्ये मूर्ती विसर्जन करतात. याच मार्गावर छोटे, मोठे मिळून असे भरपूर खड्डे पडले आहेत. यापैकी काही खड्डे बुजवूनदेखील पुन्हा खड्डे पडले आहेत पिंपरीतील सुभाषनगर घाट, पिंपरी गाव घाट, चिंचवडमधील मोरया घाटावर विसर्जन करतात. प्राधिकरणातील मंडळे गणेश तलाव, भोसरीतील मंडळे इंद्रायणी नदी किंवा विहिरीत मूर्ती विसर्जन करतात.

## भुयारी मार्गासाठी : तब्बल ४० झाडे तोडणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपळे निलख :** पिंपळे निलख येथील संरक्षण हद्दीतील रक्षक चौक ते गावठाणातून जाणा-या १८ मीटर रस्त्यावर भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे. या कामास अडथळा ठरणारी ४० झाडे तोडण्यात आली आहेत.

सांगवी फाटा ते रावेत बीआरटीएस मार्गावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पिंपळे निलख येथील रक्षक सोसायटी चौकात भुयारी मार्ग (सब-वे) उभारण्यात येणार आहे. भुयारी मार्गाच्या कामात अडथळा ठरणारी झाडे काढण्यासाठी महापालिकेच्या उद्यान विभागाने परवानगी दिली आहे. त्यानुसार नऊ रेनट्री, काटेरी बाभूळ, सहा बोर, आठ शिसू, एक सुबाभूळ, तीन ग्लेरीसिडीया, एक शिरस तीन इतर अशी एकूण ४० झाडे तोडण्यात आली आहेत. तर, पाच पिंपळ, एक कॅशिया, दोन भेंडी, कडूलिंब, एक कांचन, दोन तपशी अशा १३ झाडांचे पुनर्रोपन करण्यात येणार आहे. त्या झाडाचे पुनर्रोपन केल्यानंतर अहवाल सादर करावा लागणार आहे.

पिंपळे निलख मधून बाणेर, बालेवाडी भागात जाता येते. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. हिंजवडीतील माहिती व तंत्रज्ञाननगरीतील कर्मचारी या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे वाहनांची संख्या वाढून रक्षक सोसायटी चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होते. त्यावर उपाययोजना म्हणून भुयारी मार्ग उभारण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. या १८ मीटर रस्त्यास भुयारी मार्ग उभारण्यासाठी सात कोटी ६२ लाख आठ हजार २१३ रुपये दराची निविदा प्रक्रिया महापालिकेने राबवली होती. सर्वांत कमी दराची पाच कोटी ७३ लाख १० हजार ८०६ रुपये दराची एचसी कटारिया कंपनीची निविदा स्वीकारली आहे.

## इंद्रा पार्क सोसायटी गणेशोत्सवात भव्य रंगभरण स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** शहरातील किवळे भागातील इंद्रा पार्क सहकारी गृहरचना संस्थेत गणेश चतुर्थीला श्रीगणेश मूर्तीची जल्लोष व मोठ्या उत्साहात प्रतिष्ठापना करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी इंद्रा पार्क सोसायटी सभासदांसाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव या सोबतच शालेय मुलांसाठी रविवार दि.८ रोजी सकाळी ११ वाजता भव्य रंगभरण स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मुलांनी अतिशय उत्साहात स्पर्धा गाजवली. लहान मुलांसोबत च सभासदांसाठी देखील अनेक विध उपक्रमाचे आयोजन या आयोजनात महिलांचा विशेष सहभाग असल्याचे कमिटीने सांगितले.

## शिक्षकी पेशात कोणतेही काम ओझं समजून करू नका : डॉ. शाळीग्राम भंडारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** शिक्षकी पेशात कोणतेही काम ओझं समजून करू नका,शिक्षकांनी आपली देहबोली सकारात्मक ठेवली पाहिजे. परिवर्तनाची कास दैनंदिन आचरणात आणली तरच विद्यार्थी व समाजात परिवर्तन घडू शकेल, असे मत समाजसेवक डॉ.शाळीग्राम भंडारी यांनी व्यक्त केले.चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मधील प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालय, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज (सीबीएसई) मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व शिक्षणतज्ज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा यांच्या हस्ते समाजसेवक व प्रमुख पाहुणे डॉ. शाळीग्राम भंडारी यांचा स्मृतिचिन्ह देऊन तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के. वाळुंज, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र कांकरिया, उपप्राचार्य डॉ. क्षितीजा गांधी, डॉ.वनिता कुऱ्हाडे, एमबीएचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, सीबीएसईच्या प्राचार्या सविता ट्रॅव्हीस, बीएडच्या प्राचार्या डॉ.पौर्णिमा कदम समवेत 20 हून अधिक शिक्षकांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

## पान १ वरून

पान १ वरून

### दादांचे विधानसभा न लढण्याचे संकेत

टाकतात, असं काही करु नका. सकाळपासून उठून कामे करावी लागतात पण काही जण आमची चेष्टा करतात, त्याच्याबद्दल म्हणने काही नाही, जे आहे ते आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीतील पराभवावर भाष्य केले आहे. तर दुसरीकडे विधानसभा निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघात शरद पवार गटाकडून येगेंद्र पवार यांनी उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. तर अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीतील प्रचारातही लोकसभेला जिंकून दिले तरच विधानसभेला उभे राहणार असे जाहीर सांगितले होते. येथे जाहीर मेळाव्यात केलेल्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत.

### शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येवो!

तसेच संतपूजन करण्यात आले. कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह. भ. प. संदीपान महाराज शिंदे (हासेगावकर), ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार प्राप्त ह. भ. प. संजय महाराज पाचपोर आदी उपस्थित होते. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे, असेही ते म्हणाले. गेल्या २ वर्षात शासनाने ६०० च्यावर निर्णय घेतले, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आम्ही नियोजन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. आपणदेखील सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आहे. आपल्यालाही गरिबी माहिती आहे. सर्वात जास्त अर्थव्यवस्था चोख बजावणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते. म्हणून ही योजना सुरू केली. माझी लाडकी बहिण योजनेसाठी वर्षभराची तरतूद केली असून दरमहा निश्चित रक्कम मिळणार आहे. या योजनेबरोबरच लेक लाडकी लखपती योजना, मुलींना व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, एस. टी. प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना आदी योजना राबवित आहे.त्यांनी पुढे सांगितले, शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ आदीसाठी आतापर्यंत १६ हजार कोटी रुपये नुकसान भरपाई दिली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीला राज्याच्या नमो महासन्मान योजनेची ६ हजार रुपयांची जोड देऊन वर्षाला एकूण १२ हजार रुपये देण्यात येत आहेत. १ रुपयात पीक विमा देणारे हे देशातील पहिले सरकार असून ७.५ एच. पी. पर्यंतच्या शेतीपंपाचे वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने एकीकडे बंद पडलेले प्रकल्प सुरू केले. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर मिसिंग लिंक, अटल सेतू असे विकासाचे प्रकल्प राबवित असून हाताला रोजगार मिळण्याच्या दृष्टीने नवीन उद्योग आणण्याचे काम केले जात आहे. महाराष्ट्र उद्योग, परदेशी गुंतवणूक मध्ये आघाडीचे राज्य असून देशातील एकूणपैकी ५२ टक्के परदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे, असे ते म्हणाले.

### सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास केंद्राची मान्यता

शुल्क लावावे तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान 50 डॉलर अनुदान द्यावे याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार व पाठपुरावा केला तसेच यासंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी देखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने 90 दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत. मागील वर्षी सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र त्याही परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून राज्य शासनाच्या वतीने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य सरकारने 4200 कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले असून येत्या दोन-तीन दिवसात या अनुदानाचे थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यावरती करण्यात येणार आहे.

### महिला पोलिस उपायुक्त...

प्रविण चव्हाण हे अर्जदार आणि भाजपच्या इतर नेत्यांवर खोट्या तक्रारी तयार करणे, साक्षीदारांना शिकविणे, रोख रक्कमेची व्यवस्था करणे, तपास अधिकाऱ्यांना सूचना देणे इत्यादी अगदी पहिल्या टप्प्यापासून खोटे गुन्हे दाखल करण्यात गुंतलेले आहेत.चाकू लपविणे, छापा कसा टाकायचा, ड्रग व्यवसाय कसा दाखवायचा, केस कशी मोक्कामध्ये बसवायची, हे सांगताना प्रविण चव्हाण दिसून येतात. छापा टाकायला गेलेल्या पथकाचे हॉटेल बुकिंग करणे आणि त्याचे बिले भरली असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

### १२ लाखांचे मेफेड्रोन ..

कात्रज ते देहूरोड बाह्यवळण मार्गावर नवले पुलाजवळ दोघे जण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गस्त घालणारे पोलीस कर्मचारी धनाजी धोत्रे, सचिन गाडे, सचिन सरपाले यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले. त्यांची झडती घेण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे मेफेड्रोन सापडले. त्यांच्याकडून ५४ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. चौकशीत दोघांनी छत्रपती संभाजीनगरमधून मेफेड्रोन आणल्याचे उघडकीस आले.

### शरद पवार गट; ९० ते १०० जागा...

, अशी शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत जागा वाटपाची चर्चा सुरु आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बाजी मारली होती. त्यामुळे काँग्रेस देखील जास्त जागांसाठी आग्रही आहे. तर दुसरीकडे ठाकरे गट देखील अधिकच्या जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे, तर शरद पवार गटाने १०० जागांसाठी तयारी सुरू केलीय. परंतु अद्याप महाविकास आघाडीचा विधानसभेसाठी जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर झालेला नाहीये. त्यामुळे कोणत्या पक्षाला नेमक्या किती जागा मिळणार? हे अद्याप स्पष्ट झालेलं नाहीये.

### ६२ हजार खटले...

या आठवड्याच्या सुरुवातीला जिल्हा न्यायपालिकेच्या राष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायव्यवस्थेतील 'तारीख संस्कृती' बदलण्याचे आवाहन केले होते. प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेले खटले आणि अनुशेष हे न्यायव्यवस्थेपुढे मोठे आव्हान असल्याचे त्या म्हणाल्या होत्या. सर्व संबंधितांनी या समस्येला प्राधान्य देऊन तोडगा काढण्याचे आवाहनही त्यांनी केले होते. सध्या ४२.६४ लाख दिवाणी आणि १५.९४ लाख फौजदारी स्वरूपाची एकूण ५८.५९ लाख प्रकरणे उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत.

### लेसरमुळे तरुणाच्या डोळ्यातून...

मिरवणुकीत मोठे एलईडी लाइट आणि लेझर लाइटवापले. या लाइटांमुळे या मिरवणुकीत सहभागी झालेल्या एका तरुणाच्या डोळ्याला गंभीर इजा झाली. लेझरचा प्रकाश थेट डोळ्यात गेल्याने या तरुणाच्या डोळा लाल होऊन त्यातून रक्तस्त्राव होऊ लागला. एवढेच नाही तर या ठिकाणी बंदोबस्तासाठी असलेल्या एका पोलिस हवालदाराचा डोळा देखील सुजला. डोळ्यातून पाणी वाहू लागल्यानंतर तरुणाला आणि पोलिसाला शास्त्रीनगरमधील एका एका दवाखानेत भरती करण्यात आले असता, तरुणांच्या बुबुळाला लेझरच्या किरणांमुळे इजा होऊन रक्तस्त्राव झाल्याचे निष्पन्न झाले.

### १०० रुपयांत आनंदाचा शिधा

या आनंदाच्या शिध्यात एकूण चार वस्तू असतील. फक्त १०० रुपयांत या चारही वस्तू मिळणार आहेत. यात चणाडाळ (1 किलो), सोयाबीन तेल (1 लिटर), साखर (1 किलो), रवा (1 किलो) या चार वस्तू मिळतील. 'आनंदाचा शिधा' उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सरकारने मात्र काही अटी ठेवल्या आहेत. सरकारच्या या उपक्रमाचा लाभ जे कुटुंब अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधरक आहे, त्यांना मिळणार आहे. सोबतच प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांनाही हा आनंदाचा शिधा दिला जाईल.

## » Selected



### महानगरपालिकेच्यावतीने राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी

**पिंपरी :** थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात प्रजेला प्रमाण मानून इंग्रजांच्या विरोधात पहिली लढाई सुरू केली आणि त्यांच्या याच लढाईची प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारकांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा एक लढवय्या क्रांतिकारक म्हणून त्यांनी इंग्रजांविरुद्ध केलेला पराक्रम सर्वांनाच देशभक्तीची प्रेरणा देत राहील, असे मत अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रतिमेस अतिरीक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते आशिष जाधव, प्रशांत माकर, अक्षय तटले,अक्षय शिंदे,गणेश शिंदे,प्रतिक माकर,संजय शिंदे,मंगेश टिळेकर, आशा तटले,कल्पना माकर आदी उपस्थित होते.



### कुटुंबसंस्था हा हिंदू संस्कृतीचा पाया! " - ॲड. सदानंद फडके

**पिंपरी :** "कुटुंबसंस्था हा हिंदू संस्कृतीचा पाया आहे!" असे विचार ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सदानंद तथा नंदू फडके यांनी कबीर बाग, नारायण पेठ, पुणे येथे रविवार, दिनांक ०८ सप्टेंबर २०२४ रोजी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद स्थापनेच्या षष्ट्यब्दीपूर्ती वर्षानिमित्त विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, विधी प्रकोष्ट संचलित श्रीराम जानकी मोफत कौटुंबिक समुपदेशन सेवा केंद्राचे उद्घाटन करताना ॲड. फडके बोलत होते. धर्माचार्य डॉ. सुभाषमहाराज गेठे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे, उपाध्यक्ष माधवी संशी, सी ए अभय माटे, ॲड. प्रशांत यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. सदानंद फडके पुढे म्हणाले की, "विश्व हिंदू परिषदेने आज खऱ्या अर्थाने कुटुंबसंस्थेसाठी मोठे विधायक कार्य केले आहे. या समुपदेशन केंद्राचे नाव 'गौरीशंकर' असे जास्त सयुक्तिक ठरले असते; कारण प्रभू रामचंद्र आणि सीतामाई यांचा त्याग अत्युच्च पातळीवरचा आहे. कुटुंबसंस्कृती या गाभ्यावरती हिंदू संस्कृती विराजमान झाली आहे. त्यामुळे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अनेक आक्रमणे आपण परतावून लावली. आहार, निद्रा, भय, मैथुन या चार घटकांसोबत विवेक हा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे माणूस हा पशूपेक्षा वेगळा ठरतो. मतभेदावर मनोमिलन हा उत्तम उपाय आहे!"असे मत मांडले.

किशोर चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. ॲड. शैलेश भावसार यांनी स्वागत केले. ॲड. महेश सोनवणे, अथर्व गोरडे, ॲड. अक्षय भालेराव, ॲड. आशिष गोरडे, ॲड. ऋषिकेश शर्मा, ॲड. सुशांत गोरडे यांनी संयोजन केले. ॲड. संकेत राव यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. सोहम यादव यांनी आभार मानले.

### महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये जनसंवाद सभा

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत जनसंवाद सभा होणार आहे, अशी माहिती महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.




नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणा-या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय महिन्यातील दुस-या आणि चौथ्या सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत महापालिकेच्या वतीने जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते. या सभेकरीता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय मुख्य समन्वय अधिका-यांच्या नियुक्त्या केल्या असून ते या जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

## गणेशमूर्तीचे होणार शास्त्रोक्त पद्धतीने विघटन

# शहरात १५ ठिकाणी मूर्तीविघटन केंद्राची स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक वातावरणात पार पाडण्यासाठी शहरात पहिल्यांदाच मुर्ती विघटन केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेने हा पुढाकार घेतला असून क्षेत्रीय कार्यालयनिहाय ४०फूट बाय ३०फूट आकाराची आणि ५ फूट खोल अशी एकूण १५ भव्य विघटन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या विघटन केंद्रांवर पहिल्यांदाच गणेशमूर्तींचे रासायनिक प्रक्रियेद्वारे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. तसेच नदी व तलावांचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी मुर्ती संकलन केंद्रांमध्ये गणेशमूर्तींचे दान करून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले आहे.



पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करण्याबाबत तसेच शहरातील नदी व तलावांचे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या मुर्ती संकलन केंद्रावर मुर्ती दान करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. तसेच संकलन केंद्रांवर प्राप्त झालेल्या मुर्तीचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्यासाठी राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर लिमिटेड या संस्थेमार्फत अमोनियम बाय कार्बोनेट हे रसायन उपलब्ध करून घेण्यात आले आहे.

हे रसायन योग्य प्रमाणात वापरण्याबाबत पर्यावरण विभागामार्फत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यानंतर संकलन केंद्रांवर प्राप्त मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विघटन करण्यात येणार आहे. पर्यावरण विभाग व क्षेत्रीय कार्यालय यांच्या समन्वयाने विघटन केंद्र प्रक्रिया होणार आहे. याव्यतिरिक्त, कृत्रिम हौदाच्या ठिकाणी संकलित होणारे निर्माल्य गोळा करून त्याची मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रामध्ये प्रक्रिया करून त्याद्वारे कंपोस्ट खत तयार करण्यात येणार आहे.

#रा


# रिंगरोडचे काम बारा टप्प्यात

## लवकरच पुणे जिल्ह्यातील वाहतूक कोंडी फुटणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 'एमएसआरडीसी'ने रिंगरोडचे काम हाती घेतले आहे. पूर्व आणि पश्चिम असे रिंगरोडचे दोन भाग केले आहेत. पूर्व भागातील रिंगरोड पाच तालुक्यांतून जातो. त्यात हवेली तालुक्याचाही समावेश आहे. या भागातील रिंगरोडसाठी आतापर्यंत ७० टक्के जमिनीचे भूसंपादन महामंडळाने केले आहे. 'एनएचएआय'ने पुणे ते छत्रपती संभाजीनगरदरम्यान ग्रीन कॉरिडॉरचे काम हाती घेतले आहे. हा प्रस्तावित रस्ता आणि रिंगरोड काही ठिकाणी एकत्र येत असल्यामुळे सोलापूर ते पुणे-बंगळूर रस्त्यादरम्यानच्या ३१ किलोमीटर रस्त्याचे काम प्राधिकरणाने करावे, असे यापूर्वी ठरले होते. त्यामुळे ३१ किलोमीटर रस्त्याचा भाग वगळून उर्वरित रस्त्याच्या कामासाठी 'एमएसआरडीसी'ने निविदा मागविल्या होत्या; परंतु प्राधिकरणाने मध्यंतरी निर्णयात बदल करत ३१ किलोमीटर रस्त्याचे काम पुन्हा महामंडळानेच करावे, असे सांगत रस्ता पुन्हा 'एमएसआरडीसी'कडे वर्ग केला.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) सोलापूर रस्ता ते पुणे-बंगळूर रस्त्यादरम्यानचा सुमारे ३१ किलोमीटरचा प्रस्तावित रिंगरोड पुन्हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) वर्ग केला आहे.या रस्त्याचे काम तीन टप्प्यांत होणार असून 'एमएसआरडीसी'ने टेंडर मागविले आहे. त्यामुळे आता 'एमएसआरडीसी'ने ३१ किलोमीटर रस्त्याचे तीन टप्पे करून टेंडर मागविले आहेत. टेंडर भरण्याची अंतिम मुदत सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत दिली आहे, अशी माहिती महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली आहे. त्यामुळे रिंगरोडचे काम बारा टप्प्यांत होणार आहे. यापूर्वी काढलेले टेंडर अंदाजित रकमेपेक्षा ४० ते ४५ टक्के जादा दराने आल्यामुळे वादग्रस्त ठरल्या आहेत.

आहेत. त्यामुळे आता संपूर्ण रिंगरोडचे काम बारा टप्प्यांत होणार




### या गावातून जाणार रिंगरोड

- **मावळ :** परंदवाडी, उर्से, तळेगाव, वडगाव मावळ, कातवी, आंबी, वराळे, आकुर्डी, नाणोली तर्फे चाकण, इंदोरी, सुदवडी, सुदुंबरे.
- **खेड :** खालुंब्रे, निघोजे, मोई, कुरळी, चिंबळी, केळगाव, आळंदी, चऱ्होली खुर्द, धानोरे, सोळू, मरकळ, गोळेगाव.
- **हवेली :** तुळापूर, भावडी, लोणीकंद, पेरणे, बकोरी, डोंगरगाव, वाडे बोल्हाई, गावडेवाडी, मुरकुटेनगर, भिवरी, पेठ, कोरेगाव मूळ, शिंदवणे, वळती, तरडे, आळंदी म्हातोबाची.
- **पुरंदर :** सोनोरी, काळेवाडी, दिवे, हिवरे, चांबळी, कोडीत खुर्द, गराडे.
- **भोर :** कांबरे, नायगाव, केळवडे.

### असा आहे पूर्व भागातील रिंगरोड

- पुणे-मुंबई द्रुतगती महामार्ग-नाशिक-सोलापूर आणि सातारा-बंगळूर महामार्गाला जोडणारा
- मावळ, खेड, हवेली, पुरंदर आणि भोर तालुक्यातून जाणार
- पाच तालुक्यांतील ४६ गावांतून रिंगरोड जाणार
- एकूण लांबी १०३ किलोमीटर, तर रुंदी ११० मीटर
- सहा पदरी महामार्ग-एकूण सात बोगदे, सात अंडरपास, दोन नदीवरील आणि दोन रेल्वे मार्गावरील पूल
- ८५९.८८ हेक्टर जागा संपादित करावी लागणार, त्यासाठी अंदाजे १,४३४ कोटी खर्च
- महामार्ग बांधणीचा खर्च सुमारे चार हजार ७१३ कोटी

- हा प्रस्तावित रस्ता आणि रिंगरोड काही ठिकाणी एकत्र येत असल्यामुळे सोलापूर ते पुणे-बंगळूर रस्त्यादरम्यानच्या ३१ किलोमीटर रस्त्याचे काम प्राधिकरणाने करावे

**४६ गावांतून**
- पाच तालुक्यांतील ४६ गावांतून रिंगरोड जाणार

**४,७१३ कोटी खर्च**
- महामार्ग बांधणीचा खर्च सुमारे चार हजार ७१३ कोटी

**८५९.८८ हेक्टर जागा**
- जागा संपादित करावी लागणारत्यासाठी अंदाजे १,४३४ कोटी खर्च

**१०३ कोटी**
- एकूण लांबी १०३ किलोमीटर, तर रुंदी ११० मीटर

# मुलांनी आई वडिलांचे कष्ट विसरू नये

**शिक्रापुरात तीनशे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव संपन्न**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


शिक्रापूर ता. शिरुर येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. वंसत हंकारे.

**शिक्रापूर:** मुला मुलींनी आयुष्यात कितीही मोठे झाले तरी आपल्या जन्मदात्या आई वडिलांचे कष्ट विसरु नये आणि आपल्या गैर वागण्यामुळे आपल्या आई वडिलांची मान खाली जाऊ देऊ नये असे मत प्रसिध्द व्याख्याते प्रा. वंसत हंकारे यानी व्यक्त केले आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथे ग्रामपंचायतच्या वतीने आयोजित शिष्यवृती परिक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सातकर प्रसंगी बोलताना प्रसिध्द व्याख्याते प्रा. वंसत हंकारे बोलत होते, याप्रसंगी सरपंच रमेश गडदे, उपसरपंच सारिका सासवडे, ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे, माजी उपसरपंच मयूर करंजे, सुभाष खैरे, मोहिनी मांढरे, विशाल खरपुडे, ग्रामपंचायत सदस्या पुजा भुजबळ, वंदना भुजबळ, उषा राऊत, शालन राऊत, कृष्णा सासवडे, प्रकाश वाबळे, त्रिनयन कळमकर यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान शिक्रापूर परिसरातील तब्बल तिनशे विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, यावेळी एक तासभर पार पडलेल्या प्रा. वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाने सर्वच उपस्थितांचे डोळे पाणावले, यावेळी सरपंच रमेश गडदे, उपसरपंच सारिका सासवडे, मयुर कंरजे आदीनी मनोगत व्यक्त केले, सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत सदस्या पुजा भुजबळ यांनी केले तर उपसरपंच सारिका सासवडे यांनी आभार मानले.

## 2024 स्टार आयकॉन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



# पारगांवचे पोपटभाई ताकवणे हे २०२४ स्टार आयकॉन पुरस्काराने सन्मानित.

**पारगाव:** मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नाटयगृह बीबवेवाडी पुणे येथील दैनिक भास्कर भूषण १३ वा वर्धापन दिनानिमित्त सहकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पारगाव येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्व पोपटराव ताकवणे यांना भूमाता ब्रिगेडच्या सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्या हस्ते २०२४ स्टार आयकॉन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी पारगाव चे विद्यमान सरपंच सुभाष बोत्रे, सयाजी ताकवणे, नामदेव काळे ,दत्तात्रय ताकवणे, बजरंग मस्के, किसन जगदाळे,अमोल जगदाळे तनुजा जगदाळे,नितीन दिवेकर,चांदभाई मणियार,रवींद्र जगताप, राजाराम बोत्रे ,दशरथ बोत्रे,शरद ताकवणे पारगांव ग्रामस्थ उपस्थित होते.



# दौंड विधानसभा मतदार संघाची निवडणूक स्थगित करा

**पारगाव:** दौंड विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीतून निवडणूक आयोगाचे नियम, कायदा डावलून जवळपास३१०००मतदारांची नावे नियमबाह्य व बेकायदेशीरपणे काढून टाकून या मतदारांना त्यांचे संविधानाने व लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क हिरावून घेतला गेला आहे, या घोटाळ्याची निवडणूक आयोगाने तातडीने चौकशी करून,त्यांची नावे पूर्ववत मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत आणि निवडणूक आयोगाच्या नियमतील तरतुदीप्रमाणे नावे कमी करण्याची प्रक्रियेची अंमलबजावणी करूनच आवश्यक तो निर्णय येणाऱ्या विधानसभेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याअगोदर घ्यावा,अन्यथा जोपर्यंत असा आपले मागणीचा निर्णय होत नाही तोपर्यंत दौंड विधानसभेची निवडणूक तातपूर्ती स्थगित ठेवावी, असे निवेदन अखंड मराठा समाज दौंड तालुका यांचे वतीने निवडणूक आयोग, दिल्ली, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रांत साहेब, दौंड व तहसीलदार साहेब दौंड यांना देण्यात आले.

# अत्याचाराविरोधात पुढाकार घ्यावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**कारेगाव :** पोलिस, न्यायव्यवस्था, शिक्षक व समाजाने माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अत्याचाराच्या घटना रोखण्याबरोबरच उपाययोजना करण्यासाठी संवेदनशीलपणे पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत शिरुर न्यायालयाचे सहन्यायाधीश पी.एस. सोनकांबळे यांनी व्यक्त केले.

रांजणगाव एमआयडीसी,ता. शिरुर येथे शिरुर तालुका विधी सेवा व शिरुर वकील संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कायदेविषयक शिबिरात सोनकांबळे बोलत होते.

या शिबिराला शिरुर न्यायालयाच्या सहन्यायाधीश टी. एस.वाकडीकर, शिरुरचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर, पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे, पोलिस उपनिरीक्षक सविता काळे,, शिरुर वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड अमित खेडकर,माजी अध्यक्ष ॲड प्रदीप बारवकर, ॲड सुहास ढमढेरे,ॲड रावसाहेब करपे, ॲड प्रणव घाडगे, मारुती कदम, बाळासाहेब सोनवणे आदिसह विविध शाळांचे शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.

यावेळी बदलापूर,छत्रपती संभाजीनगर व पुणे येथील लहान बालकांवरील अत्याचाराच्या घटनाबाबत चिंता व्यक्त केली.

साक्षरतेबरोबर विधी साक्षरता ही काळाची गरज असून,पोलिस, न्यायव्यवस्था, शिक्षक व समाजाने या घटनाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असून, या सर्वांनी समाज जनजागृतीपर कायदेशीर कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना सहन्यायाधीश सोनकांबळे यांनी यावेळी दिल्या.

शालेय विदयार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दिक व मानसिक जबाबदारी हे सर्वस्वी शालेय व्यवस्थापन समितीवर अवलंबून असून, समाजातील सुरक्षेबाबत सर्वांनी संवेदनशील असायला हवे, असे पोलिस निरीक्षक वाघमोडे यांनी सांगितले.शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या सुरक्षेसाठी निर्भया पथक कार्यरत असल्याचेही पोलिस निरीक्षक वाघमोडे यांनी सांगितले.

यावेळी ॲड सतिश गवारी,ॲड अमृता खेडकर, ॲड पायल लोणारी, ॲड वैशाली डोंगरे यांनी विविध कायद्याबाबत मार्गदर्शन केले.

ॲड दिलीप कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार ॲड सचिव सागर जठार यांनी मानले.

# गणपती बाप्पाचे घर असा पर्यावरणपूरक देखावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत मोठ्या उत्साहात गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली.

दरवर्षी शाळेत गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. ह्या वर्षी गणपती बाप्पाचे घर असा पर्यावरण पुरक देखावा सादर केलेला आहे. ही संपूर्ण सजावट शाळेतील चित्रकला शिक्षिका राजगौरी जगताप , अश्विनी कदम, माधुरी जगताप तसेच इतर सहकारी शिक्षक यांनी केली आहे. गणपती उत्सवात शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. इ. ४ थीतील विद्यार्थी चि. स्वरूप लहाने याच्या हस्ते यावर्षी बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली.





# चिमुकल्यांनी केक कापून साजरा केला बँक ऑफ इंडियाचा वाढदिवस

**सासवड:** ७ सप्टेंबर हा बँक ऑफ इंडियाचा ११९ वा वर्धापन दिवस नुकताच सर्वत्र मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागांतील बँकेच्या पिसर्वे शाखेने गावातील अंगणवाडीतील चिमुकल्या मुलांच्या हस्ते केक कापून हा सोहळा साजरा केला. रंगीबेरंगी फुगे, विद्युत रोषणाई, छोट्या मुलांना खाऊ वाटप व उपस्थित ग्राहकांना मिठाई वाटून साजरा करण्यात आलेल्या या उपक्रमाचे अनेकांनी कौतुक केले बँकेचे शाखाधिकारी सचिन दोलताडे, भुषण चौधरी,बासुदेव नायक, राजेश काळे, रुपेश वाघमारे या कर्मचाऱ्यांसह निलेश बनकर, निवृत्ती कोलते, झुबेदा शेख, तुषार कोलते , सुशीला गोळे, कुणाल कोलते व अन्य ग्राहक यावेळी उपस्थित होते. अंगणवाडीच्या वंदना प्रताप वाघमारे, सुनंदा राहुल कोलते व मंगल मोहन खोपडे यांनीउपक्रमात सहभाग नोंदवला. शाखा व्यवस्थापक सचिन दोलताडे यांनी सर्वांचे स्वागत केले.

# शिवसेना उद्धव ठाकरे हवेली तालुका प्रमुखपदी युवराज दळवी....



> माझी राजकीय सुरुवात स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या पासूनच झाली असल्याने मी शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात आजपर्यंत पक्षनिष्ठ व पक्ष वाढीसाठी काम करीत आलो आहे.वाहतूक सेनेचा पुणे जिल्हाध्यक्ष पदावर मागील अनेक वर्ष उत्तम काम केल्याची दखल घेत मला पक्षाने शिवसेना हवेली तालुकाध्यक्ष पदी काम करण्याची संधी दिल्याने मी पक्षाचा मनापासून आभारी आहे. — **युवराज दळवी, नवनिर्वाचित हवेली तालुका प्रमुख-शिवसेना(उद्धव ठाकरे)**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली:** शिवसेना प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे,खासदार संजय राऊत यांच्या आदेशानुसार तर पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन आहेर,जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) हवेली तालुका प्रमुख पदी युवराज सुदाम दळवी यांची निवड जाहीर करण्यात आली. हवेली तालुका प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल युवराज दळवी यांचा सत्कार महाविकास आघाडीच्या वतीने आमदार अशोक पवार,शिवसेना माजी पुणे जिल्हा उपप्रमुख तथा वाघोलीचे माजी उपसरपंच संजय सातव पाटील यांच्या हस्ते वाघोली येथे सत्कार पार पडला.

याप्रसंगी शिवसेना जिल्हा संघटक राजेंद्र पायगुडे,युवा सेनेचे राज्य सचिव विशाल सातव पाटील,वाघोली शहर प्रमुख दत्तात्रय बेंडावले,मराठा महासंघाचे सरचिटणीस गुलाब गायकवाड,वाहतूक सेनेचे उपजिल्हा प्रमुख राजेंद्र तांबे,मनोज जाधवराव,रामदास गोरे,युवा सेना वाघोली शहर प्रमुख रोहन दळवी,ओमकार पायगुडे,ओमराज गोरे,विभाग प्रमुख शैलेश जाधव,आदी उपस्थित होते.

**महारौद्र सेवा मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर 350 तरुणांनी केले रक्तदान**

# कार्यकर्त्यांच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


जेजुरी येथे महारौद्र सेवा मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

**जेजुरी :** जेजुरी शहरातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महारौद्र सेवा मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात साडे तीनशे तरुणांनी रक्तदान करून मोठा प्रतिसाद दिला.

महारौद्र सेवा मंडळाच्या वतीने रविवार दिनांक 8 रोजी रक्तदान सोहळ्याचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा दूध संघाचे संचालक तानाजी जगताप,माजी नगरसेवक सचिन सोनवणे, हेमंत सोनवणे, अजिंक्य जगताप, एन डी नाना जगताप,दिगंबर उबाळे, ईश्वर दरेकर,प्रवीण जगताप,जेजुरी देवसंस्थान चे विश्वस्त पोपट खोमणे,माजी विश्वस्त संदीप जगताप,नितीन राऊत, नीलेश जगताप, माजी उपनगराध्यक्ष सदाशिव बारसुडे,सुरेश उबाळे,विशाल बारसुडे आदी उपस्थित होते. महारौद्र सेवा मंडळाच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबिर,महिलांसाठी मंगळागौर या पारंपरिक सांस्कृतिक खेळांचे आयोजन,वृद्धाश्रमात दिवाळी फराळ वाटप,दुष्काळ ग्रस्त भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा,संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात अन्नदान,आदी उपक्रम राबविले जात असल्याचे मंडळाचे अध्यक्ष विक्रम राजे शिंदे यांनी सांगितले.

मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांच्या माध्यमातून समाज हिताचे उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमातून एक प्रकारची देशसेवा केली जात आहे.असे उपक्रम राबवून मंडळाने आदर्श निर्माण केला आहे असे कौतुक आमदार संजय जगताप यांनी केले.

या रक्तदान शिबिराचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष विक्रमराजे शिंदे, सनी बारसुडे, सुजित मोरे, मनोज जाधव, शेखर जाधव, मिलिंद भापकर, गणेश जगताप, अक्षय शिवरकर, जयदीप भापकर आदींनी केले. #रा

### बारामतीकरांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

# बारामती गणेश फेस्टिवल २०२४ चे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील बारामती गणेश फेस्टिव्हल 2024 चे उद्घाटन आज रविवार दिनांक 8 सप्टेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार व राज्यसभेच्या खासदार सौ. सुनेत्रा वहिनी पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी बोलताना अजित पवारांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. बारामती गणेश फेस्टिवल सुरू करून बघता बघता वीस वर्षे झाली साधारण वीस वर्षांपूर्वी ज्येष्ठ पत्रकार कै. भाई रणसिंग, जयंत निलाखे, तत्कालीन उपविभागीय अधिकारी श्री. संजय मोहिते अशा मान्यवरांनी पुणे गणेश फेस्टिवलच्या धर्तीवर बारामती गणेश फेस्टिवलची सुरुवात करावी अशी संकल्पना मांडली व या फेस्टिवलची संपूर्ण जबाबदारी नटराज नाट्य कला मंडळाचे किरण गुजर व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वीकारली. किरण गुजर व त्यांचे सर्व सहकारी गेली वीस वर्ष या महोत्सवाचे नेटके आयोजन करीत आहेत. बारामती गणेश फेस्टिवलच्या माध्यमातून बारामतीकरांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी यानिमित्ताने मिळत असते. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे बारामतीकर रसिकांची सांस्कृतिक भूक या निमित्ताने भागविली जात आहे याचे मला समाधान आहे अशी भावना यावेळी बोलताना अजित पवार यांनी व्यक्त केली. बारामती गणेश फेस्टिवलच्या निमित्ताने अजित पवारांनी तमाम बारामतीकरांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



**बारामती:** राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार व राज्यसभेच्या खासदार सौ. सुनेत्रा वहिनी पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

## सहकार मंत्री वळसे पाटील यांच्या घरी गणपती बाप्पा विराजमान

**लोणी-धामणी :** राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मुळगावी निरगुडसर ( ता.आंबेगाव ) येथे कुटुंबीय समवेत निवासस्थानी गणपती बाप्पाची विधिवत पूजा करून गणपती बाप्पाची स्थापना केली. यावेळी वळसे पाटील म्हणाले की, अनेक वर्षापासून गणेश उत्सव सण मोठ्या प्रमाणावर साजरा करत असतो. माझी सर्व गणेश भक्तांना, नागरिकांना विनंती आहे की, आपण गणेश उत्सव साजरा करत असताना साधेपणाने साजरा करावा.गणपती बाप्पा न मागताच सर्व काही देत असतो. महाराष्ट्रातील सर्वांच्या जीवनात आनंद निर्माण होऊ दे, तुमचे चांगले आशीर्वाद लाभू दे,

Selected

## जेष्ठ नागरिकांनी बीसीजी लस घेण्याचे आवाहन

**लस घेण्यास पात्र कोण?**
- पूर्वी टीबीचा उपचार घेतलेला क्षयरुग्ण.
- पुर्वी क्षयरुग्णाच्या सहवासात राहिलेली व्यक्ती किंवा सध्याक्षयरुग्णाच्या सहवासात असलेली व्यक्ती. ६० वर्षे पुर्ण केलेली व्यक्ती व त्यापुढील ज्येष्ठ नागरिक
- मधुमेहाचा पूर्व इतिहास असलेली व्यक्ती
- पूर्व इतिहास धूम्रपानाचा पुर्व असलेली व्यक्ती
- ज्यांचा बॉडी मास इंडेक्स १८ पेक्षा कमी आहे.






**नीरा :** क्षयरोगाला प्रतिबंध करण्यासाठी बीसीजी लस प्रभावी ठरत असल्याने राज्यातील १८ वर्षांवरील ८० लाख नागरिकांना बीसीजी लसीकरणाची विशेष मोहीम शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे. त्या पार्श्वभुमीवर प्राथमिक आरोग्य केंद्र नीरा अंतर्गत मांडकी येथे एडल्ट बीसीजी लसीकरण घेण्यात आले.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२५ पर्यंत संपूर्ण भारत देश क्षयरोगमुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. त्यानुसार राज्यात सर्व जिल्हे, महानगरपालिका मिळून हे लसीकरण करण्यात येत आहे.त्यानुसार संपूर्ण राज्यातील पात्र नागरिकांचे लसीकरण करण्याची मोहीम आरोग्य विभागाने आखली आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत असून प्राथमिक आरोग्य केंद्र नीरा अंतर्गत मांडकी येथे एडल्ट बीसीजी लसीकरण घेण्यात आले. यावेळी लसीकरण केलेल्या व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विक्रम कामे, तालुका वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक फिरोज महात , आरोग्य सहाय्यक बाळासाहेब भंडलकर , आरोग्य सेविका सारिका मुळे, आरोग्य सेवक सुर्यकांत नेवर , अनिता साळुंके , सुषमा भोसले आदी उपस्थित होते.

# महागणपतीच्या पालखीचे ढोकसांगवीत उत्स्फूर्त स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव:** भाद्रपद गणेशोत्सवानिमित्त अष्टविनायक रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथील महागणपतीच्या पालखीचे श्री क्षेत्र ढोकसांगवी येथे ग्रामस्थांनी मंगलमय वातावरणात व मोठया उत्साहात स्वागत केले.यावेळी 'गणपती बाप्पा मोरया,मंगलमूर्ती मोरया'चा जयघोष करण्यात आला.

शनिवारी, दि.७ गणेश चतुर्थीच्या दिवशी महागणपतीची भगिनी असलेल्या मुक्ताई देवीला भाद्रपद यात्रेला आणण्यासाठी महागणपती मंदिरातून उत्तरद्वार यात्रेसाठी ढोकसांगवीकडे दुपारी सव्वाबारा वाजता वाजतगाजत प्रस्थान झाले. यावेळी आमदार ॲड अशोक पवार, देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, मुख्य विश्वस्त डॉ.ओमकार देव, उपाध्यक्ष संदीप दौडकर, सचिव डॉ.तुषार दौडकर,खजिनदार विजय देव,शेखर पाचुंदकर, दत्तात्रय पाचुंदकर आदिसह पालखीचे मानकरी शेळके आळीतील ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते.

महागणपतीच्या पालखीचे ढोकसांगवी येथे दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामस्थांनी मोठया जल्लोषात स्वागत केले.येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालयातील विदयार्थ्यांच्या ढोल लेझिम पथकाने या मिरवणुकीत रंगत आणली. पालखी मुक्ताई देवीच्या मंदिरात पोचल्यानंतर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर यांनी देवस्थान ट्रस्टच्या वतीने आणलेल्या शाही वस्त्राणी मुक्ताई देवीची ओटी भरल्यानंतर स्थानिकांनी देवीचा जोगवा मागितला. त्यानंतर ग्रामस्थ व भाविकांच्या उपस्थितीत उपस्थितीत सामूहिक आरती झाली.त्यानंतर सनई चौघड्यांच्या गजरात पालखीची ग्रामप्रदिक्षणा झाल्यानंतर पालखी मारुती मंदिरासमोर ग्रामस्थ व भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात आली.

यावेळी पालखीच्या शेळके आळीतील मानकऱ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी येथील जय मल्हार भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. द्वारकरी व दर्शनसाठी आलेल्या भाविकांसाठी ग्रामस्थांच्या वतीने चहा, दूध,केळी व खिचडी आदि प्रसाद म्हणून वाटण्यात आले.

सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास महागणपतीची पालखी मुक्ताई देवीला घेवून रांजणगाव गणपतीकडे मार्गस्थ झाली.



श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी संस्थान समितीच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची प्रतिमा देऊन मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथ उपस्थित होते.




## डीजेचा वापर केल्यास,वर्गणीसाठी सक्ती केल्यास कायदेशीर कारवाई

**नारायणगाव:** पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे व उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करून गणेशोत्सव मंगलमय वातावरणात साजरा करा. विसर्जन मिरवणूक रात्री बारा पूर्वी संपवावी. ध्वनी मर्यादेचे पालन करून वाद्य वाजवावीत. अधिकृत वीज जोडणी करून गणेश मंडप व गणेश मूर्तीच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी.डीजे चा वापर करू नये. गणेश भक्तांनी वर्गणीसाठी सक्ती करू नये. तक्रार आल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांनी दिला. गणेशोत्सवा निमित्त नारायणगाव पोलीस स्टेशनच्या सभागृहात उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर

यांच्या उपस्थितीत नारायणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुमारे वीस गावातील गणेश उत्सव मंडळाचे अध्यक्ष,बियर बार, डीजे मालक,पोलीस पाटील,ग्राम सुरक्षा दल,विद्युत विभागाचे अधिकारी यांची संयुक्त मीटिंग घेण्यात आली. यावेळी नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, फौजदार जगदेव पाटील,राजेंद्र कोल्हे, उपसरपंच योगेश पाटे,माजी उपसरपंच संतोष दांगट आदी मान्यवर व गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर म्हणाले विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी सर्व मंडळांनी वेळेचे बंधन पाळावे.सर्वोच्च न्यायालयाच्या अधिन राहून ध्वनी तिव्रतेचे पालन करावे. मिरवणुकीत डीजे चा वापर केल्यास व वर्गणीसाठी सक्ती केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## मालकाची कामगार फसवणूक करुन फरार

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील व्यंकटेशा पेट्रोल पंपावर काम करणारा कामगार पेट्रोल पंप मधील ८२ हजार रुपयांची रक्कम स्वतःच्या बँक खात्यामध्ये टाकून फरार झाल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे महादेव शिवाजी कोकाटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टाकळी हाजी (ता. शिरुर) येथे प्रभाकर गावडे यांच्या मालकीचे व्यंकटेशा पेट्रोल पंप असून येथे कामगार असलेल्या महादेव कोकाटे याने ग्राहकांकडून ऑनलाइन पद्धतीने आलेले पैसे त्याच्या स्वतःच्या बँक खात्यामध्ये घेतले. त्यांनतर गोळा झालेली रोख रक्कम मालकाकडे जमा केली. मात्र ऑनलाईन पद्धतीने घेतेलेले तब्बल ब्याऐंशी हजार रुपये रक्कम त्याच्या जवळ ठेवून घेत मालकाची फसवणूक करुन तो फरार झाला.

# पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करा

### माजी नगराध्यक्षा शहा यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** स्वच्छ व सुंदर हरित इंदापूर अशी ओळख देशपातळीपर्यंत केवळ इंदापूरकरांच्या सहकार्याने पोहोचली आहे. शहरातील प्रत्येक कुटुंबात गणेशोत्सव आनंदाने साजरा होतो. युवक गणेश मंडळे आदर्श निर्माण होईल असा गणेशोत्सव साजरा करतात. याच जोडीला पर्यावरणपूरक गणेश उत्सव इंदापूरकरांनी साजरा करावा, असे आवाहन माजी नगराध्यक्षा अंकिता मुकुंद शहा यांनी केले.

इंदापूर शहरातील शहा परिवाराच्या वतीने अंकिता शहा यांच्या निवासस्थानी शनिवारी गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली. यावेळी इंदापूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष भरत शहा, शहा परिवाराचे सर्वेसर्वा मुकुंद शहा, युवा उद्योजक अंगद शहा, रुचिरा अंगद शहा, वैशाली भरत शहा, मालती सुरेश शहा व शहा कुटुंबीय उपस्थित होते.

अंकिता शहा म्हणाल्या, इंदापूर शहराला स्वच्छतेचे महत्व प्रचंड घराघरात पटले आहे. गणेश उत्सव कालावधीत परिसरामध्ये वृक्षारोपण, रक्तदान व सामाजिक उपक्रम राबवणारे शहर म्हणून उत्कृष्ट काम करते. पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने आपला सहभाग नोंदवावा.

## प्रकाश शिंदे यांचे निधन



**शिक्रापूर:** विठ्ठलवाडी ता. शिरुर येथील विविध विकास कार्यकारी सोसायटीचे माजी संचालक प्रकाश जयवंतराव शिंदे वय ६५ वर्षे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे, भारतीय जनता पार्टी किसान आघाडीचे प्रदेश सचिव जयेश शिंदे व उद्योजक नितीन शिंदे यांचे ते वडील होत.





## ढोल ताशाच्या गजरामध्ये गणरायाचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया या जय घोषामध्ये आज गणपती बाप्पाचे आगमन झाले. नारायणगाव परिसरामध्ये घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना बारा वाजेच्या आत मध्ये बहुतांशी लोकांनी केली तर सार्वजनिक गणेश मंडळांची प्रतिष्ठापना दुपारी चारच्या नंतर करण्यात आले.

ढोल ताशाच्या गजरामध्ये गणरायाचे स्वागत करण्यात आले. गणपती उत्सवाच्या स्वागतासाठी व पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी नारायणगाव शहरांमध्ये सकाळपासून मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. केवडा,दुर्वा फुले व हार खरेदी करण्यासाठी नारायणगावची बाजारपेठ गजबजून गेली होती. काही वेळ मुख्य बाजारपेठेलावाहतुकीचा अडथळा देखील निर्माण झाला होता.

दरम्यान गणपती उत्सवाच्या काळामध्ये शहरामध्ये गणपती उत्सवाचे साहित्य खरेदी करण्यासाठी येणाऱ्या लोकांची घर से होऊ नये व वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये म्हणून नारायणगावचे उपसरपंच व त्यांचे सहकारी ठिकठिकाणी थांबून वाहतूक सुरळीत करीत होते. गणपती बाप्पाच्या आगमनाचा आजचा पहिला दिवस असल्यामुळे घरगुती गणपतीची प्रतिष्ठापना करताना सजावट देखील चांगल्या प्रकारे केल्याचे पाहायला मिळाले. तथापि सार्वजनिक गणेश मंडळांनी आज फक्त गणपती बाप्पाचे स्वागत करून प्रतिष्ठापना केली आहे विविध प्रकारचे डेकोरेशन व सजावट उद्यापासून मंडळाच्या माध्यमातून केले जाणार आहे. तसेच यंदाच्या वर्षी अनेक सार्वजनिक मंडळांनीविविध उपक्रमाचे आयोजन केले आहे. काही ठिकाणी भजन स्पर्धा काही ठिकाणी कीर्तनाचे आयोजन तर काही ठिकाणी विविध प्रकारच्या स्पर्धांचे देखील आयोजन केले आहे.

दरम्यान यंदाच्या वर्षे विधानसभा निवडणुकीचे वर्ष असल्याने राजकीय मंडळींच्या गणपती मंडळांनाअधिक प्रमाणात भेटी असणार आहेत.किंवा भेटीस नाही तर त्या मंडळांनाआर्थिक मदत सुद्धा केली जाणार आहे.काही मंडळांना ढोल ताशे देखील दिले जाणार आहेत. जुन्नर तालुक्यामध्ये आमदार होण्यासाठी इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे गणेश मंडळांना याचा जास्त फायदा होणार आहे.

### महाराष्ट्र शिक्षक परिषद, पुरंदर तालुका आयोजित

# नीता भालेराव यांना गुणवंत शिक्षिका पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी:** कानिफनाथ विद्यालय भिवरी, ता.पुरंदर या विद्यालयातील उपशिक्षिका सौ. नीता विजय भालेराव यांना महाराष्ट्र शिक्षक परिषद, पुरंदर तालुका आयोजित पुरंदर तालुकास्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गुरुकुल करिअर ॲकडमी,सासवड येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमामध्ये माजी शिक्षक आमदार भगवानराव साळुंखे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्र राज्य परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष गुलाबराव गवळे, सारथी पुणे चे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी महेश शेंडकर ,महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर ,राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त माजी मुख्याध्यापक कुंडलीक मेमाणे.सुधाकर जगदाळे वसंत ताकवले ,प्राचार्य दत्ताराम रामदासी, प्राचार्य संदिप टिळेकर आदी उपस्थितीत होते .



पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे भिवरी येथील कानिफनाथ विद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या सौ भालेराव या इंग्रजी विषयाचे अध्यापनाबरोबरच क्रिडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी महिला क्रिकेट संघाच्या माजी क्रिकेटपटू असून सन २००० मध्ये ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी महिला क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या, पुणे युनिव्हर्सिटी संघातील उत्कृष्ट गोलंदाज खेळाडू म्हणून त्यांना गौरविलेले आहे. त्याबरोबरच नुकत्याच पार पडलेल्या सन २०२४-२०२५ या शालेय वर्षाकरीता १७ व १९ वय वर्षाखालील मुली वयोगटाच्या जिल्हास्तरीय शासकीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड समितीच्या सदस्यपदी जिल्हा क्रिडाअधिकारी,पुणे कार्यालयाकडून सौ.नीता भालेराव यांची निवड झालेली आहे. त्याचबरोबर त्यांच्या शालेय तसेच महाविद्यालयीन जीवनामध्ये जिल्हास्तर,राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर क्रिकेट खेळामध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केलेले आहे. यापूर्वी सौ भालेराव यांना पुरंदर तालुका पंचायत समिती आदर्श शिक्षिका पुरस्कार त्याबरोबर इतर अनेक सामाजिक संस्था ,संघटनांनी वेळोवेळी गौरविलेले आहे. महाराष्ट्र शिक्षक परिषदेच्या या गुणवंत शिक्षिका पुरस्कारा बद्दल पुरंदर-हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी सौ.भालेराव यांचे अभिनंदन केले. #रा

### लूट, खंडणीवरून राजकीय नेत्यांमध्ये वादंग

# इतिहासावरून रणकंदन

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी सुरतेची लूट केली होती, या शब्द प्रयोगाला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्षेप घेतल्यानंतर राज्यात राजकीय रणकंदन माजले आहे. माझ्या राजाला मी कदापिही लुटारू म्हणणार नाही, याचा पुनरुच्चार फडणवीस यांनी केला आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिवाजी महाराजांनी खंडणी वसूल केली हा आपला शब्द प्रयोग योग्यच असून भाजपच्या लोकांना इतिहास माहीत नसल्याची टीका केली आहे. दरम्यान, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी शिवाजी महाराजांनी ईडीप्रमाणे सक्तीची वसुली केली, असे विधान केले आहे.

## इतिहास सुधारला पाहिजे : फडणवीस

● लुटारू या शब्दावरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमातून लुटारू हा शब्द वगळणार का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केल्यावर ते म्हणाले की, महाराजांनी कधीही लूट केली नाही. सर्वसामान्यांना त्यांनी कधी त्रास दिला नाही. इतिहासात जर काही चुकीच्या गोष्टी आल्या असतील तर त्या सुधारल्या पाहिजे. इंग्रज इतिहासकाराने हे वर्णन केले आहे. इंग्रजांच्या नजरेतून महाराजांना पाहण्याऐवजी आपल्या इतिहासकारांनी एकत्र येऊन महाराजांबद्दल चुकीचे लिहिले असेल तर ते सुधारण्याचा प्रयत्न करावा.



● फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर विघ्नहर्त्या गणेशाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी त्यांनी मीडियाशी संवाद साधला. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिवाजी महाराज खंडणी वसूल करायचे असे म्हटले होते. त्यावर भाजपने आक्षेप घेतला आहे. या वादावर फडणवीस म्हणाले, त्यांना प्रत्येक ठिकाणी खंडणीच दिसेल. जे खऱ्या अर्थाने इतिहासाचे अभ्यासक आहेत, सदानंद मोरे, शिवरत्न शेट्ये या सर्वांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. माझ्या राजाला लुटारू म्हणणं मी खपवून घेणार नाही. बाप्पांना राज्याची प्रगती कोण करू शकतं हे माहीत आहे. बाप्पाचा आशीर्वाद आम्हाला मिळेल. बऱ्याच लोकांना सद्बुद्धी देण्याची आवश्यकता आहे. सर्वांना सद्बुद्धी मिळो ही बाप्पा चरणी प्रार्थना आहे, असा टोला त्यांनी लगावला.

## खंड म्हणजेच खंडणी : पाटील

● शिवाजी महाराजांनी खंडणी वसूल केली, हा शब्दप्रयोग योग्य असल्याचे सांगताना शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील



यांनी पुन्हा एकदा स्पष्टीकरण दिले. त्यांनी माध्यमांशी बोलताना इतिहासातील काही दाखले दिले. खंडणी हा शब्द कसा योग्य आहे ते पटवून देण्याचा प्रयत्न केला. जयंत पाटील यांनी माफी मागावी अशी मागणी भाजपने केली आहे. यावर पाटील म्हणाले, 'भाजपला इतिहास माहित नाही. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज चरित्र लेखमालेत उल्लेख केला आहे. दुसऱ्यांदा सुरत लुटली त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी तिथल्या जनतेला उद्देशून पत्र लिहिले. प्रतिवर्षी १२ लाख रुपये खंडणी बिनबोभाट पावती केली, तर तुमच्या शहराला पुन्हा लुटीची भीती उरणार नाही, असे महाराजांनी लिहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत काबीज केली, हातात ठेवली नाही. महाराज तिथे गेले, हल्ला केल्यानंतर त्या ठिकाणची सगळी लूट एकत्र करुन परत आणली. भाजपचा इतिहास कच्चा आहे. 'भाजपच्या नेत्यांनी खंडणी या शब्दाला पूर्वी पर्याप्त शब्द काय होता? हे सांगावे. आधी खंड म्हणायचे. तुम्ही तुमच्या उत्पन्नातला खंड आम्हाला द्या, आम्ही तुमच्यावर हल्ला करणार नाही. खंडाची पुढे खंडणी झाली. आता गुन्हेगार मागतात ती खंडणी वेगळी. खंड किंवा खंडणी मागणं म्हणजे तिथे जाऊन सामर्थ्य दाखवणं. मी इथे येऊ नये असे वाटत असेल तर तो खंड आम्हाला द्या. अशी ती व्यवस्था पूर्वी होती,' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

## ईडीप्रमाणे वसुली केली : गोविंददेव गिरी

● छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली नव्हती तर सुरतेवर स्वारी केली होती, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून यावर जोरदार आक्षेप घेत, ऐतिहासिक दाखले देण्याची स्पर्धा सुरू झाली. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी छत्रपती शिवरायांनी खंडणी मागितली होती, असे विधान केले. यावर वाद-प्रतिवाद सुरू असतानाच आता श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी छत्रपती शिवरायांच्या सुरत लुटीबाबत वेगळेच विधान केले आहे.

● 'संपूर्ण राज्य हिंदूंचे आहे, असे मानून शिवाजी महाराज कार्य करत होते. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेदरम्यान जेव्हा महाराजांना आर्थिक चणचण भासत असे आणि अशावेळी कुठलाही उपाय दिसत नसे. सध्या ईडी सक्तीची वसुली करते.

## » Selected

## भिकारी एसी बसमधून सहलीला!

**नागपूर :** भिकाऱ्यांकडे पाहण्याचा समाजाचा एक दृष्टिकोन आहे. अनेक जण एक-दोन रुपये देऊन स्वतःची सुटका करुन घेतात. पण, राज्याची उपराजधानी नागपूर हे शहर त्याला अपवाद ठरले आहे. या शहरातील ज्येष्ठ भिकाऱ्यांना सहलीवर नेण्याचा अनोखा उपक्रम राबवण्यात येत आहे. भिकारीमुक्त भारत अभियानचा हा उपक्रम सध्या चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरला आहे. नागपुरातील ज्येष्ठ भिकारी रामटेकच्या रामधामची यात्रा करणार आहेत. ५० भिकारी डबल डेकर एसी बसमधून सहलीला निघाले आहेत. भिकाऱ्यांनासुद्धा मुख्य प्रवाहात आणावे, त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण यावे. त्यांना सुद्धा माणूस म्हणून जगता यावे यासाठीचा हा प्रयत्न आहे. सहलीला जाणाऱ्या भिकाऱ्यांनी याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. पहिल्यांदाच सुविधाजनक बसमध्ये बसून सहलीला जाण्याचा आनंद दिसत होता.

## संस्थास्तरावरील प्रवेश अडचणीत येणे शक्य

**पुणे :** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजी या संस्थेने नियमबाह्य प्रवेश प्रक्रिया राबविल्याची तक्रार प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सीईटी सेलचे नियम धाब्यावर बसवून संस्थास्तरावर राबविलेली प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याचे आदेश पुणे विभागीय तंत्र शिक्षण सहसंचालक डी. व्ही.जाधव यांनी दिले आहेत. त्यामुळे संस्थास्तरावरील प्रवेश अडचणीत येण्याची शक्यता आहे. राज्य सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांच्याकडे युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी पीआयसीटीने राबविलेल्या नियमबाह्य प्रवेश प्रक्रियेबाबत लेखी तक्रार केली होती. त्यावर सीईटी सेलने तंत्रशिक्षण विभागाला कार्यवाहीचे निर्देश दिले होते. जाधव यांनी परिपत्रक प्रसिद्ध करून पीआयसीटीने राबवलेले नियमबाह्य प्रवेश रद्द करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## भरधाव कारने दोघांना उडवले

**मुंबई :** मुंबईत एकीकडे गणरायाचे आगमन होत असतानाच मुलुंडमध्ये पहाटेच्या सुमारास भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. हिट अँड रन प्रकरणाने मुंबईत आणखी एका तरुणाचा बळी घेतला आहे. मुलुंडमध्ये पहाटे एका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बॅनर लावताना भरधाव बीएमडब्लू कारने दोन तरुणांना उडवलं. त्यातील एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर एकाची प्रकृती गंभीर आहे. या प्रकरणी बीएमडब्लू कारच्या चालकाला अटक करण्यात आलीय. या घटनेनंतर आरोपी हा नवी मुंबई येथे पळून गेला होता. मात्र पोलिसांनी आरोपीला अटक केली. दरम्यान या घटनेने गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी 'मुलुंडचा राजा' या गणेश मंडळावर आणि परिसरात शोककळा पसरली आहे. मुलुंड पूर्वेकडील गव्हाणपाडा परिसरातील 'मुलुंडचा राजा' या मंडळाच्या दोन कार्यकर्त्यांना रस्त्यावर बॅनर लावत असताना जोरदार धडक दिली.

## यूपीएससीची तयारी करणाऱ्या तरुणाची आत्महत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** ठाणे शहरात एका २८ वर्षीय यूपीएससीची तयारी करणाऱ्या एका तरुणाने इमारतीच्या आठव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. ही घटना वर्तक नगर परिसरात शनिवारी (७ सप्टेंबर २०२४) रात्री साडेआठच्या सुमारास घडली. नैराश्यातून संबंधित व्यक्तीने आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

ठाणे येथील वर्तक नगर पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, मृत व्यक्तीच्या घरात एक 'सुसाइड' नोट सापडली आहे. यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊ न शकल्याने तो नैराश्यात होता. यातूनच त्याने आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलले, असा पोलिसांना संशय असेल. त्याने शनिवारी रात्री गृहसंकुलाच्या आठव्या मजल्यावरून उडी घेतली. त्यानंतर त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. वर्तक नगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## सोयाबीन, उडीदसाठी हमीभावाने खरेदी केंद्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**संभाजीनगर :** राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार केंद्र सरकारने समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन आणि उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले होते तेव्हा मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती. तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता. अखेर या मागणीला मान्यता मिळाली आहे.

केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ४८९२ रुपये प्रतिक्विंटल निश्चित केली आहे.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी आणि त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये, या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे.

तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे, याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार आणि पाठपुरावा केला. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा आनंद आहे, अशा भावना मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

## अदानी महाराष्ट्रात बनवणार सेमिकंडक्टर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उद्योगपती गौतम अदानी यांनी महाराष्ट्रात सेमीकंडक्टर प्लॅन्ट सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. अदानी समूह ८३ हजार कोटींचा सेमीकंडक्टर प्रकल्प महाराष्ट्रात सुरु करणार आहे. महाराष्ट्रातील या प्रकल्पासाठी अदानी समुहाला इस्त्रायलची मदत मिळणार आहे. यामुळे सेमीकंडक्टर क्षेत्रात आतापर्यंत वर्चस्व असलेल्या चीनला स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे.

भारताला सेमीकंडक्टर हब करण्याच्या दिशेने दमदार पावले टाकली जात आहेत. उद्योगपती रतन टाटा यांनी आसाममध्ये सेमीकंडक्टर प्लॅन्ट सुरु केला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला मोबाइल हब बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी मोदी सरकारने सेमीकंडक्टर पीएलआय (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह) स्कीम सुरु केली आहे. देशात बनलेली पहिली सेमीकंडक्टर चिप २०२५ च्या मध्यापर्यंत येणार आहे. चीनच्या सीमेजवळ २७००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम टाटा ग्रुपने आसाममध्ये सुरु केले आहे. या प्रकल्पातून रोज जवळपास ५ कोटी चिप तयार होणार आहेत.

टाटानंतर अदानी समूहाने या क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. अदानी समुहाने टाटा समुहापेक्षा मोठा प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. ८३ हजार कोटींचा हा प्रकल्प असल्यामुळे चीनची सेमीकंडक्टरमधील मक्तेदारी संपणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत कायन्स टेक्नोलॉजी इंडिया लिमिटेडच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पात रोज ६० लाख सेमीकंडक्टर चिप बनवण्यात येणार आहेत. हा प्रकल्प गुजरातमधील साणंदमध्ये होणार आहे. ३३०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा हा प्रकल्प आहे.

### सेमिकंडक्टरचे महत्व

● सेमीकंडक्टर म्हणजेच सिलिकॉन चिप प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उत्पादनात वापरली जातो. परंतु भारत सेमीकंडक्टर आयात करत



होता. जगभरात या क्षेत्रात चीनचे वर्चस्व आहे. सेमीकंडक्टर चिपशिवाय कोणतेही इलेक्ट्रॉनिक उत्पादन बनवता येत नाही. अगदी एलईडी बल्बपासून, कार, मोबाइलपर्यंत, टीव्ही, संगणक, लॅपटॉप, क्षेपणास्त्रांपर्यंत सेमीकंडक्टरचा वापर केला जातो.

## अतिसाराने मृत्यू; नेले झोळीतून!



बुलढाणा जिल्ह्यातील दुर्गम गावामध्ये अतिसारामुळे रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेहांना असे झोळीतून न्यावे लागले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर असलेल्या दुर्गम अशा गोमाल गावामध्ये अतिसाराच्या लागणमुळे तीन रुग्णांचा मृत्यू झाला. अनेक रुग्ण जळगाव जामोद आणि मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत. गोमाल हे गाव अतिशय दुर्गम भागात असल्याने या ठिकाणी कुठल्याही प्रकारे वाहन जायला रस्ता नसल्याचे चित्र आहे. रुग्णांना रुग्णालयात न्यायला वेळ झाल्याने या रुग्णांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मृत्यूनंतरही या रुग्णांचे मृतदेह गावात नेण्यासाठी १५ किलोमीटर झोळीत टाकून त्यांना न्यावे लागले.

स्वातंत्र्यानंतरही या गावात रस्ता नसल्याने संताप व्यक्त होत आहे. तर राज्यात आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजले असून या घटनेचा व्हिडिओ आता समाज माध्यमांमध्ये प्रचंड वायरल होत आहे.

तीन रुग्णांचा मृत्यू झाल्यानंतरही आरोग्य प्रशासनाला या रुग्णांचा मृत्यू कशामुळे झाला हे अद्याप अस्पष्ट असल्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी सांगितले. बुलढाणा आरोग्य प्रशासन याबाबत अनभिज्ञ आहे. तर गोमाल या गावात आणि परिसरात भीतीच वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे आज केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव जळगाव जामोद तालुक्यात विविध विकास कामाच्या उद्घाटनासाठी आणि भूमिपूजनासाठी दौऱ्यावर आहेत. मृत पावलेल्या तिघांची नावे सागरीबाई हिरू बामण्या (१८ वर्ष), जिया अनिल मुजालदा (२ वर्ष) आणि रविना कालू मुजालादा (५ वर्ष) अशी आहेत.

## एमआयएमचा मविआस अल्टिमेटम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशीच लढत दिसणार असून आघाडी आणि युती इतर छोटे पक्षही सहभागी करण्याचा प्रयत्न करत आहेत. असदुद्दीन ओवैसी यांच्या ऑल इंडिया मजलिस -ए-इत्तेहादुल मुस्लमीनने (एआयएमआयएम) महाविकास आघाडीसोबत जाण्याचा निर्णय घेतला असून तसा प्रस्ताव दिला आहे. त्याचे उत्तर अजून मिळाले नसल्याने ९ सप्टेंबरपर्यंत निर्णय न घेतल्यास स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय हा पक्ष घेणार आहे. माजी खासदार इम्तियाज जलील यांनी ही माहिती दिली. जलील यांनी सांगितले की, आमची आणि शिवसेना उबाठाची विचारसरणी वेगळी आहे. तरी राजकीय तडजोड म्हणून आम्ही शिवसेना उबाठा मविआमध्ये असताना आघाडी करण्यास तयार आहोत. कारण, आम्हाला राज्यातील शेतकरी आणि सामान्य लोकांचे हित महत्वाचे आहे.

### कमी पटसंख्येच्या शाळांसाठी तरतूद; उपलब्धतेची शंका

# सेवानिवृत्त शिक्षकांना अध्यापनाची संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा परिषदेच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये नियुक्त करावयाच्या दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक सेवानिवृत्त शिक्षकांमधून नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार कमी पटसंख्या असलेल्या सर्वच शाळांना सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध होतील असे नसल्याने अशा ठिकाणी पद रिक्त राहिल्यास विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २० व २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत सेवानिवृत्त शिक्षक किंवा डीएड, बीएड अर्हताधारक उमेदवार निव्वळ कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात येणार आहे.त्यांना दरमहा १५ हजार रुपये मानधनही देण्यात येणार आहे.



राज्यात डीएड व बीएड अर्हताधारक पात्र बेरोजगार उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना देखील अशा ठिकाणी संधी दिल्यास शिक्षकांचे पद रिक्त न राहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. त्यामुळे २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये सेवानिवृत्त शिक्षक किंवा डीएड बीएड अर्हताधारक पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे.

सेवानिवृत्त शिक्षकाच्या नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे राहील. राज्यातील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेला शिक्षक असावा. सुरुवातीचा नियुक्तीचा कालावधी एका शैक्षणिक वर्षासाठी राहील. त्यानंतर गुणवत्ता व योग्यतेच्या आधारावर आवश्यकतेनुसार सदर नियुक्तीच्या वाढीव कालावधीसाठी दरवर्षी नुतनीकरण करता येईल. मात्र, हा एकूण कालावधी जास्तीत जास्त ३ वर्षे असेल.

### नियमित सेवेचा लाभ नाही

● डी.एड, बी. एड. अर्हताधारक बेरोजगार उमेदवाराच्या नियुक्तीसाठी शासन नियमानुसार किमान व कमाल वयोमर्यादा लागू राहील. संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा सामावून घेण्याचे व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. नियमित शिक्षकांची नियुक्ती झाल्यानंतर कंत्राटी शिक्षकाची सेवा संपुष्टात येईल, असे शालेय शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

#रा

## कृषिमंत्री मुंडे यांची जरांगे यांच्याशी भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची शनिवारी मध्यरात्री अंतरवली सराटी गावात भेट घेतली. मुंडे यांच्यासोबत शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर चर्चा झाली. असे जरांगेंनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



ते म्हणाले की, ज्यावेळेस आमची आरक्षण विषयाबाबत चर्चा झाली त्यावेळेस व्यासपीठावर धनंजय मुंडे होते. मी माझ्या मुद्द्यावर ठाम आहे. माझ्या जीवात जीव आहे, तोपर्यंत गोरगरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी मी लढत राहणार आहे. आरक्षण फक्त ओबीसीतून मिळावे, यासाठी कायम ठाम असणार आहे.

मला आरक्षणाशिवाय दुसरं काही नको. मी झोपेत होतो आणि ते आले, तीन वाजले असतील अंदाजे. २० एक मिनिट चर्चा झाली. अंतरवलीत कोणीही येऊ शकतो. यावेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची चर्चा झाली. मराठा आरक्षणावरही चर्चा झाली.

'इथे कोणीही येऊ शकते. तो आमचा पाहुणा आहे. मी महाविकास आघाडीचा, महायुतीचा नाही. फक्त मराठ्यांचा आहे. शंभुराज देसाई यांनी कुणबींना सहा महिने व्हॅलेडीटीची वाढ दिली आहे. कृषिमंत्र्यांनी चांगलं काम केले शेतकऱ्यांचे, तर कौतुक का करू नये?' असा सवाल जरांगे यांनी केला.

विधानसभा निवडणुकीवर ते म्हणाले, आमच्याकडे आयतं मैदान आहे. आम्हाला तयारी करायची गरज नाही. उद्या जरी निवडणूक घेतली तरी तयार आहोत. भाजपमधले काही आमदार जातीच्या आणि आंदोलनाच्या विरोधात बोलू शकत नाही. मराठा आता परिवर्तनाच्या दिशेने निघालेला आहे'.

## मोदी-युनूस भेटीचे गूढ कायम

# बैठकीची मागणी प्रलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बांगलादेशमधील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या संभाव्य भेटीबाबतचे गूढ कायम राहिले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या अधिवेशनादरम्यान होणारी ही बैठक, होणार की नाही याचा निर्णय झालेला नाही.

युनूस यांनी नुकत्याच केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे ही बैठक होणार नाही, असे मानले जाते. युनूस सरकारच्या वतीने न्यूयॉर्कमध्ये पंतप्रधान मोदींसोबत बैठक घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या महिन्याच्या अखेरीस न्यूयॉर्क येथे होणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या बैठकीदरम्यान युनूस आणि मोदी यांच्यात द्विपक्षीय चर्चा व्हावी, अशी औपचारिक विनंती बांगलादेशने केली होती. मात्र, या विनंतीवर अद्याप कोणताही निर्णय भारत सरकारने घेतलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या न्यूयॉर्क दौऱ्यादरम्यान होणाऱ्या अन्य द्विपक्षीय बैठकांना अंतिम स्वरूप देण्यात येत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

याआधी युनूस यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर टीका केली होती. हसीना भारतात लपून बसल्या असून, भारताने त्यांच्यावर कारवाई करावी, असे ते म्हणाले होते. यासोबतच युनूस यांनी शेख हसीना यांना गप्प राहण्याचा सल्लाही दिला. भारत सरकार हसीना यांच्याविषयी कमालीची सहानुभूती दाखवत असून, इतर राजकीय पक्षांना इस्लामवादी म्हणत आहे, असा आरोपही त्यांनी केला. युनूस यांचे हे विधान भारताला आवडले नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळेच भारताला युनूस यांच्याबरोबरच्या द्विपक्षीय बैठकीत सहभागी व्हायचे नाही, असे मानले जाते.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## बांगलादेशात भाविकांवर धर्मांधांची दगडफेक

आंतरराष्ट्रीय

**बांगलादेशातील चितगाव** शहरातील कदम मुबारग भागात ६ सप्टेंबर रोजी गणेशाची मूर्ती घेऊन जाणाऱ्या हिंदू भाविकांवर कट्टरपंथींनी दगडफेक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.




गणेश चतुर्थीच्या एक दिवसाआधी ही घटना घडली, रिपोर्टनुसार बतरगली धवपारा सर्वजनीन पूजा समितीचे सदस्य कारागीर उत्तम पाल यांच्या कारखान्यातून गणेशाची मूर्ती एका गाडीतून आणत असताना हा प्रकार घडला होता. यावेळी भाविकांनी आपली गणेशमूर्ती मोमीन रस्त्यावर आणली आणि तिथून त्यांनी मिरवणुकीला सुरूवात केली. यावेळी कट्टरपंथींनी हिंदूंवर गरम पाणी टाकले आणि दगड, विटाफेक केली होती. यावेळी घडलेल्या घटनास्थळी एक मशीदही होती. यावेळी झालेला हल्ला एक कट असून जाणूनबुजून करण्यात आल्याचे बोलले जात आहे. यावेळी याप्रकरणामुळे कट्टरपंथी आणि हिंदूंमध्ये वादाला तोंड फुटले. या हल्ल्यात हिंदू तरूण जखमी झाले. यावेळी जखमी तरूणाने झालेला प्रकार सांगितला, तो म्हणाला की, एका आणखी हिंदू तरूणाच्या डोक्याला दुखापत झाली आहे. निर्वासित शेख हसीनांचा पक्ष अवामी लीगने या हल्ल्याचा निषेध केला आहे. अवमी लीगने पोस्ट केलेल्या व्हिडिओत शेख हसीनांचा अवामी पक्षाने या झालेल्या निषेध केला आहे. अवामी लीगने पोस्ट केलेल्या व्हिडिओत विचारण्यात आले की, "अल्पसंख्यांकांवर हल्ले का होत आहेत?" असा सवाल करण्यात आला होता. यावेळी प्रत्युत्तरादाखल हिंदूंनी एकत्र येऊन झालेल्या घटनेचा निषेध केला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी घटनास्थळी मोठा फौजफाटा, सैन्य तैनात करण्यात आले होते.

---

» Selected

## राहुल गांधी अमेरिकेत

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी अमेरिकेतील डलास येथे पोहोचले आहेत. विरोधी पक्षनेते



म्हणून त्यांचा हा पहिलाच अमेरिका दौरा आहे. राहुल येथील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून येथील विद्यार्थी आणि भारतीय समुदायाची भेट घेणार आहेत. ओव्हरसीज काँग्रेसचे प्रमुख सॅम पित्रोदा यांनी राहुल अमेरिका दौऱ्यावर येणार असल्याची बातमी दिली होती. डल्लासपाठोपाठ राहुल ९ तारखेला टेक्सास आणि १० तारखेला वॉशिंग्टन डीसीलाही भेट देणार आहेत.

## मलावीला तांदूळ पाठवला

**नवी दिल्ली :** भारताने दुष्काळग्रस्त मलावीला मानवतावादी मदतीचा एक भाग म्हणून एक हजार मेट्रिक टन तांदूळ पाठवला आहे. आग्नेय



आफ्रिकन देश कोरड्या हवामानाने होरपळत असून, तेथील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तेथील अन्न उत्पादनावर नकारात्मक परिणाम झाला आहे. अल निनोमुळे निर्माण झालेल्या भीषण दुष्काळाच्या परिणामांवर मात करण्यासाठी १,००० मेट्रिक टन तांदूळ मलावीला रवाना झाला, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. मार्च महिन्यात मलावीतील सरकारने देशातील २८ पैकी २३ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ पडल्याचे अधिकृतपणे जाहीर केले होते.

---

## भाजपची सहावी यादी जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने आगामी जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची सहावी यादी जाहीर केली असून, यात सहा उमेदवारांचा समावेश आहे. त्यापैकी पाच उमेदवार मुस्लिम आहेत.

भाजपने आतापर्यंत ५७ जागांवर उमेदवार जाहीर केले असून, यापैकी सुमारे २४ जागांवर मुस्लिमांना तिकीट देण्यात आले आहे. भाजपने ज्या जागांवर मुस्लिमांना उमेदवारी दिली आहे, त्यातील बहुतांश जागा खोऱ्यातील आहेत.

जम्मू-काश्मीरमधील ४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाल्यानंतर, त्याविरोधात तक्रारी आल्या. त्यानंतर भाजपने सुधारित यादी जाहीर केली. कार्यकर्त्यांच्या विरोधानंतर पक्षाला हे पाऊल उचलावे लागले.

---

### कोलकाता प्रकरणावरून दिला राजीनामा

# तृणमूलला घरचाच आहेर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचा कोलकाता प्रकरणावरून घरचाच आहेर मिळाला आहे. पक्षाचे राज्यसभा खासदार जवाहर सरकार यांनी राजीनामा दिला असून, त्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना पत्र लिहून निवासी डॉक्टरच्या हत्येप्रकरणी नाराजी व्यक्त करत, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.

भ्रष्ट अधिकाऱ्यांना महत्त्वाची आणि उच्च पदे मिळणे यासारख्या काही गोष्टी मी सहन करू शकत नाही. कोलकात्याच्या आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केल्यानंतर बंगालमध्ये झालेल्या निदर्शने आणि गोंधळानंतर त्यांनी राजीनामा दिला आहे. जवाहर सरकार म्हणाले की, जनतेचा संताप तृणमूल सरकारविरोधात वाढत्या असंतोषाचे द्योतक आहे. ममता बॅनर्जी यांच्या सरकारने जनतेचा विश्वास गमावला असून, एवढ्या वर्षांत मी सरकारबद्दल एवढा राग आणि अविश्वास कधीच पाहिला नाही, असे त्यांनी नमूद केले. ही घटना घडल्यापासून, मी एक महिन्यापासून संयम ठेवण्याचा प्रयत्न करत आहे आणि ममता बॅनर्जी आंदोलक डॉक्टरांशी थेट संवाद साधतील, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे काहीही झालेले नाही आणि सरकार जी उपाययोजना राबवत आहे, त्या कमी असून, ही कारवाई खूप उशीरा करण्यात आली, असेही त्यांनी म्हटले आहे.

जवाहर सरकार यांनी तृणमूल काँग्रेसला संघर्ष मिटवण्याचे आवाहन केले आहे. हे आंदोलन प्रामुख्याने राजकीय हेतूंपेक्षा न्याय आणि शिक्षेसाठी असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

---

# लोकसंख्येपेक्षा जास्त आधारधारक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** आसाममध्ये लोकसंख्येपेक्षा जास्त आधार कार्डधारक असल्याने, बांगलादेश घुसखोरांनी आधार कार्ड काढल्याचा आरोप आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी केला आहे. आसामच्या चार जिल्ह्यांमध्ये अंदाजित लोकसंख्येपेक्षा जास्त प्रमाणात आधार कार्डधारक आहेत.

बारपेटा, धुबरी, मोरीगाव आणि नागाव या चार जिल्ह्यांमध्ये मुस्लीम बहुसंख्य आहेत. धुबरीची सीमा बांगलादेशाला लागून आहे. बारपेटामध्ये १०३.७४ टक्के, धुबरीमध्ये १०३.४८ टक्के, मोरीगावमध्ये १०१.७४ टक्के आणि नागावमध्ये १००.६८ टक्के लोकांना आधार कार्ड देण्यात आले, यातूनच घुसखोरांनी आधार कार्ड घेतले, असा सरमा यांनी म्हटले आहे. येत्या १० दिवसांत आसाम सरकार नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल, ज्यानुसार १ ऑक्टोबरपासून आधार कार्डसाठी अर्ज करणाऱ्यांना आपला राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) अर्ज क्रमांक द्यावा लागेल.

बेकायदेशीर घुसखोरांना आधार घेता येणार नाही, असेही ते म्हणाले. या प्रयत्नामुळे बांगलादेशातून होणारी बेकायदेशीर घुसखोरी रोखण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. एनआरसी अद्ययावत करताना २०१९ मध्ये युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने (यूआयडीएआय) ज्या ९.३५ लाख लोकांचे बायोमेट्रिक्स ब्लॉक केले होते, त्यांना सप्टेंबरच्या आत आधार कार्ड मिळेल. त्याला केंद्र सरकारने नुकतीच मंजुरी दिली. येत्या एक ते दोन दिवसांत यूआयडीएआय प्रोटोकॉल जाहीर करेल, असे ते म्हणाले. दरम्यान, बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांना शोधण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न तीव्र करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

### गर्दी आणि सणासुदीमुळे निर्णय

# वंदे भारतला आता २० डबे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वे आता २० डब्यांची वंदे इंडिया ट्रेन आणणार आहे. या गाड्या दिल्लीहून ठराविक मार्गांवर चालवल्या जाणार आहेत. माध्यमातील वृत्तानुसार, वाढती गर्दी आणि सणासुदीचा हंगाम लक्षात घेऊन ही व्यवस्था करण्यात येत आहे.

भारतात वंदे इंडिया एक्स्प्रेस गाड्यांचे आकर्षण वाढत आहे. वेग आणि त्यातील सोयीसुविधांमुळे ही गाडी प्रवाशांच्या पसंदीस उतरत आहे. मात्र, वाढत्या मागणीमुळे त्याची तिकिटे लवकर आरक्षित होतात. सध्या वंदे इंडिया गाड्या आठ ते १६ डब्यांनी धावतात. विशेषत: सणासुदीच्या काळात मात्र गर्दी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे कन्फर्म तिकीट मिळणे अवघड झाले आहे.

२० डब्यांची वंदे इंडिया उत्तर रेल्वे मार्गावर धावणार आहे. नवी दिल्ली-वाराणसी (दोन गाड्या), नवी दिल्ली-श्री माता वैष्णोदेवी कटरा (दोन गाड्या), नवी दिल्ली-अंब अंदुरा (हिमाचल प्रदेश), हजरत निजामुद्दीन-राणी कमलापती, नवी दिल्ली-अजमेर, नवी दिल्ली-डेहराडून, हजरत निजामुद्दीन-खजुराहो आणि जुनी दिल्ली-अमृतसर या मार्गांचा समावेश आहे. विशेष म्हणजे २० डब्यांच्या गाडीची यशस्वी चाचणी ऑगस्टमध्ये मुंबई-अहमदाबाद मार्गावर घेण्यात आली होती.

सध्या १६ डब्यांच्या वंदे इंडियामध्ये दोन एक्झिक्युटिव्ह एसी चेअर कार कोच आणि १६ एसी चेअर कार कोच आहेत.

---

## शाळा उद्ध्वस्त

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**खान युनिस :** दक्षिण गाझा पट्टीतील खान युनिस येथे इस्रायलच्या हल्ल्यात शाळा उद्ध्वस्त झाली असून, कुठे शिकायचे, हा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर आहे.

---

## पोप फ्रान्सिस यांच्यावर हल्ल्याचा कट उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पोप फ्रान्सिस यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचल्याप्रकरणी इंडोनेशिया पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले आहे. पोप १२ दिवसांच्या आशिया-पॅसिफिक दौऱ्यावर असून, शुक्रवारी त्यांचा इंडोनेशिया दौरा संपल्यानंतर त्यांच्या दौऱ्याचा पहिला टप्पा संपला. जकार्ताजवळील बोगोर आणि बेकासी शहरांमध्ये सात जणांना ताब्यात घेण्यात आले. पोप मंगळवार ते शुक्रवार या कालावधीत जकार्ता दौऱ्यावर होते.

---

# कमी दाबाच्या पट्ट्याचे रुपांतर चक्रीवादळात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे आता चक्रीवादळात रूपांतर झाले आहे, अशी माहिती भारतीय हवामान शास्त्र विभागाने दिली. हे क्षेत्र कलिंगपट्टणम (आंध्र प्रदेश) पासून सुमारे ३१० किमी पूर्वेला, गोपालपूर (ओडिशा) पासून २६० किमी पूर्व-आग्नेयेला, पारादीप (ओडिशा) पासून २९० किमी दक्षिण-आग्नेय आणि दिघा (पश्चिम बंगाल) पासून ४१० किमी दक्षिणेस आहे.

पुढील २४ तासांत हे चक्रीवादळ उत्तर ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीकडे सरकण्याची शक्यता असून ते आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यानंतर येत्या दोन दिवसांत ते पश्चिम बंगालला लागून असलेल्या उत्तर गंगेच्या भागाकडे, झारखंडच्या उत्तर भागात आणि लगतच्या छत्तीसगडच्या दिशेने सरकण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याने रविवारी ओडिशातील गंजम, गजपती, रायगड, मलकानगिरी आणि कोरापुट जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा 'ऑरेंज' अलर्ट जारी केला आहे. केंद्रपाडा, खुर्दा, पुरी, जगतसिंगपूर, कटक, नयागड, कंधमाल, कालाहांडी आणि नबरंगपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा 'यलो' अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोमवार, मंगळवार आणि बुधवारी राज्याच्या बहुतांश भागात पावसाचा अंदाज आहे. वायव्य बंगालचा उपसागर आणि लगतच्या पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरात ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

---

# इस्रायली पुन्हा रस्त्यांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दीर अल-बलाह :** गाझामधील उर्वरित बंधकांना परत आणण्यात सरकार अपयशी ठरल्याच्या निषेधार्थ मोठ्या संख्येने इस्रायली नागरिक पुन्हा रस्त्यावर उतरले. दरम्यान, इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात एक डझनाहून अधिक पॅलेस्टिनी ठार झाले.

गाझामध्ये आणखी सहा मृत ओलीस सापडल्यानंतर, ही सर्वात मोठी निदर्शने ठरली. इस्रायली पंतप्रधान नेतन्याहू यांनी युद्धविराम करारासाठीचा दबाव धुडकावून लावल्यानंतर, तसेच याबाबत मला कोणीही सांगू नये, असे त्यांनी सुनावल्यानंतर, हे नवे आंदोलन तेथे झाले.

इस्रायलवर युद्धविराम करार करण्यासाठी दबाव वाढत आहे. मात्र, नेतन्याहू यांनी इजिप्तला लागून असलेल्या गाझाच्या सीमेवरील फिलाडेल्फी कॉरिडॉरवर इस्रायलचे नियंत्रण कायम ठेवण्याचा आग्रह धरला आहे.

---

### विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर

# आरोप प्रत्यारोपांची राळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये या महिन्यात विधानसभा निवडणुका होणार असून, राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांची फेरी सुरू झाली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुख अब्दुल्ला यांनी दावा केला आहे की, विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि कॉंग्रेसची आघाडी विजयी होईल. फारुख अब्दुल्ला यांनी अमित शहा यांच्या वक्तव्यावर पलटवार करत ही आघाडी जम्मू-काश्मिरला स्वतंत्र दर्जा मिळवून देईल, असेही म्हटले आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना फारुख अब्दुल्ला म्हणाले की, भारत हा सर्वांचा आहे. हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन आणि येथे राहणारे सर्व लोक भारतातील आहेत.

आम्ही घुसखोर नाही. जे मुस्लिमांकडे बोट दाखवत आहेत, त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की मुस्लिमांनीही या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले आहे. देशाच्या स्वातंत्र्यात मुस्लिम समान भागीदार आहेत, असा दावा त्यांनी केला. कलम ३७० हटवल्यानंतर खोऱ्यातील दहशतवाद संपवण्याला भाजपचा दावाही खोटा आहे, असेही ते म्हणाले.

---

### १७ सप्टेंबरपासून परतण्यास सुरुवात, सरासरीपेक्षा जास्त पाऊस

# देशभरात सुरू झाला परतीचा मान्सून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतात मान्सून संपण्याची वेळ जवळ येत असून, सप्टेंबर अखेरपर्यंत कायम पाऊस कायम राहण्याचा अंदाज आहे. साधारणपणे मान्सून १७ सप्टेंबरपासून परतण्यास सुरुवात करतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत संपतो. मात्र, या तारखा निश्चित नसतात आणि बदलत राहतात.

गेल्या वर्षी २५ सप्टेंबरपासून मान्सून कमी होण्यास सुरुवात झाली होती. यंदाही असाच पॅटर्न तयार होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत मान्सून लांबण्याची शक्यता आहे. ७ सप्टेंबरपर्यंत देशात सरासरीपेक्षा ८ टक्के अधिक पाऊस झाला असला, तरी काही राज्यांमध्ये तो कमी आहे. राजस्थानमध्ये ५७ टक्के अधिक पाऊस झाला आहे, जो येथे आवश्यक होता. तर मणिपूरमध्ये सरासरी ३० टक्के कमी पाऊस झाला आहे.

भारतीय ऋतूतील भिन्नतेमुळे येथील पर्जन्यमानात एकवाक्यता नाही. त्याची पाच महत्त्वाच्या श्रेणींमध्ये विभागणी करता येईल. अत्यंत कमी पाऊस (-९९ ते -६० टक्के), कमी पाऊस (-५९ ते -२० टक्के), सामान्य (-१९ ते १९ टक्के), अतिवृष्टी (२० ते ६० टक्के) आणि अति अतिवृष्टी (६० ते ९९ टक्के). यंदा कोणत्याही राज्यात अत्यल्प किंवा जास्त पाऊस झालेला नाही. मात्र, काही राज्यांमध्ये पावसात घट झाली आहे. मणिपूरमध्ये सरासरीच्या उणे ३० टक्के, बिहारमध्ये उणे २६ टक्के, पंजाबमध्ये उणे २३ टक्के आणि जम्मू-काश्मीरमध्ये उणे २० टक्के पाऊस झाला आहे. तर हिमाचल प्रदेशात उणे २१ टक्के आणि अरुणाचल प्रदेशात उणे २२ टक्के घट झाली आहे. इतर काही राज्यांमध्ये सामान्य पण सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यापैकी उत्तर प्रदेशात सरासरीपेक्षा उणे १४ टक्के, आसाममध्ये उणे १३ टक्के, हरयाणा आणि केरळमध्ये उणे १० टक्के कमी पाऊस झाला आहे. याशिवाय ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, मिझोराम आणि मेघालयमध्येही अशीच परिस्थिती आहे. तर दुसरीकडे दिल्ली आणखी पावसाच्या उंबरठ्यावर उभी आहे. त्यात सरासरीपेक्षा १९ टक्के अधिक पाऊस झाला आहे. ७ टक्के अधिक पाऊस असलेला मध्य प्रदेशही याच श्रेणीत आहे. याउलट अनेक राज्यांत मुबलक पावसाची नोंद झाली. राजस्थान ५७ टक्के अधिक पावसासह आघाडीवर आहे. त्याखालोखाल तामिळनाडू आणि गुजरातमध्ये ५१ टक्के मतदान झाले आहे.

#रा

